# अधिक

जाई निंबकर



# अर्धुक

– जाई निंबकर –

देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स प्रा. लि.

**संस्थापक**
रा. ज. देशमुख
सुलोचना राम देशमुख

**प्रकाशक**
रामचंद्र दत्तात्रय तुळपुळे
देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स प्रा. लि.
४७३, सदाशिव पेठ, पुणे - ४११ ०३०.

**लेखिका**
जाई निंबकर

**मुखपृष्ठ**
विनायक गोखले

**अक्षर जुळणी**
सेंच्युरी प्रोसेसर्स
पुणे - ४११ ०३०.

**मुद्रक**
जंगम ऑफसेट प्रा. लि.
पुणे - ४११ ०४१.

**आवृत्ती पहिली**
मे - १९९७

**मूल्य**
१०० रुपये

**देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स प्रा. लि.**

# अर्धुक

## अनुक्रमणिका



उषा १
रखमा ९
सीता १५
नकुसा २५
यमुना ३१
रुक्मिणी ३७
सुवर्णा ४५
सपना ५३
संगीता ६१
मंगल ६७
मार्गरिट ७७
सुमन ८५
जना ९३
स्त्री–मुक्ती : एक चिंतन ९९

भारतीय परंपरेत पत्नीला अर्धांगी म्हणण्याची पद्धत आहे. इंग्रजीत Better half ही संज्ञा वापरली जाते. या पार्श्वभूमीवर **'अर्धुक'** हे नाव आपल्याला बरंच काही सांगून जातं. निंबकरांचं हे **'अर्धुक'** आजच्या स्त्रीमुक्ती चळवळीला एक वेगळा संदर्भ पुरवीत आहे. त्यांच्याच शब्दांमध्ये सांगायचे तर –

'ह्या संपूर्णपणे स्त्रीविन्मुख समाजात रूढींविरुद्ध आपल्या मनाप्रमाणे वागणाऱ्या स्त्रिया असतात हीच दखल घेण्याजोगी बाब आहे. परंतु असह्य परिस्थितीविरुद्धचा त्यांचा लढा व्यक्तिविशिष्टच राहतो. त्यापलिकडे जाऊन परिस्थितीला कारणीभूत असलेल्या रूढ कल्पना, चालीरीती, कुटुंबरचना ह्यांविरुद्ध उभा राहत नाही. प्रत्येकजण आपली गोष्ट अपवादात्मक आहे, बाकीच्यांनी तसं वागण्याचं कारण नाही असंही सूचित करते.'

**'अर्धुक'**मधे आपल्याला अशा बंडखोर स्त्रिया भेटतात. त्यांच्या कहाण्या आपल्याला आजच्या पुरुषप्रधान समाजव्यवस्थेचं चित्र तर दाखवतातच पण स्त्रियांच्या मनोवृत्तींवर पण प्रकाश पाडतात. त्यांच्या लढ्याला सार्वत्रिक–सामाजिक स्वरूप का मिळू शकत नाही? या प्रश्नाच्या उत्तरांच्या दिशाही आपल्याला या कहाण्यांमधेच सापडतात. या उत्तरांचा प्रामाणिकपणे शोध घेतल्यास स्त्री–मुक्ती चळवळीच्या नवीन दिशा आपल्याला सापडतील; या विश्वासानेच हे **'अर्धुक'** आम्ही वाचकांच्या हातात सोपवीत आहोत.

**एस.**


उषा

ह्या वेळी सासरा स्वतःच आला. त्याची भाषा निर्वाणीची होती. ''ही तुमची मुलगी. पुन्हा तिला तिकडे पाठवू नका. ती काही आता लहान नाही. किती दिवस आम्ही तिचं वागणं सहन करायचं? चार लोकांत खाली मान घालायची पाळी येते. वाटेल ते बोलते. तिला काही समजच नाही आणि येणारही नाही. ती अशी वेड्या डोक्याची आहे हे तुम्हाला माहीत असून तुम्ही आम्हाला फसवलंय. मी पोराचं पुन्हा लग्न करणार आहे. तुम्ही त्यात काही मोडता घातला तर माझ्यासारखं वाईट कुणी नाही येवढं ध्यानात ठेवा.''

सावित्रीबाई बऱ्याच तरुणपणी विधवा झालेल्या. तीन मुलं पदरात. थोरली ही उषा. तिचं शाळेत काही डोकं चालेना. एक बरं स्थळ मिळालं नि तिचं लवकरच लग्न करून टाकलं. सासरच्यांनी कुणाबरोबर तरी तिला पाठवून द्यायची, आईनं परत घालवायची, त्यांच्यापुढे नाक घासायचं. हो, पोरगी जरा वांड आहे, पण तुम्ही जरा संभाळून घ्या. हळूहळू शिकेल, निवळेल. पण ती काही निवळली नाही. सासूनं काहीतरी काम सांगितलं की ऐकायची नाही. रागावली की उलट बोलायची, शिव्या द्यायची. नवऱ्याबरोबर नाठाळपणा करायची, शेजाऱ्यापाजाऱ्यांशी भांडणं करायची. सासरची माणसं वैतागून गेली. आता काही मार्गच उरला नाही म्हणून कपाळाला हात लावून सावित्रीबाईंनी तिला ठेवून घेतलं. तिला दोन-तीन घरची भांडीधुण्याची कामं लावून दिली. शिवाय तिची घरातही मदत व्हायची. हळूहळू तिच्या दुर्दैवाबद्दल खंत करायचं सावित्रीबाईंनी सोडून दिलं. फक्त त्यांना एकच काळजी होती. ही अशी अर्धवट, कुणी तरी हिचा फायदा घेतला नि ती पोटुशी राहिली तर काय करायचं?

धाकटी दोन मुलं अरुण नि हेमा हुशार निघाली. शाळेत त्यांचे वर नंबर यायचे. ती खूप शिकून पुढे काहीतरी करून दाखवतील ह्या आशेने सावित्रीबाई त्यांना शिकवीत होत्या. आयुष्य जरा मार्गी लागत होतं तो हेमा एकाएकी तीव्र स्वरूपाच्या क्षयाने मरून गेली. जेमतेम महिनाभर आजारी होती. काही इलाजच चालला नाही. सावित्रीबाईंना हा धक्का सहन झाला नाही. त्यांनी हाय खाऊन अंथरुण धरलं. अरुण दिवसभर आईच्या उशाशी बसून रहायचा. शाळेत जायचा नाही, काही बोलायचा नाही. उषा एकटी अचल राहिली. शेजारीपाजारी म्हणायचे ती वेडसरच आहे, तिला उमजलंच

नाही काय झालं ते. तिनं आई करीत असे तीही कामं आपल्या अंगावर घेतली. परत घरी आलं की घरातली सगळी कामं, स्वैपाक, आईसमोर बसून तिला बळे चार घास खायला लावायचे. महिने गेले, शेवटी नाही म्हटलं तरी कालगतीमुळे सावित्रीबाई थोड्याशा सावरल्या. आपलं आयुष्य चालूच आहे आणि त्याचा ताबा आपण घेतला पाहिजे ह्याचं भान त्यांना आलं. त्या कामाला जायला लागल्या, एकदा बाहेरच्या माणसांशी संबंध यायला लागल्यावर हसू-बोलू लागल्या. अरुण मात्र काही केल्या मार्गावर येईना.

एक दिवस उषा त्याला म्हणाली, ''चल, भाकरी खाऊन घे. आज शाळेत जायचंय तुला.''

''मी कुठे जाणार नाहीये.''

''मी तुझ्या सरांना भेटून आलेय. ते म्हणाले, ''तू बुडलेला अभ्यास भरून काढलास तर तुला परीक्षेला बसायला परवानगी मिळेल. म्हणजे तुझं वर्ष वाया जायचं नाही.''

''तुला कुणी सांगितलं होतं चोंबडेपणा करायला?''

''ह्यात चोंबडेपणा काय झाला? तुझ्या भल्याचंच केलं की.''

'मी शाळेत जाणार नाहीये. एवढ्या सगळ्या दिवसांचा अभ्यास भरून काढणं शक्य नाही.''

''शाळेत जाणार नाही तर काय करणार आहेस? जन्मभर असा बसून रहाणार आहेस? सगळ्या जगात तुला एकट्यालाच दुःख आहे आणि तेच तू कुरवाळत बसणार. आईनं नि मी राबायचं न् तू आयतं बसून खायचं ह्याची लाज नाही वाटत तुला?''

''उषे, माझी लाज काढू नको.''

''का नाही? आई येवढे कष्ट उपसते ते कशासाठी? त्याच्या बदल्यात आपलं शिक्षण पुरं करावं, निदान ते करायचं नसलं तर काहीतरी कामधंदा करून पोटाला मिळवावं असं नाही वाटत तुला?''

शेवटी सावित्रीबाई म्हणाल्या, ''गप बस उषा. त्याच्या मागे लागू नको विनाकारण.''

''हो, तू त्याचीच बाजू घेणार, माझं काय जातं? घरात बसवून ठेवून पोस त्याला जन्मभर.'' असं पुटपुटत उषा गप्प बसली. पण त्याला हातपाय न हलवता नुसतं बसलेलं पाहिलं की ती पुन्हा चिडायची नि त्याच्यावर

ओरडायची. एकदा काय झालं म्हणून घरमालकीण आली तर तिच्यावर उषानं तोंड टाकलं. तिनं सावित्रीबाईंना खोली खाली करा म्हणून नोटिस दिली. सावित्रीबाईंनी पुष्कळ गयावया केली पण तिनं ऐकलं नाही. ती म्हणाली, ''तुम्ही काहीही कबूल करून काही फायदा नाही. ती तुम्हाला जुमानणार आहे का? मी पुष्कळ दिवस दुर्लक्ष केलं पण आता फारच झालं. बाकीचे भाडेकरू तक्रार करायला लागले.''

सावित्रीबाईंना रडू कोसळलं. उषा म्हणाली, ''रडू नको आई. मी दुसरी जागा बघते. सबंध गावात काय येवढी एकच खोली आहे का?''

''तुला कसं काही कळत नाही ग? देवा, माझी चांगली गुणाची मुलगी होती ती गेली. तिच्याबदली हिला नेली असतीस तर काय झालं असतं? आता ही आग पदरात घेऊन मी कसे दिवस काढू?''

उषा रडायला लागली. रडत रडत तिनं आईला मिठी मारली, पण आईनं तिला रागाने दूर लोटली. ''माझ्या वाइटावरच आहेस तू. इतका त्रास दिलास आता मिठी मारायला कशाला येतेस?''

उषानं खरोखरच दुसरी खोली पाहिली. सामान न्यायला छकडा आणला. मायलेकींनी सगळं सामान आवरलं, छकड्यात भरलं, नव्या ठिकाणी खाली केलं, पुन्हा सगळी लावालाव केली. अरुणने मदत करायला बोट सुद्धा उचललं नाही.

उषा म्हणाली, ''बघ आई कसा आहे तो आणि तू म्हणतेस मी त्याला का बोलते म्हणून.''

''तो कसा आहे ह्याच्यापेक्षा तू कसं वागतेस ह्याच्यावर ध्यान दे जरा. तिथून आपल्याला हाकलून दिलं ते तुझ्या तोंडामुळे. आता तरी जरा नीट वागायला शीक. नाहीतर पुन्हा जावं लागेल इथून. सारखं नवीन जागा शोधत कुठे हिंडायचं?''

उषा काम करायची त्या एका घरी तिथल्या बाईंची बहीण त्यांच्याकडे आली होती. तिची मुलगी तिच्याकडे बाळंतपणाला यायची होती आणि तिला घरकामात मदतीला आणि बाळ-बाळंतिणीचं करायला कुणीतरी हवं होतं. उषाच्या मालकिणीनं तिला विचारलं, ''जातेस का त्यांच्याबरोबर मुंबईला? त्यांच्याकडे रहायचं. जेवूनखाऊन पगार देतील. तीन-चार महिने त्यांची नड काढ, मग परत ये.'' उषा म्हणाली आईला विचारून सांगते.

आईला बरंच वाटलं. घरातल्या कुरबुरींपासून थोडे दिवस तरी सुटका. जाताना उषा म्हणाली, ''जाते आई, तब्बेतीची काळजी घे, काही लागलं तर कळव.'' तिच्या डोळ्यात पाणी आलं. आईला सोडून इतक्या लांब जाताना तिचा जीव कासावीस होत होता. सावित्रीबाई फक्त म्हणाल्या, ''नीटपणे रहा. वेडंवाकडं बोलू नको. सांगतील ते काम मुकाट्याने कर. नाहीतर हाकलून देतील तुला.''

'मुंबईत उषाचं चांगलं जमलं. समज जरा कमी आहे, पण मुलगी कामसू आहे, विश्वासू आहे असं म्हणून तिच्या मालकिणीने बाळंतपण करून मुलगी परत गेली तरी तिला ठेवून घेतली. उषा घरी नियमितपणे पैसे पाठवायची, अधूनमधून सुट्टीसाठी घरी यायची. अरुण शेवटी माणसात येऊन शाळेत जायला लागला हे पाहून तिला बरं वाटलं. शाळा पास होऊन अरुणने कॉलेजात नाव घातलं. तो पायजम्याऐवजी पँट-शर्ट घालायला लागला, सलूनमधून केस कापून घ्यायचा, मित्रांबरोबर फिरायचा. त्यांची सुस्थिती बऱ्याच अंशी उषाने पाठवलेल्या पैशांमुळे होती. पण आईनं कधी, ''आलीस? ये,'' असं म्हणून उषाचं स्वागत केलं नाही. अरुणच्या कपाळाला तर बहिणीला पाहिलं की आठ्याच पडायच्या. ती अजागळासारखी रहायची, खेडवळासारखी मोठा आवाज काढून बोलायची, शिव्या द्यायची. एकदा तिनं रस्त्यात त्याला हाक मारली होती. त्याच्या बरोबर त्याचे मित्र होते. एकजण म्हणाला, ''कोण पाखरू आहे रे?'' अरुण आंबट तोंड करून म्हणाला, ''बहीण आहे माझी.''

''काय लेका, काय वाटेल ते सांगतोस. आम्ही तुझ्या घरी येतो तेव्हा कधी दिसली नाही ती.''

''मुंबईला असते.''

घरी आल्यावर त्यानं तिला खूप दम दिला, ''दुसऱ्या कुणासमोर मला ओळख देत जाऊ नकोस,'' म्हणून.

''का?''

''उलट विचारायचं काम नाही.''

''तुला लाज वाटते माझी?''

'हो, हो वाटते.''

''मग आईची पण वाटत असेल.''

तो काही बोलला नाही, पण त्याला एकदम वाटलं, खरंच ही आईसारखी दिसते. तोच गोल चेहरा, तपकिरी डोळे, लहान चण आणि कपाळावर तशाच म्हाताऱ्या माणसासारख्या रेषा. तो आणि हेमा दिसायला वेगळेच होते. बापासारखे, त्याच्या मनात आलं. आईला विचारावंसं वाटलं पण त्यानं नाही विचारलं.

उषा ज्यांच्याकडे काम करीत होती त्यांची दुसरीकडे बदली झाली. ती त्यांच्याबरोबर जायला तयार होती. पण इतक्या लांब परमुलखात जायचं, तिथे रहायला जागा कशी असेल, किती वर्षं तिथे रहावं लागेल हेही माहीत नसताना उगीच ह्या मुलीची जोखीम नको म्हणून त्यांनी तिला न्यायचं नाही असं ठरवलं.

ती कायमची म्हणून घरी आली हे सावित्रीबाईंना आणि अरुणला मोठं संकटच वाटायला लागलं. ती नसताना आयुष्य कसं सुरळित चाललं होतं. ती आल्यावर लगेच कुरबुरी, भांडणांना सुरुवात झाली. अरुणने आईला सांगितलं, ''एक ती इथे राहील नाहीतर मी.'' शेवटी सावित्रीबाईंनी उषाला सांगितलं, ''तु आपली दुसरीकडे खोली घेऊन रहा.''

''पण का?''

''तुला नीटपणे रहाता येत नाही. आम्हाला दोघांनाही त्याचा तापच होतो. काल तू त्या भीमाबाईशी भांडण केलंस.''

''मग, त्यांच्या बैलाच्या शेणाचा हा एवढा ढीग आहे. ते पावसानं भिजलंय तर त्याची कसली घाण मारते. सगळीच तक्रार करतात.''

''पण ती लगेच तुझं माझं करून भांडायला उठत नाहीत. तुझ्यापायी आम्हाला हाकलून देतील इथून.''

उषाच्या डोळ्यांत पाणी आलं. सावित्रीबाईंना तिची कीव आली पण तिच्या स्वभावाला औषध नव्हतं. मुख्य म्हणजे तिच्या तिथे असण्याचा अरुणला किती त्रास होत होता ते त्यांना दिसत होतं. आता कुठे तो रुळावर यायला लागला होता. अशात ताणतणाव सहन करणं त्याला धोक्याचं होऊ शकलं असतं.

उषा घर सोडून गेली तरी ती येताजाता आईकडे डोकावून जायची. आईला भेटलं की तिला बरं वाटायचं. पण बाई तू कुठे रहातेस असं आईनं तिला कधी विचारलं नाही. एक दिवस ती गेली तो आई अंथरुणावर पडलेली.

खूप ताप होता. हिनं रिक्शा करून आईला डॉक्टरकडे नेलं. त्यांच्या मनात जायचं नव्हतं पण ती म्हणाली, ''खर्चाची तू काळजी करू नकोस. मी देईन.'' डॉक्टरने सांगितलेली औषधं तिनं लगेच आणून दिली.

घरी आल्यावर ती म्हणाली, ''अरुण गेला तेव्हा त्याला माहीत होतं ना तू आजारी आहेस म्हणून? मग हा पसारा आवरला असता तर काय इस्तरी बिघडली असती का त्याची?''

''त्यानं आवरायची काय गरज होती?''

''मग कोण करणार हे सगळं?''

''मी केलं असतं उठत-बसत. तू उगीच जास्त बोलू नको. तुझा काय संबंध आहे?''

पण मग उषाने केर काढला, पाणी भरून आणलं, भांडी घासली, भाकरी केली ते त्यांनी मुकाट्याने तिला करू दिलं. त्यांचा आजार बरेच दिवस चालला आणि उषाने येऊन घरकाम करून जायचं हे नित्याचंच झालं. ती जायची तेव्हा अरुण बहुतेक घरी नसे. क्वचित असला तरी तिला मदत करीत नसे. ती स्वैपाक करून जायची. पण आज तूही जेव हो इथे असं एकदाही मायलेकांच्या तोंडून बाहेर पडलं नाही. कदाचित पडत्या फळाची आज्ञा मानून ती रोजच त्यांच्याकडे जेवायला लागेल, मग रहायला सुद्धा येईल अशी त्यांना भीती वाटली असेल.

हळूहळू सावित्रीबाईंच्या तब्बेतीला उतार पडला. त्या थोडं हिंडाय-फिरायला, चार घास खायला लागल्या. डॉक्टरांनी सांगितलं होतं आता काही पथ्य नाही, त्यांना आवडेल ते खायला द्या. त्यांना चिक्कू फार आवडायचे म्हणून ते आणायला उषा मंडईत गेली तिथे तिला गायकवाडीणबाई भेटल्या. तिची आई बऱ्याच वर्षांपासून त्यांच्याकडे काम करायची.

त्यांनी विचारलं, ''अग उषा, तुझ्या आईचा काय पत्ता आहे? बरेच दिवस झाले कामाला येत नाही.''

''आजारी होती, बाई.''

''एकदा निरोप आला होता पण त्यालाही आत पुष्कळ दिवस झाले.''

''फार आजारी होती. आत्ताच कुठे उठलीय. हे काय तिच्यासाठीच थोडे चिक्कू घ्यायला आले होते.''

''अन् तू इथे कशी?''

''इथेच असते. मुंबईहून आल्याला पुष्कळ दिवस झाले.''

''बरं झालं. तू होतीस म्हणून आईला मदत झाली. आईकडेच असतेस ना?''

''नाही, भाऊचं नि माझं पटत नाहीना, म्हणून आई तिथे रहायला नको म्हणते.''

''मग रहातेस कुठे?''

''दत्तनगरमधे मामाकडे. बाहेर गाईसाठी छप्पर आहे, तिथे तो झोपायला जागा देतो मला.''

❖❖❖


रखमा

त्यांना दोघांनाही आता मुंबईचा कंटाळा आला होता. तसं पहिल्यापासूनच त्यांनी ठरवलं होतं, काही वर्षं नोकरी करून पैसे साठवायचे, मग गावी परत जाऊन जमीन घ्यायची. नवससायास करून मूल झालं नव्हतं. खरं म्हणजे त्याच कारणासाठी रखमाला नवऱ्यानं मुंबईला आणलं होतं. मूल होत नाही म्हणून सासू छळायची, मुलगा सुट्टीवर आला म्हणजे दुसरं लग्न कर म्हणून त्याच्या मागे लागायची. एकदा तो गावी आलेला असताना रखमानं डोळ्यांत पाणी आणून सांगितलं, ''मला तुमच्याबरूबर मंबईला घेऊन चला. मला हितं ऱ्हायचं न्हाई.'' तो एका चिमुकल्या खोलीत रहात होता, तेही इतर दोघांबरोबर. त्यात ही कुठं राहणार? जेमतेम झोपण्यापुरती जागा होती. त्यात चूल, भांडीकुंडी कुठं मांडणार? संसार कसा करणार? पण रखमा काही ऐकायला तयार नव्हती. ती म्हणे तुम्ही मला घेऊन चला, मग काय होईल ते होईल. मला एकटीला इथं सोडून गेलात तर मी जीव देईन. ह्या थोराड बांध्याच्या, सुबक सावळ्या चेहऱ्याच्या बायकोवर शिवाजीचा जीव होता. ती म्हणते तसं करायला मागेपुढे पहाणार नाही असं त्याला पटलं. तिच्यावरून घरच्यांशी भांडणं करणंही त्याला शक्य नव्हतं. शेवटी त्यांचा राग पत्करून तो तिला आपल्याबरोबर घेऊन गेला.

रखमाला वाटलं आपला नवरा किती चांगला आहे. आईच्या मनाविरुद्ध त्यानं आपल्याला इथं आणलं एवढंच नाही, पण तो दारू पीत नाही, आपल्यावर उठसूट डाफरत नाही, मारहाण करीत नाही. मग तीही त्याला खूष ठेवायला झटायची, त्याच्या आवडीचं करून घालायची, त्याला पैसे खरचायचं जड वाटायचं म्हणून ती कधीच अमुक पाहिजे म्हणून हट्ट धरायची नाही. काटकसरीनं संसार करायची.

शिवाजीनं वेळेच्या आधीच नोकरी सोडायचं ठरवलं. मूलबाळ नसल्यामुळे पैशाला वाटा फुटल्या नाहीत. शिलकीत पडलेले पैसे आणि ग्रॅच्युइटी मिळून जमीन घ्यायला पुरेसे पैसे होते. शिवाय जमीन कसायची तर शरिराला कष्ट झेपतील अशा वयातच सुरुवात करायला हवी. असा सगळा विचार करून ती दोघं गावी आली.

त्याचे आईबाप वारलेले होते. भाऊ बाहेरगावी नोकरीला होता. बापाची जमीन होती ती चुलतभावाच्या ताब्यात होती. शिवाजी आपल्या मनाविरुद्ध बायकोला घेऊन मुंबईला गेला, मुलगा व्हावा म्हणून दुसरं लग्न केलं नाही

ह्याचा आकस मनात धरून त्याने ती जमीन मुद्दाम पुतण्याला दिली होती. तो आपणहून काही जमीन आपल्याला देणार नाही हे शिवाजीला माहीत होतं. कोर्टकचेऱ्या करायची त्याची इच्छा नव्हती. त्यातून काही पदरात पडण्याची शक्यता नव्हती. शिवाय तिथंच त्यांच्या शेजारानं रहायचं तर त्यांच्याशी वैर कशाला?

त्यानं साताठ एकरांचा जमिनीचा तुकडा घेतला. जमीन जिराईतच होती, पण त्यानं पानाड्या आणून त्याने दाखवलेल्या ठिकाणी विहीर काढली. त्याला थोडं पाणी लागलं. त्याने थोडे गुंठे जमीन भिजत होती, त्यात भाजीपाला लावला. पाटीत माळवं भरून रखना शेजारच्या गावात विकायला जायची. बाकीच्या रानात पिकलेली ज्वारी त्यांना वर्षभर खायला पुरायची. शेतावरच भेंडाच्या विटांचं छोटंसं कौलारू छप्पर त्यांनी बांधलं. दावणीला एक गाय, दोन शेळ्या होत्या. गाईचं दूध विकूनही बरे पैसे व्हायचे. कष्ट करून समाधानात दोघं रहात होती. मुंबईतली सगळी वर्षं त्यांनी हेच स्वप्न पहात घालवली होती.

पण फार वर्ष हे सुख रखमाला लाभलं नाही. पायाला कुदळ लागल्याचं निमित्त होऊन शिवाजी धनुर्वाताने दगावला. रखमाला हा अनपेक्षित आघात सहन झाला नाही. ती भ्रमिष्टासारखी झाली. कुणीतरी भाकरी आणून तिला चार घास खाऊ घालावे, तिला चार समजुतीच्या गोष्टी सांगू पहाव्या. ती सगळ्यांचं सगळं ऐकून घ्यायची पण तिच्या मेंदूवर काही उमटतच नव्हतं. तिच्या भावानं, बहिणीनं थोडे दिवस तरी आमच्याकडे चल म्हणून बोलावलं पण तिनं सपशेल नकार दिल्यावर सुटकेचे निश्वास टाकले. ती म्हणे मी त्यांना सोडून कुठे कसं जाऊ? ती कुणाशीच फारसं काही बोलत नसे, फक्त दुसरं कुणी अवतीभवती नसलं की नवऱ्याशी मात्र बोलायची. एक दिवस त्याने तिच्या स्वप्नात येऊन सांगितलं, ''रखमा ऊठ. बाहेर किती काम पडलंय. भेंडीला पाणी घ्यायचंय, कोबीची खुरपण करून खायला घालायचंय, भाजी फुलावर यायला लागली असेल ती काढून बाजारात न्यायला पायजे. तू अशी नुसती बसलीस तर कोण करणार ही सगळी कामं?''

दुसऱ्या दिवशी पहाटेच उठून तिनं पदर बांधला नि ती कामाला लागली. कष्टाची सवय असलेलं आपलं शरीर इतके दिवस नुसतं लोळ्यागोळ्यासारखं बसून कसं राहिलं ह्याचा तिला अचंबा वाटला. नवरा गेल्याचं दु:ख कितीही मोठं असलं तरी त्याच्यामागून जीव दिला नाही,

जगवलाच ना? मग ते दु:ख उगाळीत जमिनीची, पिकाची, जित्रापाची अशी हयगय आपण कशी केली? आता आपल्याला तेवढाच आधार आहे.

तिचा पुतण्या तिला भेटायला यायचा. त्यानेच चुलत्याला अग्नी दिला होता. तो येऊन आपली विचारपूस करतो म्हणून तिला भारी कौतुक वाटायचं, चुलत्याच्या मागे चुलतीला अगदीच वाऱ्यावर सोडली नाही म्हणून. वाटायचं, माझा मुलगा असता तर त्याच्याकडे बघून मी कसेही दिवस काढले असते. पण जे नशिबातच नाही त्याच्याबद्दल दु:ख करून काय उपयोग?

ती जरा सावरलीय असं पाहून पुतण्यानं विचारलं, ''काकी, आता तुमी कुठं जाणार?''

''जानार रं कुटं? हेच माजं घर न्हवं का?''

''हितं काय करणार?''

''इवतं दीस काय करीत व्हते? त्येच.''

''एकट्याच?''

''तर म दुसरं कोन हाय मला? मदत लागली मंजी येखादा गडी लावीन. आन अडल्यापडल्याला तुमी सारी हायताच की.''

एकदा त्यानं विचारलं, ''तुमाला भीती नाही वाटत एकटं रहायला?''

''भीती कशापाई? माज्याकडं काय पैशाचं डबोलं हाय का सोनंनाणं? का मी तरणीताठी हाय की कुनीबी यिऊन माज्यावर हात टाकावा?''

एकदा त्यानं म्हणून पाहिलं, ''तुमाला एकटीला जमत नसलं तर जमीन माझ्या ताब्यात द्या. तुम्ही माझ्यापाशी रहा. तुमाला काही कमी पडणार नाही. माझी आय असती तर संभाळली नसती का मी?'' रखमा जरा रागावूनच म्हणाली, ''कोन म्हनतं जमत न्हाई म्हणून? माजी जमीन माजं घर सोडून मी कुटंबी जानार न्हाई.''

याच्या पुढची पायरी म्हणून त्यानं तिला पैसे देऊ केले. ''जमिनीच्या बदल्यात मी थोडेफार पैसे देईन तुम्हाला. ते घेऊन तुम्ही कुठंबी रहा.'' रखमाला जिद्द होती पण परिस्थितीचे सगळेच घटक इतके प्रतिकूल होते की ती एकटी उभी राहून त्यांच्याविरुद्ध लढा देऊच शकली नाही.

इतकं झाल्यावर शेवटी आपला भोळेपणा तिच्या ध्यानात आला. आपणच चुलत्याचे वारस अशी पुतण्याची ठाम खात्री होती. मस वील केलं असेल त्यानं. म्हणून काय झालं? बायकोच्या नावानं कुणी जमीन ठेवतं? रक्ताच्या माणसाला जमीन ठेवायला नको?

ती अजिबात बधत नाही असं पाहून शेवटी त्यानं नख्या काढल्या नि धमक्या द्यायला सुरुवात केली. बऱ्या बोलानं गेली नाहीस तर नेसत्या साडीनिशी हुसकून काढीन. मग मात्र तिला भीती वाटायला लागली. तिला माहीत होतं की वेळ आली तर कुणीच तिच्यापाठी उभं रहाणार नव्हतं. पोलिसात तक्रार करून काही उपयोग नव्हता आणि करणार काय? तो धमक्या देतो म्हणून? तो म्हणणार मी नाही देत. तिच्यापाशी पुरावा काय होता? तसं समोरासमोर त्याच्याशी भांडायचं बळ तिच्यात होतं. हुसकून द्यायच्या धमकावणीला ती भीत नव्हती. पण रात्री अपरात्री घरात घुसून त्याने तिला जिवे मारली तर कोण काय करणार होतं? रातोरात प्रेत पुरून टाकून तो मोकळा होईल.

मग काय करायचं? त्यानं देऊ केलेले पैसे घेऊन निघून जायचं? पण तो देणार ती किंमत बाजारभावाच्या आसपास सुद्धा जाणार नाही हे तिला माहीत होतं. त्याहीपेक्षा ते पैसे हातात पडण्याची काहीच खात्री नव्हती. तेव्हा तिनं त्याला झुलवत ठेवून गुपचुप एका मध्यस्थाच्या करवी एक गिऱ्हाईक पाहिलं. तो एक बागाईतदार होता. तिनं त्याला भेटून परिस्थितीची कल्पना दिली. हा गुंड तुम्हाला इथं नीटपणे शेती करू देणार नाही म्हणून बजावलं. तो म्हणाला मी ते बघून घेईन, तुम्ही त्याची काळजी करू नका. माणूस सज्जन होता. बाईला जमीन विकणं भाग आहे हे माहीत असूनही त्यानं नाडलं नाही. त्याला लिफ्टची परवानगी मिळत होती तेव्हा जमिनीतून पुष्कळ उत्पन्न मिळणार होतं. त्यानं रखमाला बाजारभावानं पैसे दिले. पैसे तिच्या हातात न देता आपल्या ओळखीच्या एका ठिकाणी व्याजी लावले आणि दर महिन्याला व्याज मिळेल अशी व्यवस्था केली.

जमीन, घर सोडून जाताना रखमाला फार दु:ख झालं. नवऱ्याच्या मागे जिनं आधार दिला ती जमीन गेली, डोक्यावरचं हक्काचं छप्पर गेलं. नवऱ्याच्या आठवणी जिथे जिवंत होत्या त्या ठिकाणाला ती कायमची अंतरली. भावाकडे जाऊन राहिली तरी ते परक्याचंच घर. तिथे आपल्या मनाप्रमाणे वागता येणार आहे थोडंच? पण शेवटी नशिबात असेल ते कोण टाळू शकणार अशी स्वत:ची समजूत घालून ती नवं आयुष्य उभं करायला लागली. फक्त रात्री एकटी असली की मनातल्या मनात नवऱ्याशी बोलायची. त्याला सांगायची, ''तुमी मला चकवून माज्या आंदी गेलासा, पर माज्यावर वाइच ध्यान ठिवा.''

आधी भावजय जरा नाराज होती. पण रखमानं तिच्या कलानं वागून घरातलं बरंच काम आपल्या अंगावर घेऊन तिची कुरकूर बंद केली. शिवाय महिन्याची महिन्याला व्याजाची रक्कम येत होती ती रखमा सरळ भावाच्या हवाली करायची. त्यामुळे भावावर तिचा भार पडत नव्हता. उलट भावाच्या संसाराला हातभारच लागत होता.


काही वर्षांनी भावाची धाकटी मुलगी लग्नाला आली. भाऊ तिला म्हणाला, ''पोरीचं लग्न काढलंय तुला ठाऊकच आहे. आज पैशाची गरज आहे. नाहीतरी तू माझ्या आधारानंच रहातेस, मग तुझे पैसे मला द्यायला काय हरकत आहे?'' रखमाला नाही म्हणता येईना. तिनं जमीन खरीदणाऱ्याकडनं आपली ठेव काढून आणली, भावाच्या हवाली केली. त्याच्या मुलीचं लग्न थाटात झालं. भाऊ-भावजयीनं तोंड भरून रखमाचं ऋण मानलं.

पण लग्नासाठी कर्जही काढलं होतं त्याचे हळूहळू तगादे लागायला लागले. शिवाय आता रखमाचे नियमित येणारे पैसे बंद झाले होते. भावाची ओढाताण व्हायला लागली. रखमाच्याही प्रकृतीच्या तक्रारी सुरू झाल्या. औषधपाण्यावर खर्च व्हायला लागला. घरकामात तिच्याने पूर्वीइतकी मदत होईना. शेवटी खायला काळ नि भुईला भार झालेल्या बहिणीला भाऊ म्हणाला, ''माझा मलाच संसार जड झालाय. इतकी वर्षं मी तुला संभाळलं, इथून पुढे संभाळणं माझ्यानं होणार नाही. तू आपली दुसरीकडे जा.''

तिच्या बहिणीचा मुलगा शहरात शिकायला ठेवला होता. खोली भाड्याने घेऊन रहात होता. त्याच्या आईने विचार केला, ही म्हातारी त्याच्याजवळ राहिली तर त्याला करून घालील. खाणावळीच्या खर्चात दोघांचं पोट निघेल. शिवाय पोरगं एकटंच शहरात रहातंय, बहकेल, वाईट संगतीला लागेल. ही असली तर हिचा थोडा धाक राहील. तेव्हा रखमानं बहिणीकडे आसरा मागितला तशी बहीण म्हणाली, ''माझ्या पोराजवळ राहून त्याला करून घालशील का?'' रखमा कबूल झाली. तिला दुसरा मार्गच नव्हता.

भाचा दुकानची खरेदी, भाजी-बिजी आणून द्यायचा. रखमा बसत उठत स्वैपाक, भांडी-धुणी करायची. रोज सकाळी उठताना देवाचं नाव घेत त्याला साकडं घालायची, ''इट्ठला, असंच काम रेटता रेटता येक दीस मला न्हेरे माज्या बाबा. न्हायतर ह्या पोराला माजा उपेग न्हायला न्हाई मंजी मी कुनाच्या दारात जाऊ?''

❖❖❖


सीता

पोरगी बोलली ते आठवून आठवून सीतेच्या डोळ्यांना पुन्हा पुन्हा पाणी येत होतं. एकीकडे बाहीनं डोळे पुसत, नाक ओढत तिचं खुरपं चालूच होतं.

नर्मदेनं हाक मारली होती, ''सिते, ए सिते, बेल ऐकाय आली न्हाई का? भाकरी खायची का नाय?''

''मला भूक न्हाई.''

विठोबानं पण हाळी दिली होती पण तिनं लक्षच दिलं नाही. पोटात भुकेचा आगडोंब उसळला होता पण ती जेवायला गेली नाही.

असं वागावं पोरीनं? असलं वंगाळ बोलावं?

आदल्या दिवशी तिनं मालकिणीला विचारलं होतं, ''बाई ह्या प्लाटमंदी लई कांग्रेस झालंया. मला एकटीला कवा उरकायचं? नंदाला जोडीला आणू का? पाऊस लागल्यापासनं काम न्हाई तिला. बसूनच हाय घरी.''

नंदाच्या संसाराला हातभार लागावा म्हणून तिला आणली तर तिनं हे असं केलं. प्लॉटमधल्या झाडांची छाटणी केली होती. त्याच्या बारक्या काटक्या जागेवरच पडल्या होत्या. खुरपण राहिली बाजूलाच नि नंदा काटक्या सर्पणाला घरी न्यायला गोळा करायला लागली.

''नंदे, त्या काटक्यांना हात लावू नको.''

नंदानं लक्षच दिलं नाही तशी सीतेनं उठून तिच्या हातातला एक जुडगा हिसकून घेतला, ''मुकाट काम कर. आज माज्या शब्दावर बाईंनी तुला कामावर ठिवलीय. तू परवानगी घेतल्याबगार कशाला हात लावलास तर उद्या बाई मला जाब इचारतील. मी इक्ती वर्सं हितं काम करतीया पन कुणाचं हूं म्हणून घेतलं न्हाई.''

आईनं हातात कोंबलेलं खुरपं फेकून देऊन नंदा जागची उठली नि म्हणाली, ''छिनाल रांडे, आई हायस का वैरीन? तुला माझं काय बी चांगलं बगवत न्हाई.''

ब्लाऊज थोडासा फाटला होता तो तिनं बोटं घालून आणखी फाडला आणि आईनं मला मारलं, कपडे फाडले, शिव्या दिल्या म्हणून आरडत ती नवरा शेजारच्या प्लॉटमधे दाऱ्यावर होता त्याच्याकडे गेली. त्यानं तिला उगी करून घरी पाठवलं.

सीता विचार करीत होती, पोरांसाठी मी काई बी करायचं ठिवलं न्हाई,

पण माज्या हाताला यशच का न्हाई?

नवरा मेला तेव्हा ती जेमतेम विशीत होती. पदरात दोन मुलं. दुसऱ्या बाळंतपणाला ती आईकडे गेली होती. तिथं तिनं आपल्या मनानं ऑपरेशन करून घेतलं होतं. ते समजल्यावर तिच्या नवऱ्यानं तिला खूप मारलं होतं. पण त्यावेळी तसं केलं नसतंन तर एव्हाना आणखी दोन पोरं झाली असती.

ती नि तिचा नवरा एका बागाईतदाराच्या वस्तीवर रहायची. नवरा मेल्यावर त्यानं तिला खोली खाली करायला सांगितली. कारण तिथे नवा गडी यायचा होता. सीतेला सासर-माहेरची बख्खळ माणसं होती. पण कुणाच्या तरी आधाराने रहायचं आणि त्यांचं मिंधेपण पत्करायचं हे तिला मानवलं नसतं. तिनं गावात एक खुराडेवजा खोली भाड्याने घेतली.

ती पोरांना घेऊन एकटीच रहाते, कष्ट करून त्यांना संभाळते, तिला कुणाच्या आधाराची गरज वाटत नाही ह्याचं तिच्या सासर-माहेरच्या लोकांना वैषम्य वाटायचं. मग ते तिच्याबद्दल वाटेल ते बोलायचे. कुणी म्हणे, चांगला तगडा जवान गडी व्हता, येकायेकीच कसा काय खलास झाला? हिनंच काय तरी करणी केली आसंल. कुणी म्हणे, हिला येकलीलाच न्हाया पायजे त्याला कारन हाय. मंजी कसं हाय, की तिच्याकडं कोन आलं कोन ग्येलं याचा जाब इच्यारनारं कुनी न्हाई. ह्यावर दुसरं कुणी उत्तर देई, तर काय, दोन पोरांचं न् आपलं पोट भरून इक्ती टाकटुकीत ऱ्हाते ती काय निस्ती सोताच्या कष्टावर?

बाकी कुणाच्या बोलण्याकडे सीता लक्ष देत नसे पण तिची आई जेव्हा म्हणाली, ''नवऱ्याला चिरडून टाकलंस नि आता झालीस मोकळी कसं बी वागायला,'' तेव्हा ते तिला जिव्हारी लागलं. ती उसळून म्हणाली, ''तो काय किडामुंगी व्हता चिरडून टाकायला? आन तुला हकच कुटं हाय मला असं बोलायचा? तू नवऱ्याला सोडून दुसऱ्याचा हात धरून गेलीस. मला माजा बाप कंदी दिसला बी न्हाई. मी नाव लावलं त्येबी त्याचं न्हाई. का सोडलंस त्याला? कुटं हाय तो? जिता तरी हाय का?''

ह्याला आईनं उत्तर दिलं नाही. सीता तान्ही असताना तिला नि तिच्याहून थोरल्या दोन भावांना घेऊन आई आपल्या नवऱ्याला सोडून दुसऱ्याच्या मागे गेली होती. तो सुद्धा तिच्यापाशी अधनंमधनंच येऊन रहायचा. मोठी झाल्यावर सीतेनं कधीतरी थोरल्या भावाकडून ही गोष्ट ऐकली

होती आणि आपण ज्याचं नाव लावतो तो आपला बाप नव्हे हे तिला समजलं होतं.

मुलगा जरा मोठा झाल्यावर त्याला चांगल्या शाळेत घालायला पाहिजे म्हणून ती माहेरच्या गावी येऊन राहिली. मोठं गाव आहे, तो बिघडण्याचा संभव जास्त, म्हणून ती त्याच्यावर कडक नजर ठेवायची. तो शाळेत कधी जातो, घरी कधी येतो, कुणाबरोबर फिरतो ह्याची सारखी चौकशी करायची. तो शाळेच्या वेळात कुणाबरोबर तरी व्हिडिओ बघायला जातो असं कुणी तरी तिला सांगितलं त्यावर तिनं त्याला मरेस्तो मारलं होतं. तो रडत रडत म्हणाला, ''सगळी तर पोरं बघतात. मग मी गेलो बघायला तर काय बिघडलं?'' तिनं त्याला समजावण्याचा प्रयत्न केला. ''पन साळंच्या येळात कशाला? अब्ब्यास कराया नको? आन आज तू दुसऱ्या पोराच्या पैशावर हिडिओ बगितलास. उद्या तो म्हणला तू मला दाव मंजी तू पैसा कुटून आणणार? माज्या येकलीच्या कष्टावर समद्या चयनी कराया पैसा पुरणार हाय का तुला?''

तिच्या धाकाने राजू थोडी वर्षं शाळा शिकला पण त्याला अभ्यासात फारसं डोकंही नव्हतं आणि त्याचं त्यात लक्षही नव्हतं. सीतेचा एक सावत्र भाऊ राजूपेक्षा चारपाच वर्षांनीच मोठा होता. तो पुण्यात ड्रायव्हरची नोकरी करायचा. रजेवर आला की त्याचा युनिफॉर्म, बूट, कापून सेट केलेले केस ह्या सगळ्याची राजूवर मोठी छाप पडायची. मामासारखी शहरात एखादी नोकरी, मोठा पगार, त्याच्यासारखी राहणी असं स्वप्न राजू पहात होता. पण सीतेच्या मनात त्यानं शहरात जावं असं मुळीच नव्हतं. तिथं तो कसल्या संगतीला लागेल, बहकेल अशी तिला भीती वाटायची. इथं माझ्या नजरेखाली आहे तोच बरा असं वाटायचं.

एक दिवस मामा राजूसाठी स्थळ घेऊन आला. लग्नाच्या विचाराने राजू हरखून गेला पण सीता म्हणाली, ''कशाला इतक्यात? त्याला लय शिकायचं हाय अजून.''

थोरला भाऊ म्हणाला, ''येडी का खुळी तू? त्याला बाप न्हाई धाकात ठेवाया. त्यानं कायतरी येडंवाकडं करण्यापरीस लगीन लावून दे त्याचं.''

''माजा राजा गुणी हाय. तो येडंवाकडं वागायचा न्हाई.''

''तो गुणी असून काय उपेग? त्याची आई वागते तसं तो वागणार?''

''मी काय वाकडं वागले?''

''ते तुजं तू समजून घे.''

सीता इतर बायांसारखं खालमुंडीनं काम करायची नाही. सगळ्यांशी हसूनखेळून असायची. कुणाचीही मस्करी करायची. एकदा खुरपताना दिसलेले चिकूच्या झाडावरचे सुरवंट एका पत्र्याच्या तुकड्यावर तिनं जमा केले. ''मुकादम, उसळीला सोरटं हवी का? लय चांगली लागत्यात म्हनं.''

एकदा एका झाडाच्या बुंध्याशी मातीत पोकळ घरटं करून बसलेली बेडकुळी तिला दिसली. तिनं ती हळूच एका फडक्यात धरून लालाच्या बनियनमधे टाकली. ती उड्या मारायला लागल्यावर लाला जो नाचायला लागला, सगळ्यांची हसता हसता पुरेवाट झाली. हे असलं वागणं सगळ्यांच्या डोळ्यावर यायचं. लोक म्हणायचे, ''दोन पोरांची आय हाय, तिनं असं वागायची कुटं रीत असते? बापय मान्सांशी इरभळ हसायचं, बोलायचं, त्यांच्या अंगचटीला जायचं?'' एकदा विठोबा म्हणाला त्यानं तिला पेरूच्या बागेत मुकादमाला मुका देताना पाहिलं म्हणून. सीतेनं असं कधी कबूल केलं नाही, पण सगळ्यांचा विठोबाच्या सांगण्यावर विश्वास बसला एवढं मात्र खरं.

सीतेनं भावाशी वाद घातला नाही. ती फक्त म्हणाली, ''बघू.'' पण मग राजू आजारी पडला नि त्याला नको तो रोग झाल्याचं डॉक्टरनं सांगितलं तशी सीता हबकली. तिनं मुकाट्यानं आलेलं स्थळ पसंत केलं. तिच्या मनात पाल चुकचुकत होती. मुलगी शहरगावची होती. राजूपेक्षा जास्त शिकलेली होती. नोकरी करीत होती. पण राजूला फार आवडली.

सून आली नि आठवडाभरात माघारी सुद्धा गेली. तिला म्हणे करमलं नाही. पब्लिक नळावरनं पाणी आणायचं, पब्लिक संडास वापरायचा असल्या गोष्टींची तिला म्हणे सवय नव्हती. ती गेल्यावर थोड्या दिवसांनी तिचा भाऊ आला. राजूला म्हणाला, ''माझ्याबरोबर चल. आमचे मालक तुला नोकरी देतील.'' सीता म्हणाली, ''कसली नोकरी?'' अशीच अडलं पडलं काम करायचं, कुठे बाजार करायचा, कुठे काही. मालकांचं मोठं खटलं आहे, त्यात एक माणूस सहज खपून जाईल. पुढे त्याचं काम पसंत पडलं तर त्याला दुसरं काही करायला वाव मिळेल.'' सीता चिडून म्हणाली, ''राजू येणार न्हाई. तुमी पोरीला मुकाट नांदाया पाठवा. घरजावई पायजेवता त

लग्नाआंदी तसं सांगायचं. म्हणे तिकडं यिऊन ऱ्हा. कशाला? तुमच्या मालकाचा घरगडी म्हणून राबाया?'' पण राजूची बायको परत आली नाही. आसपासचे लोक म्हणायला लागले, हिच्यापुढे कंची सून टिकणार हाय? सीता म्हणे, ''आवं पन मी तिला वाईट वागवायला तिनं हितं ऱ्हायलं तर पायजे ना?'' पण लोकांची तोंडं कोण धरणार?

सीतेनं धाकट्या भावाला खोदखोदून विचारलं तेव्हा सगळी हकीगत कळली. त्याच्या मालकाच्या घरी एक लांबची नातलग विधवा आश्रितासारखी राहून स्वैपाक करायची. ही तिची मुलगी. तिचं थोडंफार शिक्षण करून आपल्या अनेक व्यापात कुठेतरी मालकानं तिला एका लहानशी नोकरी दिली होती. पहिल्यापास्नं राजूला लग्न करून तिकडेच न्यायचं असा बेत होता. पण उघड तसं सांगितलं असतं तर सीता तयार झाली नसती. मामाचं मत होतं की राजूनं पुण्याला जावं. त्याच्या जन्माचं कल्याण होईल. त्यानं स्वाभिमान सोडून कुणा बड्या माणसाकडे आश्रितासारखं रहायचं आणि तो फेकील त्या तुकड्यावर जगायचं हे सीतेला पटणं शक्यच नव्हतं. पण लग्नाचं हे असं झालं म्हणून राजू हिरमुष्टा झालाय हे तिला दिसत होतं. शेवटी ती त्याला म्हणाली, ''जायचं का तुला राजा? जा मामाबरोबर जायचं तर.'' त्याच्या मनात जायचं होतं पण तिच्यासमोर तसं म्हणायची काही त्याला हिम्मत झाली नाही. तो म्हणाला, '' नाही जायचं मला. तिला माझ्याजवळ रहायचं असलं तर येईल इथं. नाहीतर गेली उडत.'' सीता आनंदानं म्हणाली, ''आस्सं! शेवटी मानसाला त्याचं सोताचं काय हवं का नाय? का आपलं बायकूनं खुणावलं की गेलं तिच्यामागं! तिची काय येवढी मिजास हाय? असल्या छप्पन पोरी तुज्या पायावर आणून घालीन.''

नंदाच्या लग्नाची मात्र सीतेनं घाई केली. पोरगी शाणी होऊन वरीस झालं. आपण दीसभर कामाला जाणार. ती एकलीच दुसरीकडे खुरपणीला. तिच्यावर कुठवर ध्यान ठिवणार? त्यापरीस लगीन होऊन नवऱ्याच्या घरी गेलेली बरी. तिला मिळालेला जावई तिच्या भावाबिवांना तितकासा पसंत नव्हता. पण तिनं विचार केला, काय वाईट आहे? कष्ट करून खाणारा आहे. आपण निराधार, विधवा. आपल्याला काय घर आहे का जमीन जुमला आहे का सरकारी नोकरी आहे म्हणून आपल्या पोरीला कुणी मालदार सांगून

येणार आहे? संजयचे आईवडील त्याच्या लहानपणीच वारलेले. त्याला मामा-मामीनं संभाळलं. तसे त्याचे चार चुलते, त्यांची मुलं अशी सगळी माणसं होती, पण ती त्याच्या बापाच्या वाटणीच्या जमिनीचा हिस्सा गिळून बसलेली. ती कशाला त्याच्याशी आवर्जून संबंध ठेवणार? तेव्हा नंदा सासरी म्हणजे संजयच्या मामाच्या घरी गेली.

रानात नि घरात फुकटात राबायला मिळालेली मोलकरीण म्हणून आपल्याला वागवलं जातंय म्हटल्यावर नंदानं आईकडे तक्रार केली. आईनं समजूत घालून तिला परत घालवली. एकदोनदा असं झाल्यावर सीता जाऊन संजयच्या मामीला भेटून आली. तिला गोडीत सांगितलं की पोर लहान आहे, तिला संभाळून घ्या. ती कामाला नको म्हणायची नाही, पण असं राबवून घ्यायची कुठे रीत असते का? पण नंदाच्या मागचा जाच काही सुटला नाही. ती वैतागून आईकडे यायची, मग संजय तिला घेऊन जायचा. शेवटी कंटाळून सीतेनं तिच्याजवळ येऊन रहायला संजयचं मन वळवलं. तसं संजयलाही मामीचं मोठं प्रेम होतं असं नाही. आपल्या सासूनं कशाला ही ब्याद आपल्या गळ्यात घातली असंच तिला वाटायचं. तिला मूल नव्हतं पण संजयला काही तिनं पोटचा असल्यासारखं वागवलं नाही.

सीता ज्या झोपडपट्टीत रहायची तिथेच तिनं आपल्या शेजारी मुलीला नि जावयाला छप्पर बांधून दिलं. ती जिथे काम करायची तिथला एक गडी सोडून गेला होता त्याच्या जागी संजयला काम मिळालं. नंदाला दिवस गेले. सगळं मनासारखं झालं.

कामावर येताना नि जाताना सीता संजयच्या सायकलवर डबलसीट बसायची. पोरीला सकाळीसकाळी उठून धावपळ करायला नको म्हणून सीता त्याच्यासाठी भाकरी करून आणायची. भाकरी खाताना किंवा शेजारी काम करीत असले की त्यांच्या गप्पा, हास्यविनोद चालायचे. सीतेची आई एकदा तिला म्हणाली, ''सिते, मला ठावं हाय तू माजं ऐकनार न्हाईस म्हणून, पर जावई मान्साशी इक्ती घसट बरी न्हवं. लोकं बोलत्यात.'' पण सीता म्हणाली, ''आपल्या मनात पाप न्हाई तर आपण कशाला भ्यायचं कुणाला?''

एक दिवस संजय तिला म्हणाला, ''मामी, काल रात्री कुठं गेलता?''

''कदमांच्यात. कंदीमंदी जात असते बसाय-बोलायला.''

''मी आल्यापारनं बगितलं न्हवतं तुमाला गेल्यालं.''

''तर काय. लई दिसात गेले न्हवते म्हणून बोलावलं व्हतं यिऊन जा म्हणून.''

''कुणी बोलावलं?''

''मंजी? शांताबाईनं.''

''मी म्हटलं दुसऱ्याच कुणी.''

सीतेला ह्याचा अर्थच कळला नाही. पण मग तो दुसराच काही तरी विषय काढून बोलायला लागला तेव्हा तिनं ते तेवढ्यावर सोडलं.

पुन्हा संजय एक दिवस म्हणाला, ''काल कोण आलं व्हतं तुमच्याकडे?''

''का वं? रामभाऊ व्हते.''

''असं कुठल्यातरी पुरुषमाणसानं आवशी तुमच्याकडे येणं बरं दिसत न्हाई.''

''तो कुठलातरी न्हाई. मला भैण मानली हाय त्यानं.'' संजय मोठ्याने हसला.

''हसताय कशापाई? खरं तेच सांगतेय.''

''असल्या गोष्टीवर कुणाचा इस्वास बसत नसतो मामी. तुमी एकल्या बाईमाणूस. तुमाला येवडं कळू नाई?''

''एकली कशी? राजा हाय की.''

''काल व्हता का?''

''आंदी नव्हता. तालमीत गेलावता. मंग आलाच की.''

ह्यावर संजय काही बोलला नाही. चांगला शहाणासुरता, सरळ वागणारा माणूस एकदम असं का करायला लागला सीतेला कळेना. पण त्याबद्दल रागवावं तर दुसऱ्या दिवशी जणू काही वेगळं घडलंच नाही असं गोडीत वागायचा. जाऊ दे म्हणून ती सोडून द्यायची. एकदा ती रात्री कुठेतरी गेली होती. तर परत आल्यावर राजूने तिला सांगितले, दाजी येऊन विचारीत होते मामी कुठे गेल्यात, कुणाकडे गेल्यात म्हणून. ती तडकली. दुसऱ्या दिवशी तिनं संजयला विचारलं, ''तुमी का लई चवकशा करता मी कुठं जाते म्हणून? मला कुणाची चोरी हाय का काय कुटंबी जायला?''

संजय अगदी साळसूद चेहरा करून म्हणाला, ''मी कुठं काय म्हणतोय?

काल डोकावलो तर राजू एकलाच दिसला. म्हणून सहज म्हटलं मामी कुठं गेल्यात. तुमाला राग येत असंल तर नाय इच्चारणार पुना.''

''तसं न्हवं हो,'' म्हणून सीतेनं माघार घेतली.

कामाच्या ठिकाणी तमाशा केल्यापासून नंदा तिच्याशी धडपणे बोलली नव्हती. तरी सीतानं जाऊन तिला विचारलं संजय अलिकडे असा का करतो म्हणून. नंदा फटकन म्हणाली, ''ते तुलाच ठावं, तुमी बरोबरच काम करता न्हवं? मंग मला कशाला इचारतीस?'' नवरा-बायकोचं काहीतरी बिनसलं असेल, आपण कशाला त्यात पडा म्हणून सीता गप्प राहिली.

थोडे दिवस सुरळीत गेले. मग एक दिवस संजय कामावर नव्हता तर सुट्टी झाल्यावर घरी जाताना सीता दुसऱ्या कुणाच्या सायकलवर चालली होती. हा आडवा आला.

ती म्हणाली, ''गावाहून आला बी इतक्यात?''

''दिसतोय ना आलेला? एक दिवस चालत घरी गेला असता तर तंगड्या तुटल्या असत्या व्हय तुमच्या? आन तू रे. कुणालाबी चार चौघांच्या देखता सायकलवर घेऊन जातोस. लाज न्हाई तुला?''

तो पोरगा तडकला. ''लाज कुणाची काढता?''

संजय अस्तन्या सारायला लागला तशी सीता त्याच्या समोर उभी राहिली. ''असं काय करता येड्यावाणी? तो माज्या राजाचा मित्र हाय, मला मुलासारका.''

''हां. माहीत हाय मला. मुलासारका. ए, जा फूट. पुना आसं दिसलं तर जित्ता सोडणार न्हाई तुला.''

सीता आता पुरती खवळली, ''त्याला येडंवाकडं बोलायचं काम न्हाई.''

''न्हाई कसं? तुला म्हाताऱ्यापासून पोरापर्यंत कुणीबी चालतं. कुणी म्हनं भाऊ, कुणी म्हनं मुलगा. तू कसं बी वागणार पर हिकडं आबरू आमची जाती. हे असलं मी खपवून घेणार न्हाई, बजावतोय.''

सीता ओरडली, ''कुणाची आबरू जाईल असं काय बी मी केल्यालं न्हाई. आन तू मला बजावणारा कोण रं? नवरा हायस का माजा?''

तिच्या डोळ्याला डोळा भिडवीत संजय म्हणाला, ''तसंच समज.''


तो सायकलवर टांग टाकून निघून गेला. सीता घरी गेली ती धुमसतच. हाताशी एक काठी घेऊन ती न जेवताखाता संजयची वाट बघत बसून

राहिली. तो उशिराच घरी आला. त्याची चाहूल लागली तशी ती उठून बाहेर गेली. त्याच्या मागोमागच त्याच्या घरात शिरली नि तिनं त्याला काठीचे तडाखे हाणायला सुरूवात केली. तिनं एकाएकी हल्ला केल्यामुळे तो इतका बावचळला की त्याला प्रतिकार करायचंही सुचलं नाही. बरं, सासूकडनं मार खाताना आरडाओरडा केला तर चार लोकांत शोभा व्हायची. तिचा राग शमला तोवर त्याची पाठ काळीनिळी झाली होती.

तो पुटपुटला, ''सासूनं जावायाला मारायचं असलं इपरीत कुटं घडतं का कंदी?''

ती म्हणाली, ''पुना तुमी मला येडंवाकडं बोलला त्येबी चार लोकांसमोर, तर म्या तुमाला जितं सोडणार न्हाई येवढं ध्यानात ठिवा.''

❖❖❖



# नकुसा

आधी मुलगी सगळ्यांना जन्मल्यापासून नकोशीच असते. त्यातून तिची आई तिच्या लहानपणीच मेली आणि तिच्या बापाने दुसरं लग्न करून नव्यानं पोरं काढायला सुरुवात केली की तिचा जास्तच अडथळा वाटायला लागतो. नकुसाच्या बापानं तिचं बारा-तेराव्या वर्षी लग्न करून देऊन तिचा अडथळा दूर केला. नवरा तसा बरा होता, पण ही वर्णाने जरा उजळ, नाकीडोळी नीटस, तर तो हेंगाडा, दात पुढे असलेला. त्याची थोडी जमीन होती पण ती भावाशी भागीदारीत. त्याचं उत्पन्न दोघांपुरेसं काय एकट्यापुरेसं सुद्धा नव्हतं म्हणून पोटासाठी शेतमजुरी करावी लागायची. लग्न झाल्यावर सासऱ्याने त्याला जवळच्याच एका बागाईतदाराकडे कायम काम मिळवून दिलं. आणि तो सासऱ्याच्याच गावी खोप बांधून रहायला आला.

दशरथला दारूचा नाद होता. म्हणजे रोज दारू पिऊन नकुसाला मारहाण करायचा वगैरे असं काही नाही. पण दर आठवड्याच्या बाजाराच्या दिवशी तालुक्याच्या गावाला बाजार करायला म्हणून जायचा तेव्हा प्यायचा. बरं, प्यायला तर एकटा नाही प्यायचा. गावातली पाहुणेमंडळी बाजाराला यायची त्यांना बोलावून दारू पाजायचा. त्याच्या ह्या गुणाचा लवकरच बोलबाला झाला आणि अनेक फुकटे येऊन त्याला चिकटायला लागले. फुकटच्या मोठेपणाची त्याला झिंग येत होती पण ह्या व्यसनापायी बराच पैसा खर्च झाल्यामुळे घरी पुरेसं धान्य, भाजीपाला, तेल येईना. उपासमार व्हायला लागली म्हणून नकुसा शेतमजुरी करायला लागली. पण तिचा पगारही दशरथ मागून न्यायचा. ती देत नाही म्हणाली तर तिला बडवायचा. बाप शेजारी असून जावयाला धमकावण्याची कुवत त्याच्यात नव्हती म्हणा, किंवा संसार हा असाच चालायचा, त्यात जगावेगळं काय आहे असं वाटत होतं म्हणून म्हणा, त्यानं ह्या बाबतीत काही दखल घेतली नाही.

दशरथचं खर्चाचं आणखी एक कलम होतं ते म्हणजे त्याची जिमिन. लांब येऊन राहिला तरी त्यानं जमिनीवरचा हक्क सोडला नव्हता. मग दर पेरणीच्या हंगामाच्या आधी भाड्यानं बैल-औतं घेऊन नांगरट, कुळवणी करायची, शेणखत टाकायचं, पेरणी, काढणी, मळणी ह्या सगळ्याचा खर्च, पुन्हा रजा घेऊन गावी जाण्यासाठी केलेले खाडे ह्या सगळ्याचा हिशेब तो कधी मांडीत नसे. घरी यायची ती दोन-तीन पोती ज्वारी. ती आपल्याला किती महागात पडते हा विचार त्याच्या कधी मनात आला नाही. भाडं भरून

एस्टीनं ती पोती आणताना, छकडा करून घरी आणून टाकताना तो अभिमानाने फुललेला असायचा. पोती उतरवून घेऊन घरात आणून ठेवली की तो आणि नकुसा जमीनदाराच्या थाटात वावरायचे.

तेवढा दाणा घरी खायला ठेवला असता तर थोडी तरी बेगमी झाली असती. पण कसल्या तरी नडीपोटी ज्वारी विकायची, असं करीत लवकरच ती संपून जायची. परत उपासमार सुरू व्हायची.

एकदाच कधी तरी सणाला मुलांना कपडे घ्यायला नकुसानं बापाकडे पैसे मागितले, ते सुद्धा उसने, तर त्यानं आपली परिस्थिती किती बिकट आहे ह्याचं इतकं रडगाणं लावलं की तिनं पुन्हा बापाच्या दारात जायचं नाही म्हणून कानाला खडा लावून घेतला.

बापाचंही बरोबर होतं. त्याच्या नव्या बायकोला एकीपाठोपाठ एक अशा दोन मुली झाल्या. त्यांच्या पाठीवर मुलगा. मुलांना संभाळायला दुसरं कुणी नव्हतं म्हणून ती कामाला जात नसे. पुन्हा ती तरुण बायको म्हणून तिची थोडी हौसमौज करावीच लागे. जमिनीचं उत्पन्न काही ह्या सगळ्या गरजा भागवण्यापुरेसं नव्हतं तेव्हा वयानुसार झेपत नसून सुद्धा त्याला मजुरी करावी लागायची. त्यात तो आणखी मुलीला मदत काय करणार? त्यातून त्याची बायको जवळजवळ आपल्याएवढ्या सावत्र मुलीला पाण्यात पहायची. एवढंसं काही बापाघरून पोरीकडे गेलेलं तिच्या तीक्ष्ण नजरेला दिसलं की ती आकाशपाताळ एक करायची. दारात एक आंब्याचं झाड होतं. वर्षाआड त्याला भरपूर आंबे लागायचे. एकदा बापाने नकुसाकडे पाच-पंचवीस आंबे दिले तर बायकोनं थयथयाट केला.

''आपल्या पोरांच्या तोंडचा घास काढून तिची भर करता.''

''अगं, पर लय आंबं हायती, आपल्याच्यान् सरायचं न्हाईत. वाइच तिच्या बी पोरांला खाऊ दे की.''

''सरायचं न्हाईत तर बाजारला निऊन इकावं म्हन्ते मी. आपल्याला कंची बी नड नसल्यासारकंच वागताय तुमी बी.''

नकुसाला कसलासा आजार झाला. वरच्यावर ताप यायचा, अशक्तपणा वाटायचा. फारच आजारी झाली तर दशरथ तिला औषधाच्या दुकानातनं कसल्यातरी गोळ्या आणून द्यायचा. तेवढ्यापुरतं बरं वाटलं की ती उठून कामाला लागायची. एकदा ती फारच मागे लागली म्हणून तिला सरकारी दवाखान्यात घेऊन गेला. डॉक्टरने तिला बरीच औषधं लिहून दिली. अंगात

रक्त फार कमी आहे म्हणाला. त्यासाठी इंजेक्शनं द्यावी लागतील म्हणाला. इतक्या लांब इंजेक्शन घ्यायला वरच्यावर येता येणार नाही असं दशरथने त्याला सांगितलं. तेव्हा त्याने गोळ्या लिहून दिल्या. खूप दिवस घ्याव्या लागतील म्हणाला. खाण्यापिण्यावर जरा लक्ष ठेवा, भाज्या बिज्या भरपूर खायला पाहिजेत म्हणाला. दशरथने औषधांच्या दुकानात जाऊन पाचसहा दिवसांपुरती औषधं आणली.

तेवढ्यापुरती नकुसाची तब्बेत जरा सुधारली. ती म्हणाली, ''अवं, औषधं संपल्यात. बाजारच्या दिशी गावात जाल तवा धिऊन या.''

''हां तुला इरभळ औषधाचा खुराक द्यायचा मंजी आमी समद्यानी उपाशीच न्हायला पायजे.''

मग नकुसा काही बोलली नाही. बघता बघता तिची तब्बेत पुन्हा बिघडली. अमुक दुखतंय असं तिला सांगता येईना, पण काही तरी होत होतं एवढं खरं. अंगात बळच नव्हतं. हळूहळू रानातलं काम बंदच झालं, पण घरातलंही होईना. त्यातच तिला नीट चालता येईनासं झालं. पाय ओढीत ओढीत कशीबशी चालायची. वस्तीवरली माणसं म्हणायला लागली, ''दशरथ, तिला चांगल्या डाक्टरला दाव. तिच्या अंगावरनं वारं गेलंय जनू.'' शेवटी लोकांच्या आग्रहाने का होईना, त्यानं तिला सायकलवर घालून डॉक्टरकडे नेली. डॉक्टरनं बऱ्याच तपासण्या केल्या, शेवटी म्हणाला, तिच्या पाठीच्या कण्याला काहीतरी झालंय. पुण्याला नेऊन दाखवलं पाहिजे. आता तिला पुण्याला घेऊन कोण जायचं, म्हणून दशरथनं तिला तशीच घरी आणली. पण ती बरी व्हायची काही लक्षणं दिसेनात. उलट तिला आता आधाराशिवाय चालता येईनासं झालं. शेवटी दशरथनं मालकाकडून उचल घेऊन तिला पुण्याला नेलं. हॉस्पिटलमध्ये डॉक्टर म्हणाले तिच्या मणक्याबर गाठ आहे. ती ऑपरेशन करून काढली पाहिजे. नकुसाचं ऑपरेशन झालं. पण तिच्या परिस्थितीत काही फरक पडला नाही. मग डॉक्टर म्हणाले, ''तुम्ही फार उशीर केला. तिला लवकर आणली असती तर ती बरी होऊ शकली असती.''

दशरथने तिला घरी परत आणलं. आता तिचा कमरेखालचा भाग संपूर्ण लुळा पडला होता. तिला उठून बसता येईना की खुरडत चालता येईना. दशरथ तिला तिच्या बापाकडे घेऊन गेला. म्हणाला, ''तिला तुमच्याकडं ठिवा थोडं दीस.''

''हितं कशापाई? तिचं कोन करनार?''

''आय हाय की तिची. घरातच असती न्हवं? मी एकला तरी कुठवर करनार? तिला संबळू का पोरांचं बगू का काम करून पोटाला मिळवू?''

''त्ये मला काय ठावं नाय. तुमी आपल्या गावी निऊन ठिवा तिला. तुमची बी मान्स हायती की. आता लगीन करून दिल्यावर आमची काय जबाबदारी? तुमचं तुमी बगून घ्या.''


आधी त्याला जबाबदारी घ्यायचीच नव्हती. पण पोरीची अवस्था बघून कणव आली असती तरी तिला घरात ठेवून घ्यायचं तिच्या सावत्र आइनं कधीच पत्करलं नसतं. दशरथच्या घरी पण तसं तिची देखभाल करील असं कुणीच नव्हतं. तेव्हा आहे इथंच राहून आला दिवस रेटायचा एवढंच करणं शक्य होतं. नकुसाची मुलगी नऊ-दहा वर्षांची होती. ती थोडीफार मदत करायची. आजारी झाल्यावर नकुसानं तिला भाकरी करायला शिकवलं होतं. पण आईला आधार देऊन बसतं करायचं, थोडंफार खाऊ पिऊ घालायचं, तिचं गू-मूत साफ करायचं हे सगळं काही पोरीला जमलं नसतं. दिवसभर काम करून उरल्या वेळात दशरथ आपल्या बुद्धीप्रमाणे, जमेल तशी बायकोची सेवा करीत होता. पण तोही वैतागला होता.

काही दिवसांनी नकुसा आधार घेऊन बसू सुद्धा शकेनाशी झाली. तिची वरच्यावर कूस बदलायला पाहिजे, तिचं शरीर हलतं रहायला पाहिजे हे दशरथला माहीत नव्हतं आणि आळसापायी तिचं अंग पुसणं, कपडे बदलणं हे तर त्यानं सोडूनच दिलं होतं. मग तिला सगळ्याभर व्रण झाले, त्यात पू झाला. व्रणांची दुर्गंधी इतकी वाढली की तिला बघायला कुणी येईनासं झालं. दशरथला आणि पोरांना सुद्धा ते असह्य व्हायचं.

शेवटी मरणानेच तिला ह्या यातनांतून आणि विटंबनेतून मुक्ती मिळाली. तिला अशी सुटका नको होती. ती शेवटपर्यंत मी बरी झाले की अमकं करीन तमकं करीन असंच म्हणत होती.

दशरथ आता परत लग्न करायची भाषा बोलतोय. मुलांचं तो एकटा कसं बघणार? शिवाय भाकरी करून घालायला कुणी तरी हवंच.

❖❖❖



# यमुना

यमुना नेहमीप्रमाणे गाणं गुणगुणत भराभरा पाय उचलीत आली. तिनं घरात पाय ठेवला नि रेखा म्हणाली, ''तो बाबा फिरून हितं आलेला मला नाही खपणार.'' आपल्या आईनं ज्याच्याशी दुसरा संबंध केला त्याला ती बाप म्हणायची नाही. यमुनेनं पोरीच्या डोळ्यांतला अंगार पाहिला, म्हातारीचे घट्ट मिटलेले ओठ, थिजलेला चेहरा टिपला. तशी हल्ली एरवी सुद्धा पोरगी तिची काही पत्रास ठेवीत असे असं नाही, पण आजचा नूर काही वेगळाच होता.

''काय झालं?'' तिनं आईला विचारलं.

''व्हायचंय काय? तो हितं आला होता. त्याच्या पाठोपाठ ती अवदसा. नाही नाही ते बोलली. तिचं काय तोंड आहे? संडास आहे नुसता. सगळ्या आळीला फुकटात तमाशा. तुला काय शेण खायचं ते खा पण त्याचे शिंतोडे आमच्या अंगावर नकोत, समजलीस? पुन्हा तो हितं आला तर पोलिसात वर्दी देईन.''

यमुना काही न बोलता घरात आली आणि डोक्यावरचं गाठोडं उतरवून त्यातले कपडे वेगळाले करायला लागली. तिच्या मनात आलं, म्हातारी येवढं फडाफडा बोलली पण माझ्या घरातनं चालती हो नाही म्हणाली. कसं म्हणेल? मग म्हातारपणी तिला कोण सांभाळणार?

यमुनेचं लग्न होऊन चारपाच वर्षं झाली होती तेव्हा एक दिवस ती नवऱ्याला म्हणाली, ''माझे वडील थकलेत, त्यांच्यानं काम रेटत नाही. आईला कुणीतरी मदतीला पाहिजे. आपण त्यांच्यापाशी जाऊन राहू.'' नवरा कबूल झाला नाही. तशा त्याला इतर जबाबदाऱ्या होत्या असं नाही. त्यांची लाँड्री होती पण ती थोरला भाऊ चालवायचा आणि हा नुसता नोकरासारखा राबायला. आईबापांकडे जाऊन राहिलं तर त्यांच्यामागे त्यांचं घर, धंदा मुलीला आणि जावयाला मिळालं असतं. पण त्याला नाही पटलं. एवढा हुंडा देऊन बायको आणली ते काय पुन्हा सासऱ्याकडे जाऊन घरजावई होऊन रहायला? शेवटी यमुना एकटीच मुलीला घेऊन आईकडे निघून आली. त्यांचा परटाचा धंदा होता त्यात ती मदत करायची. नवऱ्याला वाटलं होतं येईल थोड्या दिवसांनी परत. पण ती जायचं नाव काढीना. तो दोनचारदा येऊन गेला तिला न्यायला. ती म्हणे, ''पण तुम्हाला इथं येऊन रहायला काय झालं? काय वाईट आहे इथं?'' तो त्याला तयारच नव्हता. शेवटी रागावून तो म्हणाला, ''तुला बऱ्या बोलानं यायचंय की नाही? मी

पुष्कळ ऐकून घेतलं तुझं. आता पुन्हा मी तुला न्यायला यायचा नाही.''
तिचं चित्त चलबिचल झालं. ती आईला म्हणाली, ''जाऊ का मी त्यांच्याबरोबर?''

''जातीस तर जा. आमचं काय म्हातारा-म्हातारीचं? आम्ही कसं बी निभावून नेऊ. जा तू.''

आईनं असं म्हटल्यावर तिचा पाय निघेना. लवकरच तिचा बाप मरून गेला. मग तर आईला एकटं सोडणं शक्यच नव्हतं. यमुनेचा नवरा सासूला आपल्या घरी नेऊन संभाळायला तयार होता, पण म्हातारीला आपलं गाव, घर सोडून परावलंबी आयुष्य पत्करायचं नव्हतं. शेवटी त्याने यमुनेचा नाद सोडून दुसरं लग्न केलं.

हळूहळू रेखा मोठी झाली, चार इयत्ता शिकली. कामातही तिची मदत व्हायला लागली. म्हातारी थकली होती, ती घरी राहून घरचं बघायची. एकूण त्यांचं चांगलं चाललं होतं. फक्त मधनं मधनं यमुनेला वाटायचं, मी एक नवऱ्याला सोडून आईपाशी येऊन राहिले. पण माझी मुलगी कशावरून माझ्यापाशी राहील? मग आई गेल्यावर मला कुणाचा आधार?

गोविंदा तिला धुण्याच्या घाटावर दिसायचा. एकदा रेखा मदतीला नव्हती तेव्हा जाड चादरी पिळायला त्यानं तिला मदत केली. त्यातनं त्यांची ओळख झाली. त्याला मूल नव्हतं. त्याची कजाग बायको साऱ्या परीट आळीला माहीत होती. एखाद्यानं टाकून दिली असती. हा सज्जन म्हणून संभाळायचा, पण त्याला संसारात कसल्या तऱ्हेचं सुख नव्हतं.

तिची गोविंदाशी ओळख झाल्यापास्नं रेखा घाटावर येईनाशी झाली. आजीनं का ग म्हणून विचारलं तेव्हा ती म्हणाली, ''ती त्या बाबाशी गुलुगुलु बोलत बसते. मला नाही आवडत.'' म्हातारीच्या कानावर कुणकुण आलीच होती. एक दिवस यमुनेचं कपड्यांचं गाठोडं पोचवायला तो तिच्याबरोबर आला तेव्हा म्हातारी खवळली.

''त्याला इथं का आणलंस?''

''काय बिघडलं आणलं म्हणून? माझं गठुळं लई जड होतं ते घेऊन आला तो.''

''तो चांगला माणूस नाही. लोकं त्याच्याबद्दल काहीबाही बोलतात.''

''लोकं काई बी बोलतील. तुला माहीताय का त्यानं कसलं वंगाळ काम केलं म्हणून?''

म्हातारी गप्प बसली. यमुना म्हणाली, ''आई, मी त्याच्याशी दुसरा संबंध करणार आहे.''

''काय? डोस्कं ठिकाणावर आहे का तुझं? चांगलं लग्न लावून दिलं त्याच्याबरोबर नांदली नाहीस. आणि हा कोण कुठला एका बायकोचा नवरा शोधलास?''

एवढं झाल्यावर म्हातारी तिच्याशी धड बोलायची नाही. बोललीच तर तिरकस बोलायची. रेखाचं पण तसंच. फटकन उलट बोलायची. तिनं दोनचार घरी कामं धरली होती, पैसे मिळवीत होती. यमुनेनं खूणगाठ बांधली पोरीला मिळवतेपणाचा माज आला म्हणून. आपण कुणाचं काय वाकडं केलं म्हणून त्या दोघी आपल्याशी असं वागतात हे तिला कळेना. तिनं स्वप्न पाहिलं होतं, गोविंदा आपल्याकडे रहायला येईल, कामाला हातभार लावील. नाहीतरी वडील गेल्यापास्नं पुरुषमाणूस नव्हतंच कुणी घरात. तर आईचं हे असं. आणि मग गोविंदा बायकोला सोडून तिच्याकडे रहायला तयारच नव्हता असं तिच्या ध्यानात आलं.

ती आजारी होती म्हणून दोनतीन दिवस घाटावर गेली नव्हती तर गोविंदा विचारायला घरी आला. त्याच दिवशी जरा बरं वाटलं म्हणून ती बाहेर गेली आणि त्यांची चुकामूक झाली, तेव्हा रेखानं नि म्हातारीनं मोठा तमाशा केला. मग तिनं त्याला सांगितलं पुन्हा माझ्या घरी येऊ नको म्हणून.

''तुला बरं नव्हतं म्हणून चवकशी करायला आलो.''

''तेवढंही नाही यायचं. घर आईचं आहे. तिला नाही आवडत तुम्ही आलेलं.''

''म्हंजे मी तुला भेटायला कधी तिथं यायचंच नाही?''

''तुम्ही तुमच्या बायकोला सोडीत नाही तवर नाहीच.''

''तिला तरी दुसरं कोण आहे?''

''ते मला ठाऊक नाही. पण ती तुमची बायको आहे तवर ती तुमच्यावर हक्क सांगणार. त्या दिवशी तुम्ही येऊन गेल्यावर ती आली होती. ओरडली, आरडली, घाण घाण शिव्या दिल्यान. ही माणसं जमली होती गंमत बघायला.''

गोविंदा तिला म्हणाला तू माझ्याकडे रहायला ये. पण एक तर ती म्हाताऱ्या आईला न् लेकीला सोडू शकत नव्हती आणि त्याच्या घरी ती अवदसा यमुनेला सुखानं राहू देणं शक्य नव्हतं. पण हा तिढा सोडवायचा

कसा द्यावर ती डोक्याला फार त्रास करून घेत नसे. तो तिचा स्वभाव नव्हता. जे होईल ते होईल असं म्हणून ती आला दिवस आनंदात घालवायची.

शेजारणी पाजारणींनी आडून आडून विचारायला सुरुवात केली तेव्हा रेखाला कळलं आईला दिवस गेलेत म्हणून. तोपर्यंत तिला थोडी तरी आशा होती की ती कधी ना कधी त्या बाबाचा नाद सोडून देईल म्हणून. पण आता तिच्या मनात काय आहे तेच रेखाला कळेना.

यमुनेला मुलगी झाली. बाळंतपण तिला फार अवघड गेलं. त्यात ती आजारी झाली. मरता मरता वाचली. दोनतीन महिने काम बंदच होतं. त्यात औषधं, इंजेक्शनं चालू होती. अंगावर दूध नव्हतं म्हणून पोरीसाठी पावडरचे डबे लागायचे. रेखानं सगळं एकटीच्या हिमतीवर निभावलं. गोविंदानं एकदा तिला बाहेर गाठून यमुनेशी चवकशी केली, पैसे द्यायला बघितले पण तिनं ते घेतले नाहीत.

हळूहळू यमुना बरी झाली, धुणं धुवायला जायला लागली. पण तिची तब्बेत पहिल्यासारखी राहिली नाही. आधी ती कपड्याचं गाठोडं डोक्यावर घेऊन लयीत चालायला लागली की आळीतले बाप्ये तिच्याकडे बघत एकमेकांना डोळ्याने खुणावायचे. आता तिची रयाच गेली. बसलेले गाल, आजाराने काळवंडलेलं तोंड, सुरकुतलेले ओथंबलेले स्तन, अशी ती पाय ओढीत चालायची. पहिल्यासारखी बडबड न करता शिंपल्यासारख्या डोळ्यांनी मख्खपणे लांब कुठे नजर लावून बसायची. बेबीही तसलीच. वर्षाची होत आली तरी कोलमडत जेमतेम उठून बसायची. तिला सदा काही तरी झालेलं असायचं, सर्दी नाहीतर ताप नाहीतर जुलाब. सारखी किरकिर किरकिर करायची. एखाद्या वेळेला रेखाला वाटायचं, ह्या दोघी बाळंतपणातच खलास झाल्या असत्या तर बरं झालं असतं.

एक दिवस अंधारात घरी येताना बोळाच्या तोंडाशी ती दोघं बोलत उभी असलेली पाहिली तशी रेखाला उमजलं की आईनं त्या बाबाचा नाद काही सोडला नाही. त्यानंच तिचं मातेरं केलं. आंधी कशी रसरशीत दिसायची. एवढ्या तेवढ्यावरनं हसायची. कुठल्याशा सिनेमातलं गाणं म्हणून नाचून दाखवायची. आता गाणं, नाचणं तर जाऊ दे, साधं हसू सुद्धा तिच्या तोंडावर दिसत नाही. हे त्याचंच काम. आमचं सगळ्यांचंच सुख त्यानं ओरबाडून घेतलंय आणि तरी ती त्याच्याच मागे असते. रेखाचा

जीव तडफडला. ती तरातरा घरी आली आणि तोंड मिटतेस का हाणू म्हणून बेबीवर खेकसली.

पण हळूहळू होतं ते अंगवळणी पडायला लागलं. सारखा रागराग सुद्धा होईनासा झाला. यमुनेची तब्बेत थोडी सुधारली. रेखाच्या मनानं उभारी धरली.

रथाची जत्रा आली तेव्हा ती हौसेनं बाजारात गेली. नवीन कानातलं घेतलं, लाल खड्याची चमकी घेतली नि मनगटभर लाल काचेच्या सोनेरी नक्षीच्या बांगड्या भरून घेतल्या. मग एक तयार कपड्यांचा ढीग दिसला तशी तिला बेबीची आठवण झाली. आपण तिला हिडिसफिडिस करतो तरी ती परवा तिच्या करवंदासारख्या गोल डोळ्यांनी आपल्याकडे बघून कशी हसली ते आठवलं. त्या बिचारीनं आपलं काय वाकडं केलंय? लहान पोर तर आहे ती. बेबीसाठी एक गुलाबी रंगाचा फुलाफुलांचा फ्रॉक तिनं घेतला.

ती घरी पोचली तेव्हा दारातच यमुना बेबीला मांडीवर घेऊन बसली होती. काय बोलावं, कसं द्यावं ते रेखाला कळलंच नाही. तिनं पिशवीतनं फ्रॉक काढून आईच्या अंगावर टाकला नि म्हणाली, ''हे घे. त्या पोरीला आणलंय.''

यमुना फ्रॉक उचलून बघतच राहिली नि एकदम खुदकन हसली, खूप मागे हसायची तशी. पण रेखानं पाहिलं तिच्या डोळ्यांत पाणी होतं.

रेखा म्हणाली, ''ही बघ, गुडदाणी आणलीय आणि केळी. देशी केळी तुला आवडतात ना, तसली. घे ना एक.''


''मला नको.''

''का?''

यमुना काही बोलली नाही. भूक नाही असं म्हणाली नाही. रेखाला छातीवर दगड ठेवल्यागत झालं. ती तिरीमिरीनं म्हणाली, ''असं का केलंस तू? मागल्या खेपेला ऑपरेशन करून घे म्हटलं तर घेतलं नाहीस. का नाही घेतलंस? तुला माझी मायाच नाही. गळ्याला दगड बांधून विहिरीत लोटून तरी दे मला.'' ती हमसून हमसून रडायला लागली. यमुनेनं तिला जवळ घ्यायला बघितलं तर तिनं रागानं तिला हिसडून टाकलं. यमुनेच्या डोळ्यांतनं पाणी वहायला लागलं. ती फक्त हलक्या आवाजात म्हणाली, ''रेखा, माझं ऐकून तरी घे. अगं, त्याला मुलगा नको का?''

❖❖❖

# रुक्मिणी



नाव चांगलं रुक्मिणी ठेवलं होतं पण लहानपणापासून सगळे म्हणायचे रुकी नाहीतर बेबी. ही थोरली. तिच्या पाठची, मुलगा व्हायला हवा त्याऐवजी जन्मली म्हणून ठकी. शेवटचा मात्र मुलगा झाला, बापू. रुकी चणीनं लहानखुरी, दिसायला बाहुलीसारखी दिसायची. छोटंसं पण सरळ नाक, अपुरी जिवणी, गोल डोळे, लांबटगोल चेहरा. पण रूपातला नाजुकपणा तिच्या आवाजात नव्हता. उंच किरट्या आवाजात किंचाळून बोलायला लागली की लोकं म्हणायची, ''ये, गप बस की. तुला पाखरं हाकलायला बशीवली का काय?'' तिचं बोलणंही फटकळ आणि स्वभाव तिखट. आसपासच्या वस्तीत भांडकुदळ म्हणून तिची कीर्ती होती.

हिच्या आईबापांचा धंदा फळं विकण्याचा. सीझनमधे असतील ती फळं लिलावात घेऊन विकायची. पेरूचा सीझन सुरू झाला की पहाटेपासून कुठल्या तरी बागेत पेरू तोडायचा नि गावात आणून फुटपायरीला विकायचा. लहान असल्यापासून रुकी आईबापांबरोबर पेरू काढू लागायची. जरा मोठी झाल्यावर चाळीस चाळीस किलोच्या पाट्या बागेतून वाहून आणायची. ठकी स्वैपाक करायची म्हणून पेरू काढायला फारशी मदत करीत नसे. बापू मुलगा म्हणून त्याला शाळेत घातला होता पण त्याला अभ्यास करण्यात काही गंमत वाटत नसे. शाळेला दांड्या मारून उनाडक्या करणं हा त्याचा उद्योग आईबाप घरी नसल्यामुळे त्यांना कळत नसे. जेव्हा कळला तेव्हा त्याला शाळेतून काढून आई आपल्याबरोबर पेरू काढायला आणायची. गावभर उनाडक्या करण्यापेक्षा आपल्या डोळ्यांसमोर असलेला बरा. आई म्हणायची, ''आमचा बापू पेरू लई भारी काढतो. एक बी दाढा निघायचा नाही त्याच्या हातनं.'' ती त्याला झाडावर चढायला सांगून शेंड्यातले पेरू काढायला लावायची. एकदोन झाडं काढून झाली की तो कंटाळून नुसत्या टिवल्याबावल्या करत बसायचा. रुक्मिणी सकाळभर नेटाने पेरू काढायची. पण ती पेरू लई भारी काढते असं काही तिची आई म्हणायची नाही.

त्यांना पैसे बरे मिळायचे पण बाप जुगारी होता. त्याला आकड्यावर पैसे लावायचा नाद. पैसे जसे हातात यायचे तसे जायचे. सर्व जुगाऱ्यांप्रमाणे कधी ना कधी आपला आकडा लागणार ह्याची त्याला खात्री होती.

फारशी हुंड्याची अपेक्षा नसलेलं स्थळ आलं तेव्हा जास्त खोलात न शिरता रुक्मिणीच्या बापानं तिचं लग्न लावून दिलं. त्यावेळी ती तेरा-चवदा वर्षांची होती. खरं म्हणजे तिचा नवरा त्यांच्या झोपडपट्टीच्या जवळच

रहायचा, पण तिच्या बापाने त्या कुटुंबाची फारशी चौकशी केली नाही. तिचा नवरा सदा तिच्यापेक्षा पाच-सहा वर्षांनी मोठा, चकणा, कायम नोकरी, कामधंदा नसलेला असा माणूस होता. त्याला दर काही दिवसांनी नवं काम बघावं लागायचं. प्रत्येक कामावरून त्याला चुकार म्हणून किंवा बारीकसारीक चोरी केल्याबद्दल हाकलून दिलं जायचं. मग काही दिवस तो घरी बसायचा, मग पुन्हा दुसऱ्या नोकरीचा शोध चालू. त्याचे दोन भाऊ पण तसलेच होते. लोक म्हणायचे ते बेणंच वाईट.

आपल्या घरी स्वत:च्या पायांनी चालून आलेली मुलगी नुसती राबवण्यासाठी नव्हे तर मारहाण करण्यासाठीही असते अशी सदा, त्याची आई आणि बाप ह्यांची समजूत होती. रुक्मिणी घरी तक्रार घेऊन गेली की आई म्हणायची, ''तूच नीट वागत नसशील. तुझं तोंड बी लई वाईट हाय. ज्याच्यात्याच्याशी भांडणं करतेस. असलं सासरी कसं ऐकून घेतील?'' मग तिनं माहेरी जायचं सोडून दिलं.

सगळ्यात भर म्हणून सदाची एक बाई आहे असं तिला कळलं. ती अचंबा करी, हा राती उशीरपरंत घरी येत नाही नि आला की माझ्यापाशी येत नाही असं का? मग तिला हे कळलं. लग्नानंतर दोन वर्षं झाली तरी हिला मूल नाही म्हणून सासू टोचून खोचून बोलायची. एकदा ही उसळून म्हणाली, ''तुमचा मुलगा माझ्यापाशी झोपत नाही मग कशी व्हायची मला मुलं? तिला होतील की.'' तेव्हा तिच्या सासूनं तिला खूप बदडलं होतं.

सगळ्या छळाला कंटाळून तिनं नवऱ्याच्या मागे भुणभुण लावली आपण वेगळं राहू म्हणून. तसा त्याचा एक भाऊ वेगळा रहात असे, पण तरी प्रथम सदानं दिला धुडकावून लावलं. तरी हळूहळू तिनं त्याला पटवलं की वेगळं रहाणं त्यांच्या फायद्याचं आहे. वेगळा रहाणारा भाऊ आईबापांना काही मदत करीत नव्हता. दुसरा भाऊ बाहेर काही काम करायचा नाही. घरची थोडी जमीन होती ती कसायचा. त्यात ज्वारी, थोडी कपाशी करून थोडीफार मिळकत व्हायची. तरी पण सदाच्या पगाराचा त्यांना मोठा आधार होता. त्यातनं रुक्मिणीला बाहेर काम करायची परवानगी नव्हती. घरच्या जमिनीवर भरपूर राबायचं. ज्वारी तयार झाली की काढणी करताना हात रक्ताळले तरी चालेल. पण त्यांच्या कुटुंबात बायकांनी दुसऱ्याच्या दारी कामाला जायची पद्धत नव्हती. रुक्मिणीनं नवऱ्याला सांगितलं, ''तुमचा भाऊ काई बी करीत नाही. त्याची बायकु बी तसलीच. आपन राबून त्यांना

का म्हून पोसायचं? वायलं राह्यलो की मी बी काम करीन. दोघं मिळवून सुखात खाऊ.'' शेवटी त्याला पटलं.

त्यांनी एक खोली भाड्यानं घेतली. रुक्मिणीनं रानात कामाला जायला सुरुवात केली. थोडं थोडं सामान घेत संसाराची जुळवाजुळव केली. हे वेगळे राहिले म्हणून आईबाप, भाऊ सगळे रागावले होते. त्यांनी काही मदत केली नाही.

ते रहात होते त्याच्या जवळच एक छोटासा प्लॉट विकाऊ होता. तो विकत घेऊन त्याच्यावर एक लहानसं घर बांधायचं स्वप्न रुक्मिणी पहात होती. दोघांच्या पगारातून चांगली शिल्लक पडत होती. पण काही दिवसांनी सदाची नोकरी गेली. दुसरं काम बघतो बघतो म्हणत तो काही करीना. रुक्मिणीच्या एकटीच्या पगारावर संसार चालला होता. अवचित एक दिवस तिला कळलं की सदाला दुसरीकडे काम मिळालं होतं पण तो घरी पैसे न देता त्याच्या ठेवलेल्या बाईची भर करीत होता. तिनं अकांडतांडव केलं तेव्हा त्यानं तिला बदडलं. तिला भारी राग आला. ती म्हणाली, ''मला पैसे देत नाही मग माझ्यापाशी कशाला ऱ्हाता? तिच्याकडेच जाऊन ऱ्हावा की.'' तो म्हणाला, ''जातोच. मग पुन्हा यायचा नाही इकडे. बोलवू नको मला मग तुला गरज लागली म्हणजे.''

तो निघून गेला. तो एकदम तिला सोडूनच गेला म्हणून ती हबकली. केवळ ती रागानं जा म्हणाली म्हणून तो गेला असं तिला वाटलं नाही. त्याच्या मनात जायचंच होतं, आपण जा म्हटलं हे नुसतं निमित्त झालं. ती मनातल्या मनात म्हणाली, ''जाऊ दे गेले तर. मी येकली ऱ्हाईन. माझं मी कमवून खाईन. मला नाही कुनाची जरवर.'' सदा गेल्यावर सुद्धा तिचा प्लॉट घेऊन घर बांधायचा बेत कायम होता. फक्त आता तिनं ठरवलं तीन खोल्या बांधायच्या, दोन भाड्यानं द्यायच्या नि एकीत रहायचं. सोबत होईल, नि महिन्याचं महिन्याला उत्पन्न पण मिळेल. हे सगळं करायला किती पैसे लागतील नि एकटीच्या पगारातनं तेवढे शिलकीत पडेपर्यंत किती वर्षं लागतील हा हिशेब ती करीत बसली नाही.

तिचा एक चुलता होता. लहानपणापासून त्याला तिचा लळा होता. त्याचं घर हेच तिचं खरं माहेर होतं. सणासाठी तो तिला आवर्जून बोलवायचा नि ती जायची. कधी रिकाम्या हाताने जायची नाही. कधी फळं, पोरांसाठी खाऊ, सणासाठी नारळ असं घेऊन जायची. त्या चुलत्याने हजारभर रुपये

देऊन तिच्या प्लॉटचं तिच्या नावानं साठेखत करून घेतलं. उरलेले सात हजार दोन वर्षांत भरायचे होते. रुक्मिणीनं आणखी एका ठिकाणी काम धरलं. संध्याकाळी सुट्टी झाल्यावर तास-दीड तास एका ऑफिसमधे झाडलोट, धूळ झटकणं, फरशा पुसणं असं काम. दोन्ही पगारातले जरूरीपुरतेच पैसे खर्चून बाकी सगळे शिलकीत टाकायची.

मधे तिच्या बहिणीचं लग्न झालं पण ती थोडेच दिवस नांदल्यावर घरी पळून आली. आईनं समजावलं, रागवून पाहिलं पण ती बधेना. नक्की कारण सांगेना. ते बरोबर वागवत नाहीत, मी पुन्हा तिकडे जाणार नाही एवढं मात्र ठाम सांगितलं. कुणीतरी रुक्मिणीला विचारलं तू बी का नाही जात माहेरी रहायला, तशी ती म्हणाली, ''आपलं त्यांच्याशी पटत नाही.'' तिनं ऐकलं की तिच्या बापाचा आकडा लागला नि त्याला बरेच पैसे मिळाले, दहाएक हजार. त्यानं तिला काही दिलं नाही एवढंच काय, स्वत:हून सांगितलंही नाही.

एक दिवस एकदम सदा आला. म्हणाला, ''मला परत इथे राहू दे. तुझंच बरोबर होतं. त्यांचा सगळ्यांचा नुसता माझ्या पगारावर डोळा आहे. जमिनीतला माझा हिस्सा माझ्या नावावर करून देत नाहीत. आता मी परत तिकडे जाणार नाही.'' तेव्हा तिला कळलं की तो बापाकडे राहिला होता, त्या बाईकडे नाही. ती त्याच्या बोलण्याला भुलली. शिवाय नाही म्हटलं तरी तिला एकटं रहायचा कंटाळा आला होता. तिनं त्याला परत घेतलं. काही दिवस तो नीट वागला, थोडा थोडा पगार घरखर्चाला दिला आणि एक दिवस ती कामावर गेलेली असताना घरातलं बरंच सामान, भांडीकुंडी घेऊन, अगदी तिनं भरलेलं पीठमीठ सुद्धा घेऊन तो पसार झाला. ती घरी आली तर घर धुवून नेलेलं. भाकरी करून खावी तर करायला पीठ नव्हतं की भाजायला तवा नव्हता. ती संतापून सासऱ्याकडे गेली.

''तुमी माझ्याबरबर चला. त्यान्ला बजावून सांगा माजं सामान मला परत पायजे.''

''अगं जा मोठी आली सामानवाली. नवऱ्याला हाकलून दिलंस. अशी कुठं रीत असते का?''

''त्याला तसंच कारन हुतं.''

''कारण बिरण मी जाणत नाही. तो काही इथं आलेला नाही. अन् तुला बी मी घरात घेणार नाही. जा चालती हो.''

नवऱ्याशी भांडायला ती गेली नाही कारण तो उलट्या काळजाचा आहे अशी तिची खात्री पटली होती. तिनं पुन्हा पै पै साठवून भांडीकुंडी घेतली. ती अशातशानं हार मानणारी नव्हती.

सदाला तिचं बरं चाललेलं बघवत नव्हतं. ती भांडायला किंवा रडत भीक मागायला आपल्याकडे आली नाही हे त्याला खुपलं. तो तिच्या पाठीमागे तिच्या घरमालकिणीकडे गेला नि तिला म्हणाला, ''ती वाईट चालीची बाई आहे. तिचे चाळे बिनबोभाट चालावे म्हणून तिला मी इथे रहायला नकोय. तुम्ही तिला खोलीत ठेवू नका. ती तुमचं नाव खराब करील.''

घरमालकिणीनं रुक्मिणीला सांगितलं, ''बघ बाई, हे असं झालंय. मला माहीत आहे तू कशी आहेस. इतके दिवस तू इथे रहातेस, तुझ्याबद्दल वावगा शब्द कुणी काढलेला मी ऐकला नाही. पण तुझा नवरा धमकी घालतोय मी पोलिसात जाईन म्हणून.''

''पोलिस काय करणारेत? तुमची खोली हाये. तुमी कुनाला बी भाड्यानं द्याल. त्यात पोलिसांचा काय संमंद?''

''ते खरं ग, पण तुमच्या भांडणात मला काही पडायचं नाही. तू आपली दुसरीकडे रहायला जा.''

रुक्मिणी जिथे काम करायची त्या बाईकडे गेली, म्हणाली, ''मी कुटं जाऊ? आन जिथं जाईन तिथं पुना तो असं कशावरून करनार नाही?'' तिला रडू कोसळलं.

''तू रडू नको. चल मी तुझ्याबरोबर येते तुझ्या घरमालकिणीला भेटायला.''

रुक्मिणीच्या पाठीशी उभं रहाणारं कुणीतरी आहे हे पाहून ती बाई मवाळली. रुक्मिणीला तिथं राहू द्यायला तयार झाली.

बरेच दिवस रुक्मिणीचं आयुष्य सरळरेषेत एकसुरी चाललं होतं. एक दिवस कामावरून घरी जाताना सदानं तिला अडवलं.

'माजी वाट सोडा.''

''माझं ऐकून तरी घे.''

''मला काई बी आयकायचं नाई तुमचं. आजवरदी आयकून फसले त्येवडं पुरे.''

तो तिच्याबरोबर चालत राहिला. ती खालमानेनं झपाझपा पाय टाकीत

होती. घर जवळ आलं तशी ती थांबली. त्यानं खोलीत शिरायला बघितलं असतं तर ती त्याला थांबवू शकली नसती. तो तिच्यापेक्षा थोराड होता, त्याला जास्त ताकद होती.

''काय बोलायचं ते बोला.''

''मी पुन्हा इकडे रहायला येतो.''

''का? तिनं तुमाला हाकलून दिलंय व्हय? आपल्या बापाच्या घरी जा की मग. माज्याकडे कशाला? पुना माजं घर लुटायला?''

'मी पुन्हा तसं करणार नाही. एवढा एकदा माझ्यावर विश्वास ठेव.''

क्षणभर रुक्मिणीची चलबिचल झाली. आपल्याला ना माहेर, ना सासर, ना मूलबाळ. सगळं आयुष्य असं एकटीनंच काढायचं? तिचं वय एव्हाना अवघं वीस-बावीस वर्षांचं होतं, पण ती दिसे चौदा-पंधरा वर्षांच्या कोवळ्या मुलीसारखी. तिच्या वाट्याला संसारसुख कधी आलंच नव्हतं.

पण मग तो पहिल्यापासून कसकसा वागला हे तिला आठवलं. तो निव्वळ स्वार्थी आहे हे तिला पुन्हा पुन्हा दिसलं होतं. परत आपल्याकडे येण्यात त्याचा काहीतरी मतलब असला पाहिजे असं तिला मनातून वाटत होतं.

ती म्हणाली, ''मला तुमचा इस्वास वाटत नाई. तुमाला माज्याबरबर नीट ऱ्हायचं असंल तर वडलांना घिऊन या. चार लोकांसमक्ष त्यांनी मला लिहून द्यावं तुमी येडंवाकडं काई केलं तर ते जबाबदारी घेतील म्हणून. मंग मी तुमाला परत बोलवीन.''

सदा चिडला, ''तू कोण मोठी जमीनदारीण लागून गेलीस? मी नवरा आहे तुझा. कशी घेत नाहीस घरात बघतो. कोर्टात दावा लावतो. कोर्टाची आरडर आली की चट घेशील.''

तो धमक्या द्यायला लागल्यावर आपण केलं ते बरोबरच केलं असं तिला पटलं. त्याला आपली माया असती तर असं वागलाच नसता. तिलाही राग आला. ती म्हणाली, ''जावा, मला कोडताची धमकी घालता, जावा कुटं जायचं ते कोडतात नाईतर पोलिसात. मला कुनाची भीती हाय?''


तिला मनातनं खूप धाकधूक वाटत होती. खरंच कोर्टानं हुकूम दिला तर आपण काय करणार? दांडगाईनं त्यानं इथं यायला बघितलं तर त्याला थांबवणारं कोण आहे? माझे आईबाप काही माझ्या मदतीला येणार नाहीत. सासूसासरे तर नाहीच नाही. चुलता म्हटला तर लांब रहातो. आयत्या वेळी कोण आपल्या पाठीशी उभं रहाणार?

मग काय करायचं? त्याला मुकाट घरात घ्यायचं? पण घेऊन तरी काय भलं होणार आहे माझं? आतापर्यंत तो कधी सरळ वागला नाही. आता तरी कशावरून वागेल? ते काही नाही, जाऊ दे त्याला, करू दे काय करतो ते. तो नुसता बडबडतो. काही सुद्धा करायचा नाही.

ती बधत नाही अशी खात्री झाल्यावर सदानं तिला त्रास द्यायचं सोडून दिलं.

आज तिला आपल्या भविष्यकाळाबद्दल काळजी वाटते. एकटीनं सगळं आयुष्य कसं निभावून न्यायचं? गरज पडली तर कोण आधार देईल मला? असे प्रश्न कधी कधी तिला सतावतात. पण तिला विचारलं की तू पुन्हा लग्न का करीत नाहीस म्हणून, तर ती फक्त म्हणते, ''आमच्यात करीत न्हाईत.''

❖❖❖


सुवर्णा

सुवर्णाला एकदम मनावरचं दडपण उठल्यासारखं वाटलं. गेले कित्येक महिने ती ज्याची वाट पहात होती तो घटस्फोटाचा दाखला तिच्या हातात पडला होता. शेवटी आठ वर्षांनंतर तिची त्या नको असलेल्या नात्यातून कायदेशीर सुटका झाली होती.

तिचं लग्न ती जेमतेम सतरा वर्षांची असताना झालं. ती एसेस्सी पास झालेली होती. घरी अतिशय हलाखीची परिस्थिती होती. ती सगळ्यात धाकटी. वडील ती लहान असतानाच गेले. थोरले दोघे भाऊ होते, त्यांना चांगल्या नोकऱ्या होत्या पण ते काही मदत करीत नव्हते. थोडीशी जमीन होती तिच्यावर आई आणि ती दोघींचं कसंबसं पोट निघत असे. पुष्कळदा दोन वेळा पोटभर जेवण मिळण्याचीही भ्रांत. तेव्हा आलेल्या स्थळाबद्दल फार चौकशी करण्याची शक्यता नव्हती. त्यातून स्थळ म्हटलं तर माहितीतलंच. नवरा मुलगा सुवर्णाच्या थोरल्या वहिनीचा भाऊ होता. खातंपितं घर होतं. त्यांचा मोठा वाडा होता, मालकीचं एक लॉज होतं, कोळशाचा व्यापार होता. तसं वरवर पहाता स्थळात खोड काढायला जागा नव्हतीच.

लग्न झालं आणि सुवर्णा सासरी गेली ती निव्वळ मोलकरणीचं आयुष्य जगायला. सासरघरचं मोठं खटलं होतं. कुटुंबातली बारा-तेरा माणसं, पुन्हा बाहेरचे गडी अशा सगळ्यांसाठी दोन वेळचा स्वैपाक करायचा. पुन्हा ही फुकटची मोलकरीण मिळाली म्हणून भांडीधुण्यासाठी असलेली बाई काढून टाकली. म्हणजे तेही काम हिच्यावर. दुसरं कोणी तिला मदत करीत नसे. पहाटे पाचपासून रात्री बारापर्यंत नुसतं राबायचं. तेही अर्धपोटी. इतर कुणी नाश्ता केला तरच हिनं करायचा. पण सहसा बाकी कुणी करीत नसे. जेवणसुद्धा सगळ्यांचं झाल्यावर उरलंसुरलं असेल ते. बऱ्याच दिवसांनी तिला कळलं की बाकीची माणसं बाहेरून हॉटेलातून काहीतरी मागवून बाहेरच्या बाहेरच खायची. हिला आत कळतही नसे आणि तिला कुणी काही देत नसे.

तसं कामाला ती नाही म्हणत नव्हती पण हे असं तिन्ही त्रिकाळ नुसतं राबायचंच? लग्न झाल्यावर तिला पुढे शिकवू असं सासरच्यांनी तिच्या आईला कबूल केलं होतं. पण लग्न झाल्यापासून त्याचा उच्चारही कुणी केला नाही. तरीही तिनं तक्रार केली नाही पण इतक्या सगळ्या कामाच्या बदल्यात फुकाचा एक गोड शब्दही मिळू नये ह्याचं तिला वाईट वाटायचं. इतरांकडून

तिला अपेक्षाच नव्हती, पण नवऱ्यानं सुद्धा कधी प्रेमाने जवळ घेऊ नये? दमलीस हो, असं म्हणू नये? तो इतका संपूर्ण कोरडेपणाने, अलिप्तपणे तिच्याशी वागे की जणू ती दोघं केवळ कर्मधर्मसंयोगाने अगदी तात्पुरती एका छपराखाली रहात होती. लाडकोड पुरवणं तर दूरच राहिलं. एकदा नुकतं लग्न झाल्यावर तिनं त्याच्याकडे मला गजरा आणा म्हणून हट्ट धरला, पण पैशाचे व्यवहार शंभर टक्के बापाच्या हातात, त्याच्याकडे पैसे मागावे लागतील म्हणून त्याने गजरा आणला नाही. पुन्हा सुवर्णाने त्याच्याकडून कधी काही मागितलं नाही.

लग्नानंतर दीडेक वर्षाने सुवर्णा तिच्या आईकडे आली. बरोबर नवराही होता. तिनं आईला सगळं सांगितल्यावर आईला बराच धक्का बसला. ती म्हणाली, ''तू आता तिकडे परत जाऊ नको. इथे राहून पुढचं शिक्षण कर.'' आईनं तिच्या नवऱ्याला कसं समजावलं ते सुवर्णाला कळलं नाही, पण तो तिला ठेवून जायला तयार झाला. पण ते तिला पुढे शिकवणार म्हणून दिलेला शाळेचा दाखला, दहावीचं गुणपत्रक वगैरे तगादे लावूनही त्या लोकांनी पाठवले नाहीत. खूप खटपट करून पुन्हा मिळवावे लागले तेव्हा सुवर्णाला अकरावीला प्रवेश मिळाला. शाळा तिच्या खेड्यापासून दूर होती, शिवाय बसचा खर्चही बराच होणार म्हणून तिथल्याच एका मुलींच्या बोर्डिंगात राहून ती शाळेत जायला लागली. थोडाफार खर्च भागवण्यासाठी ती रात्री प्रौढ साक्षरता कार्यक्रमात वर्ग घ्यायची.

बारावीची परीक्षा होऊन ती चांगली पास झाली. त्यानंतर तिच्या सासरच्यांनी तिला परत पाठवा असा आग्रह धरला. मधल्या काळात तिचा नवरा एकदोनदा येऊन तिला भेटून गेला होता. त्याचं वागणं आईला बरं वाटलं. तो सुवर्णाला न्यायला आला तेव्हा तिला पूर्वीप्रमाणे न वागवण्याचं कबूलही केलंन. मग आईही म्हणाली, ''बघ जाऊन. कदाचित त्यांना आपलं चुकलं असं पटलं असेल. शेवटी काय तू जन्मभर एकटी तर रहाणार नाहीस ना?'' सुवर्णाच्या मनात थोडी धाकधूक होतीच, पण ती परत सासरी गेली. जाताना बसमध्ये पुष्कळ तास एकत्र होते तेव्हा नवऱ्याने चांगल्या गप्पा मारल्या, वाटेत तिला काहीतरी खायला घेऊन दिलं. तिला वाटलं, त्याला आपल्याबद्दल काहीतरी वाटत असलं पाहिजे, नाहीतर तो मुद्दाम आपल्याला घेऊन जायला कशाला आला असता?

पण सासरची माणसं नीट वागतील ही आशा फोल ठरली. तिचं आयुष्य

पूर्ववत सुरू झालं. नवराही पूर्वीप्रमाणे अलिप्तपणाने वागायला लागला. कदाचित आपल्या नशिबी हेच आहे म्हणून तिनं परिस्थितीशी जुळवून घेतलंही असतं, पण एक दिवस सासू आणि दोन नणंदा ह्यांनी तिला घरामागच्या विहिरीत ढकलून दिलं. तिला पोहता येत होतं म्हणून ती वाचली आणि वाटेनं जात असलेल्या कुणा माणसाने तिचा आरडाओरडा ऐकून तिला बाहेर काढलं. तिला त्या बायकांनी विहिरीत ढकललं ह्यावर तिच्या नवऱ्याचा विश्वास बसला नाही.

''काहीतरी मूर्खासारखं बोलू नको. त्या कशाला तुला विहिरीत ढकलतील?''

''ते मला काय माहीत? त्यांना विचारा.''

काही दिवसांपूर्वी तिची सासू कुणाशी तरी बोलताना तिनं ऐकलं होतं. सासू म्हणत होती, ''हिच्यापेक्षा जास्त शिकलेली सून हुंडा देऊन मला मिळाली असती. पण मुलीच्या सासरकडचं स्थळ म्हणून हिला पत्करली.'' सुवर्णा नवऱ्याला हे काहीच बोलली नाही. तिला वाद घालायचा नव्हता, आपलं खरं आहे असं पटवायचं नव्हतं. तिला ह्यापुढे विषाची परीक्षा पहायचीच नव्हती. तिनं माहेरी ज़ाण्याचा हट्ट धरला आणि तिची पाठवणी करण्यात आली.

तिनं कॉलेजात नाव घातलं आणि आईवर सगळा भार नको म्हणून मिळतील तशी किरकोळ कामं करून शक्य तितका स्वत:च्या पायावर उभं रहाण्याचा प्रयत्न केला. क्रमाक्रमानं ती एम.ए.झाली. टायपिंगची परीक्षा पास झाली. एका लहान खाजगी संशोधन संस्थेत तिला नोकरी मिळाली. पगार बेताचाच होता, पण संस्थेतल्या लोकांनी तिला चांगली वागणूक दिली. विशेषत: संस्थेच्या चालकांनी तिची आस्थेनं विचारपूस केली. त्यांचा तिला थोडाफार आधार वाटला.

आता ती शहरातच रहात होती. तिची एका तरुणाशी ओळख झाली. त्यांच्या भेटीगाठी व्हायला लागल्या, प्रेम जमलं. आतापर्यंत तिला पहिल्या नवऱ्यापासून घटस्फोट घेण्याची निकड वाटली नव्हती, पण आता पुन्हा लग्न करून संसारसुख अनुभवण्याची आशा तिच्या मनात पालवली होती. तिच्या संस्थाचालकांनी एका वकिलाचा सल्ला घेऊन तिच्या नवऱ्याला भेटायला बोलावलं, आणि त्याच्यासमोर परस्परसंमतीने घटस्फोट घेण्याचा प्रस्ताव मांडला. तिचा सासराही आला होता. तो म्हणायला लागला, ''आम्ही

काय तिला वाईट वागवलं होतं का हाकलून दिलं होतं? ती आपल्या पायांनी घर सोडून आली. आमची तिच्याबद्दल काही तक्रार नाही. ती परत आली तर आम्ही तिला नांदवायला तयार आहोत. मग ती घटस्फोटाची भाषा कशासाठी करतेय?''

''हे पहा, इथे कोणी कुणाला दोष देण्याचा प्रश्न नाही. ती आपणहून निघून आली की तुम्ही तिला हाकलून दिली हाही मुद्दा गैरलागू आहे. सत्य एवढंच आहे की गेली ७-८ वर्ष सुवर्णाचा आणि तिच्या नवऱ्याचा संबंधही आलेला नाही. ती त्याच्यापासून संपूर्ण दुरावलेली आहे. त्याच्याबरोबर पुन्हा संसार मांडणं तिच्याच्याने होणार नाही. तिच्या दृष्टीनं तिचं लग्न मोडलेलंच आहे. फक्त त्यावर कायदेशीर शिक्कामोर्तब करून तिला हवं आहे. तो कोर्टात घटस्फोटासाठी अर्ज करू शकेल. परंतु कुटुंब न्यायालयात परस्परसंमतीने घटस्फोट हा सगळ्यात सरळ आणि सोपा मार्ग आहे. ती कोणत्याही स्वरूपात पोटगी वगैरे मागत नाहीये. तेव्हा एवढं तिच्यासाठी तुम्ही करावं असं मला वाटतं.''

सुदैवाने थोड्याफार चर्चेनंतर सासरा तयार झाला. खरं म्हणजे नवऱ्याला बोलावण्याची गरजच नव्हती. तो सदैव बापाच्या ओंजळीने पाणी पीत असल्यामुळे स्वत:च्या आयुष्यातले महत्त्वाचे निर्णय तो बापावरच सोपवीत होता. सुवर्णाने एकदा नवऱ्याकडे पाहून घेतलं. तो नेहमीप्रमाणे निर्विकार होता. लग्न झाल्यापासून एकदाही त्याने तिच्याबद्दल काही आस्था, माया दाखवली नव्हती. तिला आठवलं एकदा तो रात्रभर तिच्या शेजारी झोपूनही तिला १०२ डिग्री ताप आहे हे त्याला समजलं नव्हतं. त्याच्यापासून आपण कायदेशीर फारकत घेत आहोत ह्याचा तिला यत्किंचितही पश्चात्ताप होत नव्हता. नवरा-बायकोचं काय, कसलंच नातं त्यांच्यात कधी निर्माण झालं नव्हतं.

सगळ्या कायदेशीर बाबी पूर्ण होऊन तिला घटस्फोट मिळाला तेव्हा तिनं आणि प्रसादनं रेस्टॉरंटमध्ये जेवायला जाऊन आपला आनंद साजरा केला. ती म्हणाली, ''आता आपण लग्न कधी करायचं?'' ''घाई काय आहे? मला नोकरी तर लागू दे.'' तो नोकरी शोधण्याचा फारसा गंभीरपणे प्रयत्न करीत नव्हता. एकदा ती त्याला म्हणाली, ''मला नोकरी आहे की. आपल्या दोघांच्यापुरतं मी मिळवते. आपण लग्न तर करू. मग तुला नोकरी मिळेल तेव्हा मिळेल.'' त्यावर तो नक्की असं काही बोलला नाही. विचार करताना

तिला पटत होतं की काही कामधंदा न करणाऱ्या माणसाशी लग्न करणं म्हणजे आपल्या पायावर धोंडा पाडून घेणं आहे. पण तिला त्याचा सहवास हवाहवासा वाटत होता. तो तिच्या नवऱ्यासारखा कोरडा नव्हता. त्याचं प्रेम शब्दांतून, स्पर्शातून व्यक्त होत होतं आणि त्याचा अनुभव तिच्या कोमेजून गेलेल्या मनाला, शरीराला उल्हसित करीत होता.

तिनं उडत उडत ऐकलं की त्याच्यासाठी मुली बघताहेत. तिनं त्याला सरळच विचारलं तेव्हा तो हो म्हणाला.

''घरच्यांच्या समाधानासाठी काही गोष्टी कराव्या लागतात.''

''तू त्यांना आपल्याबद्दल काही सांगितलंच नाहीस का?''

''तुला माहीताय माझे आईवडील आपल्या लग्नाला कधीच संमती देणार नाहीत.''

''त्यात नवीन काय आहे? इतक्या खालच्या जातीच्या मुलीला ते सून म्हणून पत्करणार नाहीत हे तुला पहिल्यापासूनच माहिती होतं. कधीतरी त्यांना हे सांगून त्यांचा राग ओढवून घ्यावाच लागणार आहे. मग आत्ता सांगून का नाही टाकत?''

''जरा दम धर. असल्या गोष्टी एकदम घाईने करता येत नाहीत.''

''ह्यात घाई काय आहे, आपली ओळख झाल्याला दोन अडीच वर्षं झाली. आता आणखी कशासाठी थांबायचं ते मला कळत नाहीये. तू मुली पहायला संमती देणं ही त्या मुलींची आणि तुझ्या आईवडलांची फसवणूक नाही का?''

प्रसादनं तिला काही दादच दिली नाही अणि शब्दांच्या हुलकावण्या देणं सुरू ठेवलं तेव्हा तो आपल्याशी लग्न करणार नाही हे कडू सत्य तिनं स्वीकारलं. तिनं आपल्या मनाची समजूत घातली की आपण प्रेम करावं इतकी प्रसादची लायकीच नाही. कुटुंबियांच्या मागे दडून अशी बेइमानी करणारा माणूस आपल्या आयुष्यातून निघून गेला हेच आपलं सुदैव असं तिनं स्वत:ला पटवण्याचा प्रयत्न केला. इतके दिवस त्याच्या असण्यामुळे मधुर झालेलं जीवन एकटेपणामुळे पुन्हा रखरखीत होणार होतं. पण त्याला काही पर्यायच नव्हता. त्याने तिला भेटण्याचा पुष्कळ प्रयत्न केला पण तिनं निश्चयानं त्याला दूर ठेवलं. त्यानं लिहिलेली पत्रं न वाचता फाडून टाकली. शेवटी त्याने तिचा नाद सोडून दिला. निदान तिला असं वाटलं.

एक दिवस अवचित तो तिच्याकडे आला. अंधाराची वेळ पाहून आला

हे तिच्या लक्षात आलं. तिनं खोलीचं दार उघडलं आणि दारातच त्याला काय पाहिजे म्हणून विचारलं. तिला वाटलं कदाचित लग्नाचं निमंत्रण द्यायला आला असेल. ते आपल्याला देण्याची हिंमत त्याला झाली ह्याचं तिला आश्चर्य वाटलं. पण त्याखेरीज त्यानं भेटायला यायचं दुसरं काही कारण तिला दिसेना.

तो म्हणाला, ''मला आत तरी येऊ दे.''

''कशाला? तू काय गप्पा मारायला आलायस? पटकन काम काय आहे ते सांगून टाक आणि जा. त्यासाठी आत यायची काय गरज आहे?''

''सुवर्णा, तू मला इतकं परक्यासारखं वागवू शकतेस? काही दिवसांपूर्वी तू माझ्यावर प्रेम करीत होतीस. निदान तू तसं म्हणत होतीस. का ते सगळं खोटंच होतं?''

''त्यावेळी ते खरं होतं.''

''आता लगेच तू ते सगळं विसरलीस?''

''तू विसरायला लावलंस, प्रसाद.''

''मी नाही तुला विसरू शकत. मी खूप प्रयत्न केला पण आपलं नातं मी तोडू शकत नाही.'' तो त्वेषाने बोलत होता आणि क्षणभर श्वास रोखून धरीत ती ऐकत राहिली. ''घरच्यांच्या खातर मला लग्न करावं लागतं आहे पण माझ्या हृदयातलं तुझं स्थान अढळ राहील. मी तुला पूर्वीप्रमाणे भेटत राहीन. मी तुझ्याशिवाय जगू शकत नाही.''

''तू माझी चेष्टा करतोयस की गंभीरपणे बोलतोयस हे मला कळत नाही. चेष्टा असली तर ती फार दुष्ट आहे. गंभीरपणे म्हणत असलास तर मी तुला कधी कळलेच नाही असं म्हणायला पाहिजे.''

''तुझा अपमान करायची माझी इच्छा नाहीये सुवर्णा. माझं तुझ्यावर अजूनही फार प्रेम आहे.''

''प्रेमाच्या गोष्टी बोलायच्या भानगडीत पडू नको. झालं एवढं बास झालं. आता जा आणि पुन्हा कधी मला भेटण्याचा प्रयत्न करू नकोस.''

''सुवर्णा प्लीज, तुझा काहीतरी गैरसमज होतोय. मला आत तरी येऊ दे. माझं नीट ऐकून घे.''

''मला काहीही ऐकायचं नाही. ऐकलं तेवढंच फार झालं.''

त्यानं तिला बाजूला सारून खोलीत शिरण्याचा प्रयत्न केला पण तिने संतापून त्याला अक्षरश: ढकलून बाहेर काढलं आणि दार लावून घेतलं. मग


मात्र रागामुळे लाभलेलं अवसान गळालं आणि ती खूप रडली. पण शेवटी म्हणाली, ''जे माझं नव्हतंच त्याच्यासाठी मी का रडतेय?'' ती डोळे पुसत कामाला लागली.

बरेच दिवस लोटले. सुवर्णा आता कामातही जास्त गुंतली होती. एक दिवस प्रसाद तिला पुन्हा भेटायला आला. तिनं जरा बेफिकिरीनंच त्याला विचारलं, ''काय रे?'' तो म्हणाला, '' परवापासून दोनदा तुला गावात पाहिलं तेव्हा तुझ्याबरोबर कोण होता?'' ''आमच्या संस्थेत नवीन एकजण लागलाय तो असेल.''

''अस्सं, त्याच्या आणि तुझ्यात काही आहे वाटतं?''

नवीन माणसाचं लग्न झालेलं होतं पण सध्या तो एकटाच आला होता आणि ती त्याला रहायची जागा शोधायला मदत करीत होती. पण तिनं प्रसादला हे सगळं सांगितलं नाही. ती फक्त मोठ्याने हसली.

❖❖❖



# सपना

सपना आईवडलांच्या अनपेक्षित हल्ल्याने स्तंभित झाली. खरं म्हणजे अशी गोष्ट लपून रहाणार नाही ह्याची जाण आपल्याला असायला पाहिजे होती आणि आपण त्यांना आधीच सांगायला हवं होतं असं तिला वाटून गेलं. पण आता त्याला उशीर झाला होता.

''कुठं गेली होतीस?''

''जादा तास होता.''

''खोटं. जादा तास वगैरे काही नव्हता. मी वसुधाच्या घरी फोन करून चौकशी केली.''

वडील म्हणाले, ''तिची उलटतपासणी काय घेत्येयस? सरळच सांग की. हे बघ सपना, तू राजेंद्र भोसलेबरोबर हिंडतेस ते आम्हाला समजलं आहे. आता तुझा खोटेपणा, लपवाछपवी बंद आणि त्याला भेटणंही बंद. समजलं?''

''पण बाबा-''

''पण बिण काही नाही. मी सांगितलं ते पुरेसं स्पष्ट आहे.''

आई मधेच म्हणाली, ''इतके दिवस तू अशी खोटेपणानं वागलीस. आम्ही दिलेल्या स्वातंत्र्याचा गैरफायदा घेतलास.''

''आई, राजेंद्राला भेटते हे तुमच्यापासून लपवलं हे चुकलं माझं. पण मी काहीही गैर केलेलं नाही. आमचं एकमेकांवर प्रेम आहे आणि आम्ही लग्न करणार आहोत.''

वडील मोठ्याने हसले. ''कुठल्या कादंबरीत वाचलंस हे? प्रेम म्हणे. प्रेम कशाशी खातात तुला कळतं का?''

''असं का म्हणता?''

''तुझं वय काय आहे? अनुभव काय आहे? कॉलेजात वर्ष-दोन वर्षं काढल्यावर आपल्या सबंध आयुष्याबद्दल निर्णय घेण्याइतका शहाणपणा आपल्यात आलाय अशी कल्पना आहे तुझी? लग्नासारखी बाब तू आम्हाला न विचारता सवरता परस्पर ठरवून मोकळी होतेस?''

''मी कबूल केलं ना की तुम्हाला विश्वासात घेतलं नाही ते चुकलं माझं म्हणून?''

''विश्वासात घेतलं असतंस तर इतक्या थराला गोष्टी जाऊच दिल्या नसत्या आम्ही. वेळीच हा मूर्खपणा बंद केला असता.''

''पण का? आम्ही का लग्न करू नये?''

''ते तुझं तुला समजत नसलं तर समजावून सांगण्याची मला काही गरज वाटत नाही.''

नंतर तिच्या आईनं तिच्यापाशी उजळणी केली होती. तो वेगळ्या जातीचा आहे. त्यांच्यातल्या चालीरीती, खाणंपिणं सगळं वेगळं असतं. त्याचे आईवडील फारसे शिकलेले सुद्धा नाहीत. आपल्या घरातल्यासारखं सुशिक्षित, सुसंस्कृत वातावरण तुला तिथे मिळणार नाही, वगैरे. सपनाची काही समजूत पटली नव्हती. पण तिची समजूत पटली की नाही ह्याला काही महत्त्व नव्हतं. दुसऱ्या दिवशी कॉलेजला जायला निघाली तेव्हा तिच्या वडलांनी तिला बजावलं, ''तुला वाटत असेल की एकदा तू कॉलेजात गेलीस की आम्ही काही तुझ्यावर नजर ठेवू शकणार नाही. पण एवढं ध्यानात ठेव की तू त्याची गाठ घेतलीस किंवा त्याच्याशी बोललीस असं कानावर आलं तर तुझं कॉलेज बंद.''

सपनाने घडलेलं सगळं लिहून ते राजेंद्राला दिलं. त्यावर त्याने उत्तर लिहिलं ते सर्वस्वी हताश होतं. त्याच्या आईवडलांनी आधी नाखुषीने का होईना, कॉलेज पुरं होईपर्यंत थांबायच्या अटीवर ह्या लग्नाला संमती दिली होती. पण तिचे आईवडील परवानगी देत नाहीत म्हटल्यावर ते चिडले होते. त्यांना काय वाटलं आपण कोण आहोत म्हणून? आम्ही कुठल्याही बाबतीत त्यांच्यापेक्षा कमी नाही. काही गरज नाही त्या मुलीमागे लागायची. तिच्यापेक्षा सरस अशा छप्पन्न मुली मिळतील आम्हाला. राजेंद्र संपूर्णपणे पराधीन होता. मधेच कॉलेज सोडून नोकरी मिळवणं आणि सपनाशी लग्न करणं त्याला अशक्य कोटीतलं वाटत होतं. त्यानं तिला नुसता सबुरीचा सल्ला दिला. मित्रमैत्रिणींकरवी पत्रांची देवघेव एवढा एकच संपर्काचा मार्ग त्यांच्यापुढे उरला.

सपनाच्या आईवडलांनी स्थळं बघायला सुरुवात केली होती. सपनाने सांगून पाहिलं, ''माझं कॉलेजचं आणखी एकच वर्ष उरलंय. तेवढं तरी पुरं करू दे मला.'' पण रोज तो माणूस डोळ्यांसमोर असेपर्यंत सपना काय करील ह्याची तिच्या आईला शाश्वती वाटत नव्हती. तेव्हा शक्य तितक्या लवकर तिला लग्नबंधनात अडकवून टाकलेलं बरं असा तिचा हिशेब. एक चांगलं स्थळ लवकरच आलं. मुलगा एका चार्टर्ड अकाउंटंट्सच्या फर्ममधे

नोकरीला होता. बघताक्षणी छाप पडावी असा उंचनिंच, रुबाबदार, देखणा. बघण्याच्या समारंभात तो सपनाकडे बघून अर्थपूर्ण हसला ते सपनाला फार भावलं. जणू तो तिला सांगत होता की बाकीच्यांचं काय चाललंय ते चालू दे, पण खरा मामला तुझ्या-माझ्यात आहे. तिचं कॉलेजचं एक वर्ष राहिलंय हे ऐकून तिची सासू म्हणाली, ''त्याची तुम्ही काळजी करू नका. तिची हौस असली तर तिला कितीही शिकवायला आम्ही तयार आहोत. नाहीतरी घरकामाचा बोजा काही तिच्यावर पडणार नाही. तेव्हा तिला तरी फावल्या वेळात उद्योग नको का?''

सपना श्रीधरची बायको झाली ती मनातल्या मनात आईवडलांनी आपलं हितच पाहिलं अशी कबुली देत. शेवटी राजेंद्राच्या घरच्यांशी आपल्याला जमवून घेता आलं असतं की नाही कोण जाणे. आईचं बरोबर होतं. काही झालं तरी तिनं चार पावसाळे जास्त पाह्यलेत ना. पण सासरी पोचल्या पोचल्याच तिला संसाराच्या सुखस्वप्नातून खडबडून जाग आली. आपलं लग्न खोटेपणाच्या पायावर उभं आहे हे तिला कळून चुकलं. सासरच्यांनी आर्थिक परिस्थितीची जी कल्पना दिली तीच आधी खोटी होती. सासू-सासरे, दोन दीर, नणंद आणि श्रीधर एका तीन खोल्यांच्या जुन्यापान्या फ्लॅटमधे रहात होते. श्रीधर सगळ्यात थोरला. त्याला पगार चांगला होता पण एवढ्या मोठ्या कुटुंबात तो एकटाच मिळवता. तरी त्याच्या जिवावर, बऱ्यापैकी सधन घरात लाडाकोडाने वाढलेल्या सपनाने आहे ह्या परिस्थितीशी जुळवून घेतलंही असतं. पण काही दिवसांतच त्याला दारूचं व्यसन आहे असं कळल्यावर आपली सर्वच आघाड्यांवर फसवणूक झालीय असं तिच्या ध्यानात आलं. तिला सासरच्यांचा राग आलाच पण त्याहीपेक्षा आईवडलांचा आला. तिचं लग्न करून टाकण्याच्या घाईमुळे ओळखीच्या मध्यस्थांतर्फे आलेलं स्थळ जुजबी सुद्धा चौकशी न करता त्यांनी स्वीकारलं होतं.

शिक्षण पुरं करण्याबद्दल तिनं नवऱ्याकडे गोष्ट काढली. तो म्हणाला वर्षाच्या मधेच तुला कुणी ॲडमिशन देणार नाही, नवं वर्ष सुरू होईपर्यंत थांबावं लागेल. पण त्याच्या आतच तिला दिवस गेले. त्याबद्दल आनंद वाटून घेण्यासारखी परिस्थिती नव्हती. तिनं गर्भपाताबद्दल ऐकलं होतं, पण ह्या प्रचंड शहरात काही ओळखीपाळखी नसताना घरच्यांच्या नकळत गर्भपात

करून घेणं शक्य नव्हतं. आपण गर्भार आहोत हे तिनं कुणाला सांगितलं नाही. आपोआप कळलं तेव्हा तिचं फारसं कुणी कौतुक वगैरे केलं नाही. ती स्वत: तर घरातल्या एवढ्या गर्दीत आणखी एक जिवाची भर पडणार ह्या कल्पनेने धास्तावून गेलेली. सासूनं बाळंतपणासाठी माहेरी जाण्याची गोष्ट काढली ती सपनानं मनावर घेतली नाही. ह्या सुमाराला तिचा भाऊ मुंबईला आला होता तेव्हा तिच्या घरी आला. त्याने आईला बातमी दिली तेव्हा तिनं सपनाला बाळंतपणाला बोलावलं. तिनं कळवलं इथे सगळ्यात उत्तम वैद्यकीय सोयी असताना मुद्दाम लहान गावात कशाला बाळंतपण करून घ्यायचं असं सगळ्यांचं म्हणणं पडतंय.

पुढेसुद्धा ती काही ना काही सबब सांगत माहेरी गेलीच नाही तेव्हा तिला नवऱ्याला सोडून येववत नाही म्हणून आईनं कौतुक केलं.

सुरुवातीला दारूच्या नशेत नसे तेव्हा तरी नवरा तिच्याशी बरा वागायचा. जसजसा व्यसनात जास्त जास्त गुरफटत चालला तसा जास्त चिडचिड करायचा. एकदा तिने व्यसनमुक्ती केंद्रात जाण्याबद्दल बोलणं काढलं तर त्याने एकदम बिथरून तिला शिवीगाळी, मारहाण करण्यापर्यंत मजल गाठली. तेव्हापासून ती त्याच्यापासून चार हात दूरच रहायला शिकली. तो जवळजवळ रोजच कामावरून येताना पिऊन घरी यायचा. ती कामाच्या निमित्ताने स्वैपाकघरातच घोटाळत रहायची आणि तो झोपल्याची खात्री झाली की खोलीत जायची.

नवरा हळूहळू पूर्णपणे दारूच्या आहारी जात चालला होता. त्याचा परिणाम व्हायचा तोच होऊन त्याची नोकरी गेली. दुसरी नोकरी लागण्याची शक्यताच नव्हती. त्याला काही ग्रॅच्युइटी मिळाली होती त्याच्यावर त्यांचा प्रपंच थोडे दिवस चालला. मग सासऱ्याच्या पेन्शनवर कसं भागणार म्हणून तिनं नोकरी शोधायला सुरुवात केली. तिला कसलाच अनुभव नव्हता, शिक्षण अर्धवट सोडलेलं. काम तरी कसलं मिळणार? सुदैवाने त्यांच्याकडे अधूनमधून येणाऱ्या लांबच्या नात्यातल्या एक बाई होत्या त्यांनी तिला काम देऊ केलं. त्यांची संस्था रस्त्यावरच्या अनाथ मुलांसाठी केंद्र चालवीत होती. प्रत्येक केंद्रात अशा मुलांना आणायचं, जेवण द्यायचं, थोडंफार शिकवायचं. एक दोन केंद्रात जरा मोठ्या मुलांना कोणतं तरी काम शिकवलं जात असे.

पगार बेताचा होता, पण एकतर आपण मिळवू शकतो, स्वत:च्या पायावर उभ्या राहू शकतो ही जाणीव सुखद होती. शिवाय घरातल्या कटकटी, सगळ्यांच्या दु:स्वासाला तोंड देणं ह्यापासून रोज काही काळ तिची सुटका होत होती. अर्थात घरी गेल्यावर त्याचा वचपा काढला जायचा. नोकरी करून ती कुटुंबाचं पोषण करते ह्याबद्दल तिचं कौतुक करणं तर राहिलंच, उलट सगळ्यांना तिचं वैषम्यच वाटायचं. ती नोकरी करते म्हणून चढेलपणा दाखवते, बाहेर काम करते ह्या सबबीखाली घरकाम अंगाबाहेर टाकते, हिनं लोकांच्या पोरांची काळजी करायची नि आम्ही हिच्या मुलाला संभाळायचं, अशा तक्रारी चालू रहायच्या. खरं म्हणजे तिचा मुलगा आता काही लहान नव्हता. तो दिवसभर शाळेत असायचा. त्याला काही संभाळायला लागायचं नाही. शिवाय तो हिचा मुलगा होता तर त्यांचा नातू, भाचा, पुतण्या नव्हता का?

कधी कधी आपण हे सगळं सहन का करतो असा तिला प्रश्न पडायचा. पण दुसरा काही मार्ग दिसत नव्हता. माहेरी थोड्या दिवसांसाठी सुद्धा जायची तिची तयारी नव्हती. आईवडलांबद्दलचा राग तिच्या मनात अजून धुमसत होता. शिवाय तिथे खोटा मुखवटा लावून वागणं तिला असह्य झालं असतं. कायम जायचं तर त्यांनी तिचं मनापासून स्वागत केलं असतं अशी तिची खात्री नव्हती. पदरात मूल घेऊन माहेरी आलेल्या मुलीला ये म्हणणारे किती आईबाप असतात? शिवाय मग ते परत नवऱ्याकडे जाण्यासाठी तिचं मन वळवणार, काही तडजोड शक्य आहे का त्याची वारंवार चाचपणी करणार. ते तिला नको होतं. मुलाला घेऊन एकटीनं रहाणं सध्या तरी शक्य नव्हतं. शिवाय सासरची माणसं मुलाला तिच्याबरोबर जाऊ देतील की नाही ह्याची शंका होती. तेव्हा भविष्यकाळात वेगळं काही आपल्या वाट्याला येईल असं स्वप्न न रंगवता ती आला दिवस रेटत राहिली. मुलगा उत्तम तऱ्हेनं एस.एस.सी. पास झाल्यावर तिने मुद्दाम बापाच्या अमंगळ छायेतून काढून त्याला कॉलेजसाठी लांब पाठवलं आणि त्याच वर्षी तिच्यासमोर एकदम एक दार उघडलं गेलं. तिच्या संस्थेच्या कामाचा खर्च अंशत: एका अमेरिकन ट्रस्टतर्फे मिळणाऱ्या देणगीतून भागत होता. त्या ट्रस्टने हिंदुस्थानातल्या शहरांतल्या रस्त्यावर राहणाऱ्या मुलांची पाहणी करण्यासाठी एक अभ्यासगट पाठवला होता.

मुंबईच्या पहाणीत मदत करायला सपनाच्या संस्थेनं तिला नेमलं. तिनं केलेल्या कामावर अभ्यासगटाचे प्रमुख खूष झाले. त्यांनी तिला विचारलं, ''आमच्या संस्थेत तुला नोकरी देऊ केली तर तू घेशील का?'' ती विचार करून सांगते म्हणाली. पण खरं म्हणजे विचार कसला करायचा होता? असह्य परिस्थितीतून सुटकेचा मार्ग तिला योगायोगाने मिळाला होता. प्रश्न फक्त मुलाचा होता पण त्याने आडकाठी केली नाही. मग तिने तातडीने निर्णय घेऊन टाकला.

सगळी तयारी झाल्यावर, अमेरिकेहून तिकिट हातात पडल्यावरच तिनं घरात त्याची वाच्यता केली. अर्थातच मोठं वादळ उठलं आणि सगळ्यांनी तिचा पाय मागे ओढण्याची शिकस्त केली. पण त्यांनी काहीही म्हटलं तरी तिच्यात अपराधीपणाची जाणीव निर्माण झाली नाही. ह्या आपमतलबी, ढोंगी लोकांसाठी केलं हेच फार झालं असं तिला वाटत होतं. तिनं ठरवून टाकलं होतं की नोकरीची मुदत वाढवून मिळाली तर घ्यायचीच, पण शक्य तर मुलाला तिकडे नेण्याची सोय करून तिथंच रहायचं. ज्यासाठी आवर्जून परत यावं असं तिचं ह्या देशात काहीच नव्हतं.

❖❖❖


संगीता

संगीता मला फक्त दोनदाच भेटली. पहिल्या वेळी माझ्याच बागेत. मी बागेत फिरत होते तर एका चिकूच्या झाडाच्या गर्द सावलीत ती लपून बसलेली दिसली.

मी दचकून विचारलं, ''कोण तू? इथं कशाला आलीस? कुणाच्या परवानगीनं?''

''बाई, मला बाहेर हाकलू नका. मी घरनं पळून आलेय. मला माझ्या नवऱ्यानं न् दिरानं लई मारलं. हे बगा.''

तिनं फाटका ब्लाऊज वर करून आपली पाठ दाखवली. पाठीवर लाल-जांभळे वळ होते. एकदोन ठिकाणी जखम होऊन रक्त आलं होतं.

मी म्हटलं, ''का मारलं?'' पण हा प्रश्न खरं म्हणजे निरर्थक होता. पुरुष बायकांना मारतात ते वरवर भाकरी करता येत नाही इथपासून चालचलणूक चांगली नाही इथपर्यंत अनेक आणि अनेकविध कारणांसाठी असलं तरी त्या सगळ्यांच्या मुळाशी एकच कारण असतं. ते म्हणजे बायका त्यांच्या अधिकाराच्या कक्षेत असतात, असहाय्य असतात आणि स्वसंरक्षण करायला समर्थ नसतात.

ती म्हणाली, ''मी काई बी केलं नाई, तरी मारलं. हमेशा मारतात.''

''मग तू माझ्याकडे कशाला आलीस? मी काय करू?''

''तुमी मला कुटंबी पाठवा. मी पळून गेले तर कुटं जाईन तिथनं मला पकडून आनतात. एकदा मी पळून गेलते पार कराडपरेंत. पन आमच्यातली मानसं सगळीकडं पसरली हायती. कुणीतरी माज्या सासऱ्याला खबर दिली अन् तो न् माजा नवरा यिऊन मला पकडून घिऊन आले. तुमी मला कुटंबी पाठवा. परदेशात पाठवलं तरी जाईन. पन मला हितं ऱ्हायचं नाई.''

''हे बघ-नाव काय तुझं?''

''संगीता.''

''हे बघ संगीता, मी तुला कशी कुठे पाठवून देऊ? माझा काय संबंध? फार तर मी तुझ्या नवऱ्याला बोलावून घेऊन त्याच्याशी बोलते.''

''नको नको, मग तर तो जीवच घेईल माजा. बाई, माज्यावर दया करा. हे बगा.'' ती रडायला लागली. रडता रडता तिनं आपल्या चोळीतनं एक चुरगळलेला फोटो काढून माझ्यासमोर धरला.'' हा मुलगा हाय माजा. फकस्त चार वर्षांचा हाय. त्येच्यापक्षी धाकटी मुलगी हाय. बाई, इतक्या

लहान पोरांना सोडून मी पळून जाईन का तसंच काई झाल्याशिवाय?'

ती बसल्याबसल्याच थोडी सरकली, सावलीतून उजेडात आली, तेव्हा मी पाहिलं, तिच्या गालावरही माराचे वळ होते. ती खूप गोरी होती. केस लालसर भुरे होते. मी लहान मुलांच्यात तेल न लावल्याने किंवा कुपोषणाने केस भुरे झालेले पाहिलेत. पण जात्याच लाल केसांच्या माणसांच्या असतात तसे हिच्या हातांवर, चेहऱ्यावर वांग होते.

तिला हाकलून देणं मला प्रशस्त वाटेना. तिचं काय करावं ह्याचा विचार करताना मला एकच मार्ग दिसला.

मी तिला म्हटलं, ''पुण्याला अनाथ बायकांसाठी सरकारचा एक आश्रम आहे तिथे जाशील?''

''कसं जायचं?''

''बसनं.''

''मी ट्यांडवर गेले तर तिथं ह्यांची मानसं पाळत ठिऊन असतील.''

''त्याची तू काळजी करू नको. मी सोबत देऊन तुला पाठवीन. इथून थोड्या अंतरावर बसमध्ये बसवून देऊ.''

ती बरं म्हणाली. मी म्हटलं, ''तू कुणाची ते सांगितलं नाहीस. तिनं अमक्याची सून म्हणून सांगितलं ते नाव माझ्या परिचयाचं होतं, ते लोक भटक्या जमातीचे, पण वीसेक वर्षांपूर्वी इथे येऊन स्थायिक झालेले. तिच्या सासऱ्याचा जमातीत बराच दबदबा होता. दीर चोरीचा माल खरीदतो असा बोलबाला होता. एका स्थानिक दादाची माणसं म्हणून लोक त्यांना ओळखंत.

आपण कुणाच्या तरी कौटुंबिक मामल्यात नाक खुपसतोय, त्यातही अशा लोकांच्या म्हणून जरा बाकबुक वाटत होती, पण सोबत बघून मी संगीताला पुण्याला पाठवलं. पाच-सात दिवसांनी कळलं की ती परत आलीय. बाहेरून चौकशी केली तर समजलं की महिलाश्रमाच्या चालकांनी नियमानुसार तिच्याकडून नाव-पत्ता घेऊन तिच्या नवऱ्याला कळवलं. नवरा आणि सासरा तिथे दाखल झाले. पद्धत अशी की हिनं त्यांच्या देखत सांगितलं की ते मला वाईट वागवतात, मला त्यांच्याबरोबर जायचं नाही, तर तिला ठेवून घ्यायचं. संगीता ढेपाळली म्हणा, घाबरली म्हणा किंवा तिनं आपला विचार बदलला म्हणा, ती मुकाट्यानं घरी परत आली. ती न् तिचं नशीब म्हणून मी स्वस्थ राहिले.

तिच्या शेजारच्या एका बाईनं मला सांगितलं की परत आल्यापासून संगीताला पुन्हा मारहाण चालूच आहे. काही दिवसांनी कळलं तिचा नवरा अचानक मेला. सायकलवरून चालला होता, चक्कर येऊन पडला की दारू प्यायला होता कुणाला कळलं नाही. पण पडला तेव्हा त्याचं डोकं दगडावर आपटलं आणि तो जागच्या जागी खलास झाला.

मी विचारलं, ''आता संगीता काय करणार?''

''राहील दिराबरोबर. त्यांच्यात तसंच असतं.''

एकदा ती शेजारीण म्हणाली, ''बाई, मुळात तिचा दीरच तिला मारायचा जास्त करून. आता तर ती त्याच्या तावडीतच सापडलीया. अक्षी गुरावाणी बडवतो हो तिला. ती किंचाळते ते आमच्या घरात ऐकाय येतं.''

एक दिवस मावळतीला संगीता माझ्या फाटकाशी उभी. तोंड सुजलेलं, दंडावर माराचे वळ, एक डोळा काळा निळा झालेला.

''काय ग?''

''बाई मला आजच्या रातीला आत घ्या. उद्या कुठेतरी पाठवून द्या.''

''मी आता पुन्हा तुझ्या भानगडीत पडणार नाही. एकदा तू मला तोंडघशी पाडलंस तेवढं पुरे. तू आपली घरी जा मुकाट. नाहीतर आपल्या पायानं कुठं जायचं ते जा.''

थोडा वेळ माझ्याशी हुज्जत घालून मी बधत नाहीसं पाहिल्यावर ती निघून गेली.

आठेक दिवसांनी तिचा सासरा एका लहान मुलाला घेऊन माझ्याकडे आला. धोतर, कोट, डोक्याला फेटा, मोठा झोकात होता माणूस.

'नमस्कार, बाई.''

''नमस्कार, कोण आपण?''

''संगी आठवते का, ती तुम्ही पुण्याला पाठवलेली मुलगी? तिचा सासरा मी.''

''काय काम होतं?''

''ती पुन्हा पळून गेलीय.''

''मग?''

''नाही, म्हटलं तुम्हाला माहीत असेल कुठं गेलीय ते.''

''मला काहीएक माहीत नाही.''

''हा बघा हा मुलगा लहान आहे, त्याला सोडून गेली. त्याचा बाप मरून गेला, आता आई टाकून गेली. कुणी संभळायचं त्याला?''

''तुम्हाला संभाळायचं नसलं तर ती कुठेय शोधून काढा न् पाठवून द्या त्याला तिच्याकडे.''

''तिच्याकडे का पाठवून द्यायचा? नातू आहे तो माझा.''

''मग संभाळा तुम्हीच.''

तो माझ्याकडे का आलाय समजत नव्हतं. कदाचित ती कुठेय मला माहीत आहे असं अजूनही त्याला वाटत असावं.

''ती आपल्या आईबापाकडे गेली म्हणतात.''

''झालं तर मग. माहीताय ना तुम्हाला ती कुठेय ते? मग मागल्यासारखं जाऊन घेऊन या तिला.''

''पण तिनं तरी इतक्या लहान पोराला सोडून जावं का?''

''तुम्ही तिला मारून झोडून हाकलूनच दिली, मग तिनं काय करावं?''

''मी कधी तिच्या अंगाला हात सुद्धा लावला नाही.''

''तुम्ही म्हणजे तुम्हीच असं नाही. तुमच्या मुलानं, पण तुम्ही त्याला थांबवत तर नव्हता ना?''

''नवऱ्यानं येवढं तेवढं मारलं तर पोरं सोडून पळून जायचं म्हणजे अजबच आहे.''

''तुम्ही आता जा. ह्या बाबतीत माझं तुमचं पटायचं नाही. तुमची सून कुठेय मला माहीत नाही. असतं तरी तिला परत आणायला मी तुम्हाला मदत केली नसती.''

म्हातारा शेवटी निघून गेला. मी जराशी चिडून बोलले तरी त्यानं त्याचा सभ्य, सौम्य मुखवटा टाकून दिला नव्हता.


संगीताचा मुलगा खूपच तिच्यासारखा दिसत होता. लाल गोरा, भुरे केस, गोरेपणामुळे त्याचा मळका चेहरा जास्तच कळकट दिसत होता. आमचं संपूर्ण संभाषण तो तिथं उभं राहून निर्विकारपणे ऐकत होता. आई आपल्याला सोडून गेली हे त्याला समजत होतं की नाही कुणास ठाऊक. आज्याने चल म्हटल्यावर तो त्याचं बोट धरून चालू लागला.

संगीताची शेजारीण मला नंतर म्हणाली, ''अवो, आईबापाकडे कुठली आलीय? तिथून त्यांनी कवाच उचलली असती तिला. तिथून ती कुणाच्या

तरी मागं गेलीया.''

म्हणजे ती ज्याच्या मागे गेली त्याला हात लावायला ही माणसं धजत नव्हती म्हणायचं. संगीता मला पुन्हा कधी दिसली नाही. फक्त कधी कधी माझ्या मनात येतं, ती ज्याच्याबरोबर गेली तो तिला कसं वागवीत असेल?

❖❖❖


मंगल

मंगलने कष्टाने डोळे उघडले. समोर तिला तिची आई दिसली. दुसऱ्या क्षणी असह्य वेदनांची जाणीव होऊन आपण कशासाठी शुद्धीवर आलो असा तिला प्रश्न पडला. तिचं विव्हळणं ऐकून आईनं तिच्याकडे पाहिलं. ती शुद्धीवर आलीय असं पाहून आईच्या डोळ्यांना पाण्याच्या धारा लागल्या. डॉक्टरांनी कितीही सांगितलं तरी मंगल शुद्धीवर येईल, जगेल असा तिला विश्वास वाटत नव्हता.

हळूहळू काय झालं त्याची मंगलला आठवण आली. पण आईला पाहिल्याचं तिला आठवत नव्हतं. आईनं तिला सगळ्याची कल्पना दिली आणि पोलिस तिचा जबाब घ्यायला यायच्या आत त्यांना काय सांगायचं ते पढवून ठेवलं. त्याप्रमाणे तिनं सांगितलं, ''स्टोचा भडका झाला आणि एकदम साडी पेटली. साडी पेटली म्हटल्यावर मी घाबरून बेशुद्ध पडले. बाकी मला काही आठवत नाही.'' साडी पेटली तर फक्त छाती, पाठ गळा इतकंच कसं भाजलं? तुझा नवरा कुठे आहे? सासू-सासरे? दवाखान्यात आईवडलांनी कसं आणलं? त्यांना कुणी कळवलं? ह्या प्रश्नांची तिनं उत्तरं दिली नाहीत. मला माहीत नाही आठवत नाही एवढंच ती म्हणे. खरी गोष्ट तिच्या आईवडलांना शेजाऱ्यांकडून कळली होती. तिच्या नवऱ्यानं आणि सासूनं तिला जाळण्याचा प्रयत्न केला होता. तिच्या किंकाळ्या ऐकून शेजारी धावून गेले म्हणून ती वांचली. पण ते साक्ष द्यायला तयार नव्हते. त्यांना पोलिसांच्या लफड्यात पडायचं नव्हतं. पुन्हा आरोप सिद्ध झाला नाही तर मंगलच्या सासरच्या कुटुंबाशी फुकट वैर कशाला असं त्यांचं म्हणणं होतं. तेव्हा मंगलच्या आईवडलांनी ठरवलं होतं की उगीच कोर्टकचेऱ्या, खटले ह्या भानगडीत पडायचंच नाही. पोरीला आपल्याकडे ठेवून घ्यायचं नि गप्प बसायचं.

मंगल संपूर्ण बरी होऊन हॉस्पिटलमधून घरी जायला सहा महिने लागले. तिच्या भाजल्याच्या जखमा बऱ्या झाल्या पण त्या व्रणांमुळे तिची कातडी वेडीवाकडी ओढली जाऊन विद्रूप दिसत होती. डॉक्टर म्हणाले प्लॅस्टिक सर्जरीने कातडी पूर्ववत होऊ शकेल. पण आधीच खूप खर्च झालेला. मंगलचा बाप काही कुणी मालदार नव्हता. त्याला आणखी खर्च करणं झेपणारं नव्हतं. मंगलही काही बोलली नाही. आईवडलांनी इतकं केलं, मरणाच्या दाढेतून आपल्याला ओढून काढलं, एवढा खर्च केला ह्याचंच तिला ओझं वाटत होतं. आता ह्यापुढे तरी आपला बोजा त्यांच्यावर टाकायचा नाही

असं ठरवून ती नोकरी बघायला लागली. शिक्षण झालेलं नाही, कसलंच कसब नाही, तिला नोकरी तरी कसली मिळणार? शेवटी ती आसपासच्या बायांबरोबर खुरपणीला जायला लागली, पण ते काम तिला जमेना. साताठ तास डोक्यावर ऊन घेत कष्ट करायची तिला सवय नव्हती. ह्या सुमाराला तिची एक माहेरी आलेली मैत्रीण तिला भेटली. तिचं जवळच्या जरा मोठ्या गावात लग्न झालं होतं. तिनं मंगलला विचारलं, ''तू घरकाम, स्वैपाक करशील का? आमच्या इथले एक बागाईतदार आहेत. त्यांची स्वैपाकीण काम सोडून गेलीय. त्या वहिनी मला विचारीत होत्या तुला कुणी माहिती आहे का म्हणून.''

''पण मला जमेल का?''

''न जमायला काय झालं? घरी स्वैपाक करतेस ना तू? बघ, येत असलीस तर चल माझ्याबरोबर. मी तुझी त्यांची गाठ घालून देईन. दोन दिवस माझ्याकडे रहा. नोकरीचं जमलं तर तुझ्यासाठी भाड्यानं खोली बघू.''

हो ना करता मंगल तयार झाली. ती कायम आपल्याकडे रहाणार म्हणून भावाची थोडी कुरकूर चाललीच होती. आईनंही मग भर घातली.

नोकरी मिळाली आणि मंगल भाड्याच्या खोलीत रहायला गेली. आधी तिला एकटं रहाणं अवघड वाटत होतं. पण शेवटी कुणाचं तरी मिंधं होऊन रहाण्यापेक्षा स्वतंत्र रहाणं बरं असं वाटलं. काही काळ तिला आपल्या विद्रूप झालेल्या कातडीची लाज वाटायची, पण साडी चांगली लपेटून खालमानेनं चाललं की सहज बघणाऱ्याच्या लक्षात सुद्धा येणार नाही अशा तऱ्हेनं भाजलेला भाग लपून जात असे. कुणी आवर्जून विचारलंच तर स्वैपाक करताना भाजलं म्हणून सांगायची.

जिथे काम करायची ते मुलाबाळांचं पाहुण्यारावळ्यांचं कुटुंब होतं. काम भरपूर होतं पण माणसं चांगली होती. पगार बरा होता, शिवाय उरलं सुरलं अन्न मिळायचं त्यात तिचं रोज एखादं जेवण भागायचं. शक्य तितका पगार वाचवून ती आईवडलांना पाठवायची. तिच्या मालकिणीनं तिला एकदा विचारलं तू काही पगार बाजूला ठेवतेस का म्हणून. मंगल म्हणाली नाही.

''का नाही? सगळेच पैसे आईवडलांना पाठवू नको. स्वत:साठी काहीतरी राखून ठेव. नाहीतर म्हातारपणी तुला काय आधार?''

त्यांनी मंगलच्या नावानं बँकेत खातं उघडलं आणि परस्परच तिच्या

पगारातले काही पैसे त्यात भरायला लागल्या. एकदोन महिने पैसे कमी आल्यावर लगेच तिच्या वडलांचं पत्र आलं. तिनं लिहिलं की अंगावरची साडी पारच फाटली होती, नवी घ्यावी लागली त्याला पैसे गेले. त्यावर वडलांचं उपदेशपर पत्र आलं. आपली परिस्थिती समजून घेऊन काटकसरीने रहात जावे, उगीच उधळपट्टी करू नये. आपण खोटं बोललो म्हणून मंगलला वाईट वाटलं, पण खरं सांगितलं असतं तर वडील रागवले असते. मात्र आता दर महिन्याला कमी पैसे पाठवले म्हणजे काय सबब सांगायची हा प्रश्न होताच.

भावाचं लग्न ठरलं तेव्हा वडलांनी मंगलला उचल मागायला सांगितली. तिला ते फार अवघड वाटत होतं. तिनं चाचरतच मालकिणीला विचारलं. मालकीण सहज कबूल झाली. आईनं निदान आठवडाभराची सुट्टी काढून घरी ये म्हणून बोलावलं. वऱ्हाडीमंडळी खूप जमणार तेव्हा राबायला कुणी तरी हवंच. मंगलची थोरली लग्न झालेली बहीण मला इतके दिवस पाठवीत नाहीत म्हणून अंगाबाहेर टाकून मोकळी झाली. वऱ्हाड लग्नघरी गेल्यावर मंगलला आईनं सांगितलं शक्यतो सगळ्यांच्या समोर येऊ नको म्हणून. तिला नेमकं काय झालं हे व्याह्यांच्या घरी कुणाला माहीत नव्हतं. तिला पाहून कुणीतरी प्रश्न विचारायचे, मग वळवळत्या जिभांनी एकाचे दोन करून सगळीकडे खोटंनाटं पसरवायचं कशाला? मंगलला वाटलं, मला भावाच्या लग्नात मिरवायचा सुद्धा हक्क नाही. स्वत:च्या घरी आल्यावर तिनं मोकळा श्वास घेतला.

तीन-चार वर्षं सगळं सुरळित चाललं होतं. एक दिवस एकदम तिचे वडील तिला भेटायला आले. म्हणाले, ''तुझ्या नवऱ्यावर पोटगीसाठी दावा लावायचाय.''

''कशाला? आपल्याला काय कमी आहे?''

तिच्या मनात तिच्या नवऱ्याबद्दल, सासरच्या लोकांबद्दल कित्येक दिवसांत काही विचारही आला नव्हता. आता त्या सगळ्याच गोष्टींची आठवण आल्यावर तिच्या अंगावर सरसरून काटा आला.

वडील म्हणाले, ''तुझा हक्क आहे पोटगीचा. त्याचं दुकान चांगलं चाललंय, भरपूर पैसा मिळतोय. तुला त्यातला वाटा मिळायला पाहिजे.''

''दुसरं लग्न करायचं म्हणून ज्यानं मला जाळून मारायचा घाट घातला त्याचे पैसे कशाला पायजेत आपल्याला?''

तिला कळलं होतं की तिच्या हक्कापेक्षा त्यांना त्यातून पैसे मिळण्याची

शक्यता जास्त महत्त्वाची होती. त्यांच्या साखर कारखान्यातल्या नोकरीतून ते निवृत्त झाले होते. मुलाला कायम नोकरी नव्हती आणि त्याचा संसार मात्र वाढत होता. तिच्या पोटगीच्या निमित्ताने त्यांच्या संसाराला हातभार लागला तर त्यांना हवा होता. शेवटी त्यांच्या हट्टापायी तिनं त्यांनी पुढे केलेल्या कागदपत्रांवर अंगठा उठवला. तिच्या नवऱ्याने वकिलातर्फे आपलं उत्तर कळवलं. मी काही बायकोला सोडून दिलेली नाही. ती आपल्या पायाने माझं घर सोडून माहेरी जाऊन राहिलीय. तशातूनही ती परत आली तर मी तिला नांदवायला तयार आहे. तेव्हा पोटगी देण्याचा प्रश्नच नाही.

मग अघटितच घडलं. वडील म्हणायला लागले, तो येवढा म्हणतोय तर तू का नाही जात परत? मंगलला हे खरंच वाटेना.

ती म्हणाली, ''त्यांच्याकडे परत जायला तुम्ही कसं सांगता? मग मला वाचवलंत कशासाठी? मरू द्यायचं होतंत.''

वडील चिडले. ''म्हणजे येवढं आम्ही केलं तुझ्यासाठी, त्याचं तुला काहीच नाही. तुझ्यावरच्या मायेपोटीच आम्ही येवढी धडपड केली ना?''

''मग माया असली तर तुम्ही मला त्याच्याकडे परत कसं पाठवता?''

वडलांनी तिची समजूत घालण्याच्या प्रयत्न केला. ''कुणास ठाऊक, कदाचित त्याला आपण केलं त्याचा पश्चाताप झाला असेल. माणसं बदलतात.''

''मग इतकी वर्षं त्यानं माझी साधी विचारपूस सुद्धा कशी केली नाही? आता पोटगी द्यायला नको म्हणून तो मला नांदायला बोलावतो. त्याच्यावर विश्वास कसा टाकायचा? उलट आता जास्तच धोका आहे. मला मारूनच टाकायची म्हणजे पोटगी मागायचा प्रश्नच नको.''

''असं वेडंवाकडं मनात आणू नको.''

''का नको? एकदा घडलंय ना.'' ती रडायला लागली. ''मी तुम्हाला इतकी जड झालेय का?''

''आमचं पोटचं मूल आम्हाला कसं जड होईल? पण आम्ही काय तुला जन्मभर पुरणार आहोत का? आमच्या मागं तुझं कसं होईल? एकटीनंच सारा जन्म काढणार आहेस का?''

वडील गेल्यावर मंगलने खूप विचार केला. जळून मरण्यापेक्षा एकटीनं जन्म काढायला काय हरकत आहे? नाही तरी आता आईवडलांचं घर माझ्या हक्काचं कुठ राह्यलंय? मी एकटीच राहून पोटाला मिळवून खातेय

ना? मग तसंच जन्मभर करीन. पण हे वडलांसमोर बोलायचं तिला धाडस झालं नाही. तिचे वडील आणि भाऊ तिच्या नवऱ्याला भेटून त्याच्याशी बोलणं करायला गेले. मंगलच्या सुदैवाने तिच्या नवऱ्याचा तिला परत स्वीकारण्याचा काही इरादा नव्हता. तो तिला नांदवण्यासाठी खूप पैसे मागायला लागला तेव्हा तिचे वडील त्याला शिव्या देत परत आले.

मंगलचं आयुष्य सुरळित चाललं होतं आणि त्यात ती आपल्या परीने समाधानी होती. एखाद्या वेळी इतरांसारखा आपला संसार असावा, मुलं बाळं असावी असं तिला वाटे पण ते आपल्या नशिबातच नाही अशी ती स्वत:ची समजूत करून घेई. एक दिवस अचानक तिची बहीण आणि मेव्हणा तिला भेटायला आले. मंगल म्हणाली, ''इकडे कुठे? का काही काम काढलं होतं?'' बहीण चटकन बोलेना तेव्हा मंगल म्हणाली, ''बोला की दाजी.''

''तुझ्याकडेच काम होतं.''

''माझ्याकडे?''

''तुला पुन्हा लग्न करायचं का?''

''मी तसा विचारच केला नाही आणि पहिलं लग्न मोडल्याशिवाय कायद्याने दुसरं करता येत नाही ना?''

''आता नवऱ्याला सोडून तुला पाच-सात वर्षं झाली, म्हणजे तुझं लग्न मोडल्यातच जमा आहे.''

''बरं समजा असलं, तरी माझ्याशी कोण लग्न करणारे? तुम्ही असं का विचारताय मला?''

मग बहीण म्हणाली, ''ह्यांचा एक मित्र आहे. त्याच्यात थोडंसं व्यंग आहे म्हणून त्याचं लग्न झालेलं नाही. एकदा बोलता बोलता विषय निघाला न् आम्ही त्याला तुझ्याबद्दल सांगितलं. तो तुझ्याशी लग्न करायला तयार आहे.''

एकदम गुंतागुंतीच्या परिस्थितीला तोंड द्यायला लागलं किंवा आपण कसल्यातरी दबावाखाली आहोत अशी जाणीव झाली की मंगलची जीभ अडखळायला लागायची. ती चाचरत म्हणाली, ''पण क-क-कोण आहे हा म-म-माणूस? त्याला भेटल्याशिवाय मी कसं काही सांगू?''

''आम्ही तुझी त्याची गाठ घालून देऊ की. पण आम्ही काय तुझं नुकसान का करणार आहोत? चांगला माणूस आहे. ह्यांना खूप वर्षं माहिती आहे. त्याचा बिझनेस आहे, भरपूर पैसा मिळवतो, स्वत:चं घर आहे. तुझ्या जन्माचं कल्याण होईल.''

इतकं सगळं ज्याच्याकडे आहे तो आपल्यासारखीशी कशाला लग्न करील असा विचार का कोण जाणे मंगलच्या मनात काही आला नाही. लग्नाच्या कल्पनेनं ती हुरळली. लग्नानंतरचे पहिले काही दिवस तिला आठवले. तेव्हा नवरा तिच्याशी प्रेमाने वागे, तिचे लाड करी, गपचूप तिला एखादी वस्तू, तिच्या आवडीचं काही खायला आणून देई. कदाचित आपल्या नशिबात तसं सुख पुन्हा असेल असं तिला वाटलं. दोन दिवस रजा काढून ती बहिणीकडे जाऊन आली. तिनं त्याला पाहिलं. तसं व्यंग म्हणजे काय तर त्याचा एक पाय जरा अधू होता आणि चालताना तो थोडा लंगडत होता. त्याचं तिला काही वाटलं नाही पण तो तिला फारसा आवडला नाही. का ते तिला सांगता आलं नसतं. आणि बहिणीला तसं म्हणायचा तिला धीर झाला नाही.

बहीण म्हणाली, ''तू त्यांना अगदी पसंत आहेस.''

''त्यांनी तर माझ्याकडे पाहिलं सुद्धा नाही. काही बोललेही नाहीत.''

बहीण गालातल्या गालात हसून म्हणाली, ''जरूर तेवढं पाहिलं. आणि काही माणसं भिडस्त असतात. लग्नानंतर मारतील हो भरपूर गप्पा. मग कधी नक्की करायचं लग्नाचं? जेवढ्या लवकर तेवढं बरं.''

''आईला, बाबांना विचारू या.''

''काही नको. ते उगीच घोळ घालीत बसतील नि संधी हातची निसटून जाईल.''

मंगलने नोकरीचा राजीनामा दिला. तिच्या लग्नाला ती, तिचा होणारा नवरा, बहीण, मेव्हणा इतकेच जण हजर होते. तेव्हाच मंगलच्या मनात जराशी पाल चुकचुकली. लग्न म्हणजे तरी काय, त्यांनी एकमेकांना हार घातले, दुसऱ्या दोघांनी त्यांच्यावर अक्षता टाकल्या, पेढे खाल्ले. त्याच्या घरीच समारंभ झाला आणि नंतर तिला तिथेच सोडून बहीण आणि तिचा नवरा निघून गेले. मंगलला सगळंच जरा विपरीत वाटत होतं. इथे दुसरं कुणीच कसं नाही? त्याच्या घरात इतर कुणी माणसं नाहीत? तिला जराशी भीती वाटायला लागली. पण बहीण गावातच आहे म्हटल्यावर थोडा तरी आधार वाटला.

थोड्याच दिवसांत त्याचं खरं व्यंग काय होतं त्याचा तिला पत्ता लागला. आणि तसं असताना त्यानं आपल्याशी लग्न का केलं त्याचाही पत्ता लागला. सगळं घरकाम, स्वैपाक करायला फुकट मोलकरीण हवी होती. शिवाय

त्याच्या बिझनेसमधल्या महत्त्वाच्या लोकांना पार्ट्या द्यायच्या आणि त्यांचं 'मनोरंजन' करायचं ह्यासाठी त्याला ती हवी होती. प्रथमच एका क्लायंटने तिच्याशी लगट केली तेव्हा तिनं त्याला झटकून टाकलं. ती नवऱ्याला म्हणाली, ''मला नाही हे असलं आवडत. तो तुमच्यासमोर माझ्यावर हात टाकतो न् तुम्ही त्याला काहीच कसं म्हणत नाही?''

''आवडून घ्यावं लागेल.''

''म्हणजे?''

''त्यासाठीच तर मी आणलंय तुला.''

''लाज नाही वाटत असं बोलायला? मला हे खपायचं नाही. तुम्हाला माझ्याबरोबर नीटपणे रहायचं नसलं तर मी निघून जाते.''

त्याने स्मित केलं. ''निघून कोण जाऊ देतंय तुला? चांगले पैसे मोजलेत तुझ्यासाठी, माहीताय? जिथे कुठे जाशील तिथून फरफटत आणीन तुला.''

तो चिडला असता तर वाटली असती त्यापेक्षा किती तरी जास्त भीती तिला त्याच्या थंड क्रूरपणाची वाटली. परिस्थितीतला धोका ओळखून ती भांडण न वाढवता गप्प बसली. तिच्या मनात आलं, बहिणीला हे माहिती असून तिनं आपला विश्वासघात केला असेल? ती काही दिवस थांबली. मुकाट तो म्हणेल तसं वागत राहिली. मग एका रात्री तो झोपला असताना ती गपचूप दार उघडून पळून गेली. बहिणीकडे गेले तर कदाचित ती धोकाच द्यायची म्हणून ती आडवळणांनी जात जात कुठल्या तरी मोठ्या रस्त्यापर्यंत येऊन पोचली. ट्रकला वगैरे हात दाखवण्यात अर्थच नव्हता. बससाठी तिच्याजवळ पैसे नव्हते. शेवटी तिला एक बैलगाडी दिसली. त्यात बरेच जण होते. बायामाणसं, पोरं दिसत होती. तिनं गयावया करून त्यांना गाडीत जागा द्यायला लावली. रात्रीतनं कधीतरी ती गावी आली नि आपल्या मैत्रिणीच्या घरी गेली. दुसऱ्या दिवशी मालकिणीकडे जाऊन रडली, ''मला माझ्या बहिणीनं फसवलं. तुम्ही मला परत कामावर घेता का?'' बाई म्हणाल्या, ''मी दुसरी बाई कामाला लावलीय, तिला हाकलून तर देता येत नाही ना?'' मंगल म्हणाली, ''मग मी काय करू तुम्हीच सांगा. मला दुसऱ्या कुणाचा आधार नाही.''

बाई विचार करून म्हणाल्या, ''मुंबईला जाशील का? माझी एक भाची तिथे असते, तिला कामाच्या बाईची फार गरज आहे. जात असलीस तर सांग. मी तुला सोबत देऊन पाठवीन.''

मंगलला थोडी धाकधूक वाटत होती, पण तिनं विचार केला, विश्वास तरी कुणावर टाकायचा? बहिणीनं हे असं केलं. ह्या बाईंनी मला नेहमीच चांगलं वागवलंय. त्या मुद्दाम माझं वाईट कशाला करतील?


ती म्हणाली, ''जाते मी.''

''आईला, वडलांना विचारायचं नाही का?''

''मग कळवीन. आता मला कुणालाच काही सांगायचं नाही की विचारायचं नाही.''

मंगलला नोकरी पसंत पडली. जेवण, कपडे, वर चांगला पगार. ती आईवडलांना दर महिन्याला पैसे पाठवायची, पण पगार किती आहे ते तिनं त्यांना सांगितलं नाही. बँकेत खातं उघडून ती त्यात नियमितपणे पैसे टाकायची. कुणी कुणाचं नसतं आणि आपल्या भविष्यकाळाची तरतूद आपल्यालाच केली पाहिजे हे तिला कळून चुकलं होतं. वर्षातनं पंधरा दिवस तिला सुट्टी मिळायची तेव्हा ती सगळ्यांसाठी खाऊ, बक्षिसं घेऊन घरी जायची. सगळे खूष असायचे. पाचसहा दिवसांतच कंटाळा येऊन ती परत जायची. बहिणीला मात्र ती कधी भेटायला गेली नाही आणि बहिणीनं पुढाकार घेऊन करून दिलेल्या लग्नाबद्दल ती कुणाला काही बोलली नाही. वडलांनी तिच्याकरता एक-दोन स्थळं आणली होती पण तिनं ती पसंत केली नाहीत. त्यांना धड नोकऱ्या नव्हत्या, घरदार, जमीन नव्हती. तिनं विचार केला, म्हणजे नवऱ्यानं शेवटी माझ्या जिवावरच जगायचं. बाहेरही मी राबायचं आणि घरातही. पुन्हा तो चांगलं वागवील ह्याची काय हमी? त्यापेक्षा मी आहे ती काय वाईट आहे? तिनं वडलांना सांगून टाकलं ह्यापुढे स्थळं बिळं बघू नका, मला लग्न करायचं नाही.

❖❖❖


माग्रिट

मार्गरिटला वाटलं होतं की आता तरी आईबापांचा आपल्या मागचा ससेमिरा बंद होईल. पण तिला मेडिकल कॉलेजात प्रवेश मिळाला आणि तो सुद्धा केरळापासून इतक्या लांब महाराष्ट्रात, तरी त्यांची लग्न करण्याबद्दल भुणभुण सुरूच राहिली. वर्षातनं एकदा सुट्टी घेऊन घरी गेलं की बघण्याचे कार्यक्रम चालायचे. त्याला वैतागून तिनं सुट्टीच घ्यायचं बंद केलं तर तिचे वडील दर दोन-तीन महिन्यांनी एखाद्या स्थळाची माहिती घेऊन यायचे. ती म्हणायची, ''नुसतं एवढ्या माहितीवर मी हो-नाही कसं ठरवणार? मला नाही ही असली पद्धत मान्य.''

''आपल्या देशात सगळ्यांची अशीच लग्नं होतात. तू काय एवढी जगावेगळी लागून गेलीयस?''

''पण निदान माझं शिक्षण संपेपर्यंत तरी थांबू द्या. नाहीतर एवढी धडपड करून मेडिकलला गेल्याचा काय फायदा?''

''लग्न झाल्यावर शिक्षण पुरं करता येत नाही? किती उदाहरणं दाखवू तुला?''

तशी तिची दुसऱ्या कुणाशी ओळख होती असं नव्हे आणि होऊनही काही फायदा नव्हता. तिचे आईवडील कट्टर सनातनी होते आणि त्यांना जावई केवळ ख्रिस्तीच नव्हे तर त्यांच्या विशिष्ट पंथातलाच हवा होता.

ह्याच सुमाराला अमेरिकेला गेलेल्या तिच्या एका लांब लांबच्या भावाचं तिला अचानक पत्र आलं. असंच इकडच्या तिकडच्या गप्पांचं. तिला आश्चर्य वाटलं कारण ते तीन-चारदा भेटलेले होते तरी त्यांच्यात काही खास सूत नव्हतं. तिनं त्याला उत्तर लिहिलं आणि मग त्यांची पत्रापत्री सुरू झाली. आपल्या आवडीनिवडी, मतं खूप जुळतात असं तिच्या ध्यानात आलं. एक दिवस त्यानं तिला लग्नाची मागणी घातली. तिचा होकार आल्यानंतर त्यानं तिला सांगितलं की तो परदेशी जाण्यापूर्वीच्या भेटीच्या वेळी, जेव्हा ती एक निरागस षोडषवर्षा होती, त्यानं ठरवलं होतं की तिच्याशी लग्न करायचं. पण इतरांनी ठरवून तिला आपल्या गळ्यात बांधायचं हे त्याला पटत नव्हतं. त्यानं ठरवलं होतं की ती पुरेशी मोठी होईपर्यंत, स्वत:चा स्वत: निर्णय घ्यायला समर्थ होईपर्यंत थांबायचं.

मार्गरिटनं लग्नाला होकार दिला तेव्हा तिच्या मनात होतं, लग्न करायचंच तर मग हा थोडा तरी माहीत असलेला, ज्याचे आपले विचार बरेच जुळतात असा माणूस नवरा म्हणून काय वाईट आहे? पण मग त्याने हा सगळा

इतिहास सांगितल्यावर ती आतून कुठेतरी खूप सुखावली. तिनं त्याला लिहिलं, ''पण मधेच मी दुसऱ्या कुणाशी तरी लग्न केलं असतं म्हणजे?'' ''मी माझ्या हेरांकरवी तुझ्यावर नजर ठेवली होती ना.'' मग तिनं लिहिलं, ''म्हणजे हे ठरवून झालेलं लग्नच झालं की. तू ठरवलेलं.'' त्याने उत्तर पाठवलं, ''पण तुझ्या इच्छेविरुद्ध तुझ्यावर लादलेलं नव्हे.''

मार्गरिटच्या आईवडलांना तो फारसा पसंत नव्हता. त्याचं वय तिच्यापेक्षा बरंच जास्त होतं आणि त्याचं कुटुंब त्यांच्यापेक्षा खालच्या दर्जाचं होतं. तरी पण निदान तो त्यांच्या 'जाती'चा तरी होता.

दीडेक वर्षाने तो हिंदुस्थानात परत येणार होता तेव्हा लग्न करायचं असं निश्चित झालं आणि दुर्दैवाने तो एकाएकी वारला. त्याच्या हृदयात एक क्वचितच आढळणारा दोष होता आणि हे कुणालाही माहीत नव्हतं. त्याला झटका येऊन हॉस्पिटलमधे नेलं तेव्हा नक्की काय झालं त्याचं निदान पुरेसं लवकर झालं नाही. झालं असतं तर तो कदाचित वाचला असता. मार्गरिटची प्रेमकथा सुरू होण्यापूर्वीच संपली. ह्या आघातातून सावरणं तिला कठीण गेलं. पण तिचा अभ्यास होता, काम होतं त्यात तिनं स्वत:ला शक्य तितकं गुंतवून घेतलं. तिच्या होणाऱ्या नवऱ्याने लिहून ठेवलेल्या सूचनेप्रमाणे त्याचे कपडे, पुस्तकं, इतर थोडंफार सामान तिच्याकडे पाठवण्यात आलं. बरेच दिवस पार्सलं उघडून पहाण्याचंही धैर्य तिला झालं नाही. तिच्या हॉस्टेलमधल्या खोलीच्या कोपऱ्यात ती पडून होती. मग हळूहळू एकेक वस्तू बघत, हाताळत तिनं दु:खाला वाट करून दिली.

ती एम्.डी. होऊन एका मोठ्या हॉस्पिटलमधे नोकरीला लागली. खाजगी प्रॅक्टिसपेक्षा तिला ते बरं वाटलं. कन्सल्टंट म्हणून कामाची सुरुवात करायला बरेच पैसे लागले असते ते तिच्याकडे नव्हते. नोकरी म्हणजे पगार लगेच सुरू होतो. शिवाय अगदी घाण्याला जुंपल्यासारखं काम करावं लागत नाही. एकदा घरी आलं की वाचन वगैरे करायला वेळ मिळतो. असा सगळा विचार करून तिनं नोकरी करायचा निर्णय घेतला.

तिच्या आईवडलांचा दबाव परत सुरू झाला. जन्मभर तू नुसती त्याच्या आठवणींवर का जगणार आहेस? जगायला काही आधार नको का? घर-संसार, मुलं-बाळं, नवरा ह्या सगळ्यांशिवाय तू एकटीनं आयुष्य कसं काढणार? मार्गरिटला लग्न करायचंच नव्हतं असं नाही. पण आपल्या इतक्या वयाच्या, स्वत:च्या पायावर उभ्या असलेल्या, आपलं ज्ञान, कसब पणाला

लावून कामाचं आव्हान समर्थपणे पेलणाऱ्या बाईने बघून सवरून लग्न करायचं ही कल्पनाच तिला सहन होत नव्हती. अनेक डॉक्टर होणाऱ्या बायका अशा तऱ्हेने लग्न करतात आणि सुखाचे संसार करतात हे तिनं पाहिलं होतं. पण तरी वरवर सुखी वाटणाऱ्या अशा लग्नांत सुद्धा तणाव असतात, बाईला खूप तडजोडी कराव्या लागतात हेही तिनं पाहिलं होतं. वाटेल त्या तडजोडी करायची तिची तयारी नव्हती. व्यवसायाच्या दृष्टीने ती एका चांगल्या वळणावर येऊन पोचली होती. एका उत्तम मानल्या गेलेल्या हॉस्पिटलमधे तिला नोकरी होती. हवं त्या पद्धतीने काम करायला मिळत होतं. चांगले सहकारी होते, त्यांच्याशी विचारांची, अनुभवांची देवघेव करताना खूप काही लाभत होतं. मग केवळ लग्न झालं नाही म्हणून काय अडत होतं?

पण हे सगळं स्वत:ला सांगून पटवून सुद्धा अशा वेळा येत की तिला वाटे, एवढंच असतं का आयुष्यात? मग कधीकधी हा एकटेपणा का अंगावर येतो? ज्याच्याजवळ अगदी खोल मनातल्या गोष्टी बोलता येतील असं हक्काचं माणूस असावं असं का वाटतं? हा माझा कमकुवतपणा आहे की ही जगाची रीत आहे?

कदाचित ती असे हेलकावे खात असल्यामुळे म्हणा, पण तिच्यात वरवरच्या ओळखीपेक्षा जास्त रस दाखवणारा भेटला तेव्हा त्याला प्रतिसाद देण्याची तिची मनस्थिती झालेली होती. ती काम करीत होती त्याच शहरात भरलेल्या एका मेडिकल कॉन्फरन्समधे तिच्या सेक्शनमधे तिला एक डॉक्टर भेटला. हिंदीच पण मलेशियात बरीच वर्षं राहिलेला. कॉन्फरन्सच्या तीन-चार दिवसांत त्यांची बरीच ओळख झाली. सेशन्सच्या व्यतिरिक्त वेळात ती त्याला शहर दाखवायला जात होती, निरनिराळ्या रेस्टॉरंट्समधे खाऊ घालीत होती. त्यांच्या खूप गप्पा होत होत्या. त्यात एकमेकांच्या कुटुंबांची माहिती, आवडीनिवडी ह्यांची देवघेव झाली. आवडीनिवडी फारशा जुळत होत्या असं नाही, पण त्याला फार महत्त्व आहे असं तिला वाटलं नाही. त्याच्या सहवासात तिचा वेळ खूप मजेत जात होता, पण अजून तरी ह्या सहज झालेल्या मैत्रीचा प्रवास विशिष्ट दिशेने जावा अशी निकड वाटत नव्हती. परत जाताना त्यानं तिला सांगितलं की मला तुझ्याशी लग्न करायला आवडेल. मला माहीत आहे की मी अगदी थोड्या ओळखीवर हे म्हणतोय. तू विचार कर, तुला हवा तितका वेळ घे. मात्र माझ्या बाजूने माझा विचार

अगदी ठाम आहे.

तो गेला ते मार्गरिटच्या जीवनात वादळ उठवून. तिच्या मनात अनेक शंका होत्या. ती सावळी, बुटकी, स्थूलतेकडे झुकणारी होती. नाकीडोळीही फार सुंदर होती असं नव्हे. एखाद्या पुरुषाला पहाताक्षणी आकर्षित करून घेण्यासारखं तिच्यात काही नव्हतं. पत्रातून तिनं त्याला असं लिहिलं तेव्हा तो म्हणाला, माझ्या तरी रूपात असं काय आहे की एखादीने बघूनच माझ्या प्रेमात पडावं? आणि एखादा तिशीतला माणूस काही रूपाकडे बघून लग्न करीत नाही. तुझी बुद्धिमत्ता, व्यवसायातली गती हे मला जास्त महत्त्वाचं वाटतं. मला बायको म्हणून एक नखरेल बाहुली नकोय, माझ्या खांद्याला खांदा लावून माझ्या आयुष्यातला सुखदु:खाचा वाटा उचलणारी प्रगल्भ स्त्री हवीय.

काही महिने त्यांचा पत्रव्यवहार चालला होता. शेवटी तिनं त्याच्याशी लग्न करण्याचा निर्णय घेतला. तिला वाटलं, आयुष्यात कधीतरी धोके पत्करावेच लागतात. दैवयोगाने ही संधी मला पुन्हा एकवार मिळाली आहे ती घ्यायला काय हरकत आहे? व्यावसायिक दृष्टीने थोडी पीछेहाट होईल, पण एका माणसाला सगळीच मापं भरभरून कुठे मिळतात? तिकडे गेल्यावरही काम करायची संधी आहेच. परदेशात जाऊन रहाण्याचं आकर्षणही वाटत होतं. त्यानं पत्रात त्याच्या घराचं फार सुरेख वर्णन केलं होतं. छोटंसं बंगलीवजा घर, शहराबाहेर एका कॉलनीत. कॉलनीमागे दाट झाडी असलेला डोंगर आणि घरासमोर सुरेखशी बाग.

आईवडलांनीही परवानगी दिली. तो त्यांच्या पंथाचा नसला तरी निदान ख्रिश्चन होता. ती लांब परदेशात जात असली तरी मी काही वर्षांनी परत येणार आहे असं त्यांच्या जावयाने ध्वनित केलं होतं आणि व्यावसायिक नुकसानीबद्दल मार्गरिट बोलली तेव्हा तिची आई म्हणाली, उगीच काहीतरी फाटे फोडीत बसू नको.

लग्न होऊन मलेशियाला गेल्यावर हनीमून वगैरे संपला आणि मार्गरिटला पहिला धक्का बसला. तिथल्या कायद्याप्रमाणे परदेशी माणसाला तीन वर्षांच्या वास्तव्याशिवाय डॉक्टरी करायला परवानगी नव्हती.

''तीन वर्षं? तू ह्याबद्दल काहीच कसं बोलला नाहीस?''

''त्यात मुद्दाम सांगण्यासारखं काय होतं? प्रत्येक देशातच परकीय डॉक्टरांवर अशा तऱ्हेची बंधनं असतात. हिंदुस्थानात सुद्धा आहेत.''

''तो प्रश्न नाहीये. आपण ह्या विषयावर जेव्हा जेव्हा बोललो किंवा लिहिलं तेव्हा मी इथे येऊन लगेच तुझ्याबरोबर काम करू शकेन असं तू भासवलंस.''

''मी काहीही भासवलं नाही. तू मला अगदी अशा शब्दांत स्पष्टपणे कधी विचारलं होतंस का? मी धरून चाललो होतो की लग्न झाल्या झाल्या काही दिवस घरी राहून संसार करायला तुला आवडेल. तू अगदी असं बोलत्येयस की तू फक्त डॉक्टरी करण्यासाठी इथे आलीस. मग नोकरी पहायची होतीस. लग्न कशाला केलंस?''

''रॉबर्ट, मी संसार करायचा नाही असं म्हणतेय का? पण संसार चोवीस तास घरी बसूनच करावा लागतो का? तू लग्न झालं म्हणून काम सोडून नुसता घरी बसशील का? मग मी तसं करावं अशी अपेक्षा तू कशी धरतोस?''

''मी घरी बसलो तर खायचं काय?''

तो मुद्दाम वेड पांघरीत होता तेव्हा तिनं तात्पुरता वाद सोडून दिला. पण काही कारण नसताना त्याने आपल्याशी प्रतारणा केली म्हणून ती खूप दुखावली गेली. त्याने असं का केलं ते मात्र तिला समजत नव्हतं. एखादी साधीसुधी घर-संसार ह्यातच सुख मानणारी बायको त्याला सहज मिळाली असती. मग तिच्या बुद्धिमत्तेची, व्यावसायिक यशाची तारीफ करीत मुद्दाम तिच्याशी त्यानं लग्न का केलं. कारणं दोनच असू शकत होती. एक म्हणजे त्याच्यात काहीतरी सहज न समजणारं व्यंग, उणेपणा होता. त्यामुळे त्याचं लग्न होत नव्हतं आणि तिच्यासारख्या प्रौढ अविवाहितेला त्यानं विनासायास जाळ्यात ओढलं होतं. दुसरं म्हणजे त्याला ती खरंच फार आवडली होती आणि खरं सांगितलं तर ती कदाचित त्याच्याशी लग्न करणार नाही अशी त्याला भीती वाटली. हे दुसरं कारण जरी खरं असलं तरी त्यामुळे तिचा अहंकार काही सुखावला नाही. त्याने केलेल्या फसवणुकीबद्दल तिच्या मनात अढी राहून गेली. तो मात्र, एकदा वादाचा मुद्दा तिनं तात्पुरता बाजूला सारल्यावर, तिच्याशी प्रेमानं वागत होता.

दोघांसाठी घर चालवायला कितीसा वेळ लागणार? त्यातून दिवसभर आणि पुष्कळदा रात्री उशीरपर्यंत ती एकटीच असे. वाचन, बागकाम असं करूनही वेळ जाता जात नसे. मग तिनं मूल होऊ द्यायचं ठरवलं. काम करण्याची वेळ येईपर्यंत ते पुरेसं मोठं तरी होईल. तिला दिवस गेल्यावर

त्याला खूप आनंद झाला. तो तऱ्हेतऱ्हेने तिचे लाड करी. हळूहळू सुरुवातीची कटुता विसरून तीही संसारात, त्याच्या प्रेमात रमायला लागली. तिला मुलगा झाला आणि तिच्या आयुष्याला एकदम वेगळंच परिमाण लाभलं. आता तिचा दिवस कसा जायचा तिला कळतही नसे. एकदा रॉबर्ट म्हणाला, ''बघ, माझंच बरोबर होतं की नाही? आता तू काम करता येत नाही म्हणून झुरत नाहीस ना? किती आनंदात असतेस!'' तिला धक्का बसला. म्हणजे हीच ह्याची अपेक्षा होती. ती म्हणाली, ''कितीही आनंदात असो. पण तीन वर्षं झाली की मी काम करण्याच्या परवान्यासाठी अर्ज करणार आहे हे ध्यानात ठेव.''

''पण का? काय कमी आहे तुझ्या आयुष्यात?''

''रॉबर्ट, मी मागे एकदा विचारला होता तोच प्रश्न तुला पुन्हा विचारते. समजा मी काम करून पैसे मिळवीत असते तर तुला घरी राहून बाळाला संभाळणं, स्वैपाक करणं एवढंच करून पूर्ण समाधान मिळेल?''

''मुलांना जन्म देणं, त्यांना संभाळणं, घरकाम करणं हे बाईचं काम आहे.''

''असं कुणी ठरवलं?''


''निसर्गानं. पुरुष मूल जन्माला घालू शकतो?''

तिला कळून चुकलं की त्याच्या ह्या बाबतीतल्या कल्पना फार ठाम आहेत आणि त्या बदलणं फार अवघड होणार आहे. तिला अशीही भीती वाटायला लागली की आपल्याला काम करू द्यायचा त्याचा इरादाच नाही, कधीच नव्हता. कायदा काहीही असला तरी त्याची इच्छा आणि सहकार्य ह्यांशिवाय ती काम करू शकणार नव्हती. बरं, मायदेशी परत जाण्याबद्दलही तो काही वायदा करीत नव्हता. इथे भरपूर पैसे मिळतायत, तिकडे जाऊन बस्तान बसवायला वेळ लागणार. घाई काय आहे, आणखी थोडी वर्षं इकडेच काढू, असं तो म्हणे. ह्या कोंडीतून बाहेर पडायला एकच मार्ग होता, तो म्हणजे त्याला सोडून जायचं. पण आता एकटं परत जायचं म्हणजे मुलाचा प्रश्न होता. पुन्हा मुलावर त्याचा फार जीव होता. त्याला घेऊन तिला तो जाऊ देईल की नाही तिला शंकाच होती. बरं, मी परत जाते असं सांगितलं आणि तो एकदम बिथरला तर इथे परदेशात आपल्याला कुणाचा आधार नसताना काय होईल ह्याची भीती वाटत होती. समजा ती म्हणाली. मला जायचंय आणि त्यानं पैसे द्यायचं नाकारलं तर ती अडकून पडणारच, शिवाय

तो चिडला तर नंतरचं सहजीवनही कलुषित होईल. तेव्हा सध्या तरी त्याच्या कलाने घेऊन आयुष्यक्रम सुरळीत चालू ठेवायचा, मग मुलगा थोडा मोठा झाल्यावर काय ती हालचाल करायची असं तिनं ठरवलं. दुसर मूल मात्र होऊ द्यायचं नाही असा निर्णय तिनं रॉबर्टला न विचारताच घेऊन टाकला. समजा परत जायचं ठरवलंच तर पैशाची सोय होऊ शकेल का असं भावाला लिहून विचारायचं तिनं ठरवलं. एकदा हे निर्णय घेऊन टाकल्यावर तिच्या मनातलं वादळ तात्पुरतं शमलं. तसा नुसतं दुःख करीत बसण्याचा तिचा स्वभाव नव्हता, तेव्हा एकदा संघर्ष लांबणीवर टाकायचं ठरवल्यावर ती समाधानाने रहायला लागली.

त्या वर्षीचा पावसाळा आला तो सुरुवातीलाच अतिवृष्टी घेऊन. मार्गरिटने केरळातला धुवाधार पाऊस अनुभवलेला असल्यामुळे तिला ह्या देशातल्या पावसाचं काही वाटत नसे, तरी पण हा पावसाळा काहीतरी विलक्षणच वाटला. काळ्या ढगांचा जणू शेकडो फूट जाडीचा थर माथ्यावर घट्ट बसला होता नि दिवस न् दिवस पाऊस कोसळत होता तरी तो विरळ होतोय असं वाटेना. सतत घराभोवती लपेटलेला पाण्याचा पडदा ती भयचकित नजरेनं पहात होती. कुठे बाहेर जाणं, खरेदी, कुणाकडे जेवायला जाणं सगळं बंदच होतं. संध्याकाळी फक्त जरा काळजीतच रॉबर्टची वाट बघत बसायचं. पावसाच्या पाचव्या दिवशी दिवेलागणीच्या सुमाराला एकाएकी प्रचंड आवाज झाला. कॉलनीच्या पिछाडीच्या डोंगराचा एक भला थोरला लचका अलग होऊन कॉलनीतल्या अनेक घरांवर कोसळला. मार्गरिटचा भविष्यकाळ वीस फूट उंचीच्या चिखलाच्या ढिगाऱ्यात लुप्त झाला.

❖❖❖


सुमन

''कितीवाजता कामावरून निघतेस? इतका उशीर कसा होतो रोज रोज यायला? कुणाला भेटाय जातेस वाटेत? बोल.''

वाक्यागणिक तो तिला हाणीत होता.

''बाईंना येऊन इचारा. हल्ली उशिरानंच सोडतात मला. मी नाई वं कुठं जात.''

सुमन थरथर कापत होती. डोळ्यातून पाण्याच्या धारा वहात होत्या. मुलं भेदरून भोवती उभी होती. हे असं वरच्यावर चालायचंच पण आज मारण्याला अंत राहिला नाही. शेवटी शेजाऱ्यांनी मधे पडून तिला सोडवली. ती कोपऱ्यात कण्हत पडली. तिची पाठ वळांनी काळीनिळी झाली होती, तोंड सुजलं होतं. ह्या भोगातनं मेल्याशिवाय सुटका नाही अशी तिची खात्री झाली होती. आत्महत्या करायचा विचार मनात डोकवत होता, पण पोरांकडे बघून तो ती बाजूला सारीत होती. व्यंकट गुरगुरला, ''ए, उठ. तिथं बसून काय राह्यलीस? भाकरी कुणी करायची? उठतेस का घालू लाथ?''

पूर्णचंद्र चेहरा, मोठं कपाळ, टपोरे डोळे, लाडिक जिवणी, डोलदार बांधा. कुणीही वळून पहावं इतकी देखणी आणि तेच तिचं पाप ठरलं होतं.

सुमनचा बाप तिच्या लहानपणीच वारला. दोन थोरले भाऊ, एक थोरली लग्न झालेली बहीण. ही लग्नाला आली तेव्हा विधवा आई थोरल्या मुलाकडे आश्रितासारखी रहात होती. त्यानं सुमनसाठी स्थळ आणलं ते नाकारायची हिंमत तिच्यात नव्हती आणि सुमनमधेही नव्हती. व्यंकट एक आगापिछा नसलेला, नियमित कामधंदा नसलेला गांजेकस माणूस. पण दिसायला बरा होता, वागायला मऊ, निदान त्यावेळी तरी. त्याच्या गोड हसण्यामागे असलं उफराटं काळीज दडलं असेल ह्याची तिला काय कल्पना? बरं, थोडीफार मारहाण करतो म्हटल्यावर त्यात कुणालाच काही वावगं वाटलं नाही. भावाला तर नाहीच नाही. त्याला तिचा भार झालेला म्हणून तर तिचं लग्न करून टाकलं. आता पुन्हा काहीही कारणानं तो तिला आसरा देईल ह्याची सुतराम शक्यता नव्हती. तिची बाळंतपणं त्यानं केली नाहीतच, पण तिला मदत म्हणून त्यावेळी आई तिच्याकडे जाऊन राहिली तर त्याने केवढी कटकट केली.

मुलं जरा मोठी झाल्यावर सुमननं एका ठिकाणी स्वैपाकणीचं काम धरलं. दोन्ही वेळचा स्वैपाक करायचा. पगार बरा होता, कायम नोकरी. सतरा ठिकाणी भांडीधुणी करून पैसे जास्त मिळाले असते, पण त्यात कष्ट

कितीतरी जास्त. शिवाय तीन लहान मुलं असल्यामुळे घरचं काम काही थोडं नव्हतं. पुन्हा ही माणसं चांगली होती. अडीअडचणीला उचल, सणासुदीला कपडे, गोडधोड काय केलेलं असेल ते मिळायचं. पण व्यंकट तिला नीटपणे नोकरी करू देईल तर शपथ. तिच्या चालचलणुकीबद्दल संशय घेऊन मारहाण करायची, पगारातले तो मागेल तेवढे पैसे त्याच्या हातावर ठेवले नाहीत तरी मारहाण करायची, हा त्याचा खाक्या.

त्या दिवशी मार पडल्यावर ती दुसऱ्या दिवशी सकाळी कामाला गेली तेव्हा मालकिणीने काय झालं म्हणून विचारलं. मग तिच्या नवऱ्याला बोलावून घेऊन पुन्हा असं झालं तर पोलिसात वर्दी देईन अशी धमकी दिली. सुमन त्याला धमक्या द्यायचीच, पण तिच्यासारख्या नगण्य बाईच्या तक्रारीची पोलिस काही दखल घेणार नाहीत हे त्याला माहीत होतं. मात्र गावातली एक प्रतिष्ठित बाई तिला घेऊन पोलिस स्टेशनला गेली तर ते नक्की दखल घेतील हे तो जाणून होता. सुमन घरी आल्यावर तो चिडून म्हणाला, ''आपल्या घरातली भांडणं त्यांच्यापर्यंत न्यायची काय गरज होती?'' ती म्हणाली, ''त्या आंधळ्याच हायती जणू. त्यांनी माझं तोंड बघून इचारलं. आन सांगितलं तर काय झालं? तुमी वाटेल तसं मारायचं न् मी निस्तं तोंड बांधून ऐकून घ्यायचं व्हय?'' तो रागाने जळत होता. पण तिच्या अंगाला हात लावायला धजला नाही.

व्यंकट एकाचा छकडा चालवायचं काम करायचा पण काम नियमित नसे आणि पैसे फार मिळायचे नाहीत. सुमनच्या मालकिणीने धमकी दिल्यापासून तो जरा सरळ आला. खाडे कमी करायचा, घरखर्चाला पैसे आणून द्यायचा. सुमनने तिच्या मालकिणीकडून कर्ज काढून एक बैल आणि जुना छकडा विकत घेतला. व्यंकटला जास्त काम मिळायला लागलं. तुटपुंज्या पगाराऐवजी मालकीच्या छकड्याच्या भाड्याचे सगळे पैसे त्याला मिळत. बैलाचं खाणंपिणं भागून वर चांगली मिळकत व्हायला लागली. व्यंकट अजून अधूनमधून गांज्याच्या नशेत असायचा, पण सुमनला त्रास देत नव्हता. शेवटी आपल्याला बरे दिवस आले म्हणून ती हरखून गेली. पण ते तिच्या फार दिवस नशिबात नव्हतं.

निमित्त झालं तिच्या ऑपरेशनचं. गावात बिनटाक्याच्या ऑपरेशनचं शिबीर होतं. सुमनच्या ओळखीची एक कार्यकर्ती होती तिनं सुमनला विचारलं तुला करून घ्यायचं का म्हणून. सुमन अगदी ठामपणे हो म्हणाली.

तिचं ऑपरेशन झाल्याचं कळलं तशी व्यंकट धावत शिबिरात गेला. ''मला न सांगता आप्रेशन का केलंस? खून पाडीन तुझा.'' ती कार्यकर्ती कसला गोंधळ आहे म्हणून पहायला आली तर हा तिच्या अंगावर धावून गेला. ''माझ्या परवानगीबिगार तिचं आप्रेशन कसं केलं? कोर्टात खेचीन तुम्हाला.'' तिनं त्याला सुनावलं, ''ऑपरेशन करून घ्यायला नवऱ्याची परवानगी लागत नाही. तुम्ही मुकाट्यानं बाहेर व्हा नाहीतर माणसं बोलवून तुम्हाला बाहेर काढावं लागेल.''

त्याला आणखी मुलं हवी होती असं नाही. चांगले दोन मुलगे, एक मुलगी होती. पण बायकोनं आपल्याला न सांगता-विचारता असला निर्णय घेतला ह्याचा त्याला अपमान वाटला. समजते कोण स्वत:ला ही? मी नवरा आहे तिचा. आणि आता ती बिनबोभाट कुणाशीही संबंध ठेवू शकते ह्या विचाराने त्याच्या जिवाचा नुसता संताप झाला. तो तिला पुन्हा मारहाण करायला लागला आणि कुणाला सांगितलंस तर जिवे मारीन अशी धमकी देऊन ठेवली.

त्याला एका व्यापाऱ्याकडे नोकरी लागली. तशी पगारी नोकरी नव्हती, पण नुसतं वखारीत थांबायचं आणि माल घेणाऱ्या गिऱ्हाइकाचा माल पोचवायचा. व्यापाऱ्याचा धंदा मोठा होता आणि व्यंकटला खूप काम मिळत होतं. त्यानं घरी जायचं सोडून दिलं. व्यापाऱ्याच्या सामानाच्या यार्डात छकडा सोडून तिथेच झोपायचा. व्यापारी खूष होता कारण त्याला फुकटात वॉचमन मिळत होता.

एक दिवस सुमन वखारीत आली. ती आडोशाला थांबली आणि व्यंकट वर्दीवर गेल्याचं पाहून आत गेली. आपण कोण ते व्यापाऱ्याला सांगून ती म्हणाली, ''घराची डागडुजी करायला सामान पाहिजेय. उधारीवर द्याल का? मी थोडं थोडं करून माझ्या पगारातनं पैसं फेडीन.''

''व्यंकटराव देतील की.''

''नको.''

''का?''

''ते घरी येत नाईत. खर्चाला बी पैसे देत नाईत. ह्याचं बिल द्यायचे नाईत.''

''बरं बघू.''

तिनं पत्रे, फरशा, वासे असं सामान नीट पारखून शक्य तितके पैसे

वाचवून पण दर्जाबद्दल तडजोड न करता निवडलं त्याचं व्यापाऱ्याला कौतुक वाटलं.

व्यंकट वर्दीवरून आल्यावर त्यानं त्याला विचारलं घरी का जात नाही म्हणून.

''तुमाला कुणी सांगितलं?''

''तुमची बायको आली होती. असं बरं नाही. अहो, माणूस काम कशासाठी करतो? बायकापोरांसाठी ना? अन् तुम्ही घर, बायकापोरं असून इथं भणंगासारखे रहाता?''

''ती चांगल्या चालीची बाई नाही सायेब?''

''तसं काही नाही. मी चौकशी केलीय. कुणी काही वावगं बोलत नाही तिच्याबद्दल.''

व्यंकटची समजूत घालून व्यापाऱ्यानं त्याला घरी पाठवलं. तो आल्यावर सुमनवर डाफरला. ''मालकाकडे जाऊन माझ्याबद्दल तक्रार करायला लाज वाटली नाही?''

''मी तक्रार केली नाई. त्यांनीचहून इचारलं.''

''पण आधी तिकडं गेलीसच कशापाई?''

''सामान घ्यायला.''

''सामान? कशाचं सामान?''

''घराची डागडुजी करून घेणार हाय मी. छपार गळतया, कूड धड राह्यलं नाई, जमिनीला उंदरांनी उकर काढलाय. तुमाला लईदा म्हणलं पर तुमी मनावरच घेईनात मग आता मीच करायचं ठरवलं.''

''आन पैसे कोण देणार? बाप तुझा?''

''मी देनार हाय. दर महिन्याला माज्या पगारातनं थोडं थोडं. तुमच्या मालकांनी हप्ते दिलेत मला.''

ती आपल्या पायावर उभी रहातेय, मला न विचारता आपल्याच कलानं सगळं करतेय हे व्यंकटला आवडलं नव्हतं. तो तिचा रागराग करायचा. रोज घरात शिव्यागाळी, भांडणं सुरू झाली. पैसे पण देईना. त्यात त्यानं दारू प्यायला सुरुवात केली. बैलाच्या खाण्याची सुद्धा हेळसांड करायला लागला. मग सुमनला पैसे देऊन पोरांकडून कुठे वैरणीची पेंढी, कुठे उसाचं वाडं आणून बैलापुढे टाकावं लागायचं. तिला वाटायला लागलं हा घरी येत नव्हता तेच बरं होतं. मुलं आता मोठी झाली होती. त्यांना ही सगळी परवड

दिसत होती. ती बापाच्या अरे ला कारे करायला लागली. एक दिवस त्यांनी बापाला सुनावलं, ''आईला शिव्या दिलेल्या आम्ही ऐकून घेणार नाही.'' तेव्हा तो सुमनला म्हणाला, ''मी आता जातो तो परत यायचाच नाही. तू पाया पडलीस तरी येणार नाही. बघू तू एकटी घर कसं चालवतेस ते.'' तो छकडा जुंपून चालता झाला. त्याला कुणी थांब म्हटलं नाही. फक्त सुमनचा भाऊ तिला जाब विचारायला आला.

''व्यंकटरावांना का हाकलून दिलं? ही काय रीत असते का?''

''ते आपल्या पायांनी गेले.''

''ते तसं म्हणत नाहीत.''

''मग ते खोटं बोलतात. पोरांना इचार.''

''पोरं काय तुझ्या बाजूनंच बोलणार.''

ती उसळून म्हणाली, ''का माज्या बाजूनं बोलतात? कारण त्यांना दिसतंय आपला बाप कसला हाय ते.''

''काय वाईट आहे त्यांच्यात?''

''ते तुला दिसणारच नाई. तू आपल्या मतानं समजून उमजून मला त्यांच्या गळ्यात बांधलंयस.''

''सुमने, थोबाड फोडीन हां. लई चुरूचुरू बोलायला लागलीस.''

''फोड की, मार काई नवीन नाई मला. त्यो मारीतच होता, आता तूबी मार. समद्यांचा मार खायसाठीच जल्माला घातलीय मला.''

एक दिवस सुमनला कोणी तरी बोलवायला आलं व्यंकटला हॉस्पिटलला ॲडमिट केलंय म्हणून. माल छकड्यात भरत असताना एक फरशी त्याच्या पायावर पडून त्याची बोटं ठेचली होती आणि पावलाला फ्रॅक्चर झालं होतं. तिच्याच्यानं अगदीच झटकून टाकवलं नाही. त्याचं दुसरं कोणीच नाही हे तिला माहीत होतं आणि तिचा भाऊ बिऊ नुसता तोंडानं त्याचा कैवार घेणार, अडीअडचणीला त्याला मदत करणार नाही ह्याची तिला खात्री होती. ती हॉस्पिटलमधे गेली, त्याची देखभाल केली, कर्ज काढून हॉस्पिटलचं बिल भरलं आणि त्याला डिस्चार्ज मिळाल्यावर घरी घेऊन आली. तो महिनाभर बसूनच होता. थोरला मुलगा फावल्या वेळात छकडा चालवून चार पैसे मिळवत होता. तरी पण पैशाची खूप ओढाताणच होती. जमेची बाजू एवढीच होती की व्यंकट जरा चांगला वागत होता. कदाचित तिनं त्याच्यासाठी एवढं केलं ह्याचं त्याला काहीतरी वाटलं असेल.

पण तो बरा झाला आणि सगळं पूर्वपदावर आलं. एक दिवस त्यानं सुमनला दिलेल्या शिव्या ऐकून थोरल्या मुलाचं डोकं फिरलं. त्यानं रॉकेलची बाटली घरातून आणून बापाच्या अंगावर रिकामी केली. म्हणाला, ''थांब आता पेटवूनच देतो तुला, म्हणजे पुन्हा त्रास द्यायला यायचा नाहीस.'' व्यंकटला भीती वाटली तो खरंच आपल्याला पेटवून देणार म्हणून. तो पळून गेला. दुसऱ्या दिवशी छकडा न्यायला आला तेव्हा मुलानं सांगितलं, ''छकडा मिळणार नाही. बैल न् छकडा आईनं आपल्या पैशानं घेतलाय. तिचा आहे तो.'' पण छकडा नसला तर पोटाला काय मिळवणार म्हणून सुमनने मधे पडून छकडा द्यायला लावला.

व्यंकट आता काम नीट करीना. खाडे करायला लागला. दारू पिऊन कामावर आला म्हणून व्यापाऱ्याने त्याला हाकलून दिलं. तो पुन्हा छकड्याच्या लायनीत उभा रहायला लागला. पण भाडं सगळ्यांपेक्षा जादा सांगायचा, माल चढवा-उतरवायला मदत करायचा नाही, गिऱ्हाईकाशी अरेरावीनं वागायचा त्यामुळे त्याला फारसं काम मिळेना.


सुमनचं आता चांगलं चाललं होतं. थोरला मुलगा गवंड्याच्या हाताखाली काम करायचा. त्याला चांगली हजेरी मिळायची. धाकट्याला एका औषधाच्या दुकानात नोकरी लागली. तिनं मुलीचं लग्न केलं. लग्नाला तिनं व्यंकटला बोलावलंच नव्हतं, पण तिचे भाऊ आणि शेजारीपाजारी असं कसं, मुलीच्या बापाशिवाय कसं लग्न लागायचं म्हणून त्याला घेऊन आले. त्याने प्रसंग साजरा केला, पण आपल्याला न विचारता सवरता पोरीचं लग्न केलं नि आपल्याला नुसतं पाहुण्यासारखं बोलावलं हे त्याला फार लागलं. लग्नानंतर थोड्या दिवसांनी तो दारू पिऊन आला आणि त्यानं मोठा तमाशा केला. सुमनला, पोरांना घाण घाण शिव्या दिल्या, घर माझ्या नावावर आहे तुम्हाला हाकलून काढीन म्हणून धमक्या दिल्या. घरासमोरच्या रस्त्यात छकडा आडवा घालून ठेवला होतान त्यामुळे सगळी रहदारी थांबली होती. काय प्रकार आहे पहायला माणसांची ही गर्दी जमली. पोरांनी बापाला मारहाण करीत घराबाहेर काढलं. तो अजून शिव्यागाळी करीत त्यांच्या अंगावर धावून जातच होता, पण जमलेल्या माणसांनी त्याची समजूत घालून त्याला मुकाट्याने जायला लावलं. सुमनला अगदी मेल्याहून मेल्यासारखं झालं. ती पोरांना म्हणाली, ''मला आता हे सगळं सहन होत नाही. मी एकतर आत्महत्या करते नाहीतर आमच्या मालकांच्या रानातल्या वस्तीवर

रहायला जाते. तिथं मोलमजुरी करून राहीन.''

पोरं म्हणाली, ''हंऽऽ आणि मग आम्हाला करून कोण घालणार? आता तर तायडी बी लग्न होऊन गेली. तू कशाला घाबरतेस? आम्ही आहोत तवर तो तुला धक्का लावणार नाही. आता त्याला घरात येऊच देणार नाही काय बी झालं तरी. तू निवांत रहा.''

मुलं आता स्वत:चीच नव्हे तर आपली सुद्धा काळजी घ्यायला समर्थ आहेत असं वाटून सुमनचा जीव सुखावला. सगळी जबाबदारी आता आपण एकटीनेच वहायला नको म्हणून ती सैलावली. मुलं मिळवती झाली आहेत तेव्हा त्यांच्या लेखी मिळवून पालनपोषण करणाऱ्या आईपेक्षा भाकरी करून घालणारी आई ही प्रतिमा जास्त महत्त्वाची झाली आहे ह्याचं तिला वैषम्य वाटलं नाही. किंवा ह्याचीच तार्किक परिणती म्हणजे त्यांना भाकरी करून घालायला त्यांच्या बायका आल्या की ही गरज सुद्धा संपेल असाही विचार तिच्या मनात आला नाही.

❖❖❖


जना

''विठोबा, तुम्ही मला रोज बोलायला लावता. एखाद्या दिवशी सुद्धा वेळेवर कसे येत नाही? किती उशीर हा!''

''बाई, मला तुमची बोलणी खायची हवस का हाय? पर काय करू? भाकरी लवकर होतच न्हाई.''

''का?''

''त्या उठतच न्हाईत. मस मी फाटंचंच हाका मारतो. पर उठाया तय्यारच न्हाईत. मग मी तरी काय करू?''

भंडलकर असावेत पन्नाशीतले. अतिशय सौम्य, सुस्वभावी माणूस. बायकोला मारहाण करणं दूरच, उलट जरा भिऊनच वागत होते हे सरळ दिसत होतं. त्यांचा सासरा माझ्या ओळखीचा होता. त्याच्या सांगण्यावरून मी त्यांना शेळ्या संभाळायला ठेवून घेतलं होतं.

त्यांची थोडी जमीन होती. दोघांनी कष्ट केले तर पोटापुरतं मिळेल एवढी. पण बायको काही काम करायला तयार नव्हती. तिथे रहायलाच तयार नव्हती. सारखी माहेरी पळून यायची. आठ-पंधरा दिवस झाले की नवऱ्यानं जाऊन आणायची नाहीतर बापानं घालवायची. दोघंही ह्या प्रकाराला वैतागून गेले. शेवटी सासरा म्हणाला मी तुमच्यासाठी काम बघतो. तुम्ही सगळी इथंच येऊन रहा. भंडलकर तयार झाले. सासरा बोलावतोय तर जावं तरी. बायको खुशीत राहील. आपल्याला कामधंदा मिळेल.

आल्या आल्या सगळे एकत्रच रहात होते. सासू लवकर उठून भाकरी करायची, जेवण घेऊन भंडलकर लवकर कामाला यायचे. मग सासऱ्याला कुठेशी वॉचमनची नोकरी मिळाली. कामाच्या ठिकाणी रहायची अट होती. म्हातारा-म्हातारी तिकडे गेली आणि मग भंडलकरांचं उशिरा येणं सुरू झालं. जना इतका नाठाळपणा का करते कळत नव्हतं. आपल्यावर एकदम सगळं घरकाम पडलं, आई मदतीला नाही म्हणून आळशीपणा करीत असेल असं म्हणून मी भंडलकरांना वरच्यावर नुसती समज देऊन गप्प राहिले. पण मग त्यांनी सारखी उचल मागायला सुरुवात केली. एक दिवस मी म्हटलं, ''ह्या रविवारच्या बाजारात तुम्ही आपली शेळी विकलीत तिचे चार-पाचशे रुपये तरी आले असतील. ते काय केले?''

'घरच्यांनी इकडे तिकडे खरचले.''

''म्हणजे काय?''

''अहो, त्या दुकानचा माल उचलतात, पोरांना रोज धा रुपयाचं म्हटलं

तर खायला घेतात. मग असे एकदम पैसे आले तरी ते थकलेली बिलं चुकवायला जातात.''

मी मनात म्हटलं, म्हणजे ही बाई काम तर करीत नाहीच, पण नवऱ्यानं मिळवलेले पैसे गैरहिशेबीपणानं उधळून टाकते. शेवटी मी एक दिवस म्हाताऱ्याला बोलावणं पाठवलं.

''अण्णा, हा काय प्रकार आहे? तुम्ही पोरीला जरा खडसून सांगा. नाहीतर तुमच्या जावयाला कामावर ठेवणं कठीण होईल. जित्रापाचं काम आहे. सकाळी लोटायचं, खायला टाकायचं, धारा काढायच्या सगळं मलाच करावं लागतं. मग त्यांना ठेवलंय कशाला?''

''बाई, आता तुमीच बगा आमी तकडं न्हाया गेलो तर म्हातारीनं ह्यांची पोरं बी न्हेली. आता तिचं काय वय हाय का इक्त्या न्हान पोरांच्या मागं पळायचं? तर म्हंते त्येंची आय नीट संबळत न्हाई त्येना. तिच्यान् होत न्हाई. मी पोरं परत न्हेऊन घातली तर पोरीनं दोन-चार दिसांनी पुन्ना आणून टाकली. म्हातारीनं अक्षी लाडावून ठेवलीया पोरीला. आन तिला काय म्हटलं तर डोळ्यांतनं पाणी काढते. म्हन्ते माजी येकलीच पोर उरलीया.''

त्याला तीन मुलं. थोरला मुलगा होता. तो बायकोला मारहाण करायचा. तिच्या भावानं त्याला वरच्यावर बजावलं होतं तिला मारलंस तर माझ्याशी गाठ आहे म्हणून. एक दिवस तिला इतकं मारलंन की तिचा भाऊ पिसाळलाच. ह्याच्या अंगावर रॉकेल ओतून ह्याला पेटवून दिलं. तो भाजून मेला. त्याच्या पाठची मुलगी. तिचं लग्न करून दिलं होतं. पहिलं बाळंतपण फार अवघड गेलं. तिला हृदयविकार आहे असं निदान केलं गेलं. डॉक्टरांनी अण्णाला समजावून सांगितलं की ती पुन्हा गर्भार राहिली तर बाळंतपणात मरून जाईल. पण सासरच्यांना मुलगा हवा होता. त्यांनी विचार केला असणार जगली वाचली आणि मुलगा झाला तर ठीकच. नाहीतर दुसरी बायको करता येईल. ती बाळंतपणात हृदयविकाराच्या झटक्याने मेली. ही जना सगळ्यात धाकटी. तिच्यासाठी काहीही केलं तरी अपुरंच आहे असं म्हातारीला का वाटत होतं ते एकवेळ समजू शकत होतं. पण जना आपल्या थकलेल्या आईचा असा फायदा का घेते, नवऱ्याशी इतक्या नाठाळपणे का वागते ह्याचं काही उत्तर मिळत नव्हतं. एक अडाणी अशिक्षित बाई. मजूर वर्गातली. घरातले सगळे कष्ट करणारे आणि ही सगळ्या तऱ्हेच्या कष्टांना नकार देणारी. शेतीचं काम करीत नाही, मुलांना संभाळत नाही, नवऱ्याला

वेळेवर भाकरी सुद्धा करून घालीत नाही. हा प्रकार तरी काय आहे? ही बाई आहे तरी कशी ह्याचं मला फारच कुतूहल वाटायला लागलं. मी अण्णाला सांगितलं, ''पोरीला एकदा माझ्याकडे घेऊन या. मी बोलते तिच्याशी.''

जना भेटायला आली आणि तिला पाहूनच अनेक गोष्टी स्वच्छ कळल्या. अंगानं थोराड पण शेलाट्या बांध्याची. काळा तुकतुकीत वर्ण, धरधरीत नाक, मोठाले डोळे, कपाळावर अधेली एवढं ठसठशीत कुंकू. बाई रसरशीत, देखणी होती. साधारण तिशीतली असेल.

मी एकदम मुद्यालाच हात घातला. ''भंडलकर म्हणतात त्यांना रोज उशीर होतो कारण तू भाकरी वेळेवर करीत नाहीस. असं का?''

तिच्या डोळ्यांत अंगार फुलला पण उत्तर आलं नाही. सरळ हल्ला करून काही उपयोग नव्हता हे मला कळून चुकलं. मग मी तिला गप्पा मारीत हळूहळू बोलती केली. जे तिच्याकडून कळलं ते खरं म्हणजे आधीच ध्यानात यायला हरकत नव्हती. पण तिचा बाप आणि नवरा दोघंही ह्या गोष्टीचा उल्लेख टाळून खोटं बोलले होते. किंवा त्यांच्या लेखी त्याचं काही महत्त्व नव्हतं.

भंडलकर सरळसरळ आयुष्याच्या उतरणीला लागलेले म्हटल्यावर हे त्यांचं दुसरं लग्न होतं ह्यात काही आश्चर्य नव्हतं. थोडं आश्चर्य वाटलं ते ह्याचं की त्यांची पहिली बायको जिवंत होती. तिला मूल नाही म्हणून हे दुसरं लग्न केलं. सवतींचं एकमेकींशी मुळीच पटायचं नाही. थोरली मोठेपणाचा अधिकार गाजवून हिलाच सगळ्या कामाला जुंपायला पहायची. हिला मुलं झाल्यावर सुद्धा परिस्थितीत काही फरक पडला नाही. नवरा तिची समजूत घालायचा पण थोरलीला बोलण्याची त्याची हिम्मत नव्हती. मग ही सारखी माहेरी पळून यायची.

आता ते इकडे रहायला आले होते पण आपल्यापेक्षा वयानं इतक्या मोठ्या असलेल्या एक संसार करून भागलेल्या त्या माणसाबरोबर जनाचे सूर कधी जुळलेच नाहीत. तिचं असमाधान ती नाठाळपणे वागून दाखवीत होती.

''पण तुझ्या वडलांनी तुला अशी सवतीवर दिलीच कशी?''

''त्येचं पयलं लगीन झालेलं माहीतच पडलं न्हवतं आमाला.''


''तरी पण वयानं एवढ्या मोठ्या माणसाबरोबर कसं लग्न लावून दिलं तुझं?''

''आमच्या दाजींनी सुचवलं हुतं त्येंचं नाव. लई चांगला मानूस हाय,

त्याचा मस जिमीनजुमला, घर हाय, काय बी खरचात न पाडता लगीन करून घेतील असं सम्दं सांगितलं. म्या तर लगीन हुयाच्या आंदी नीट पायलं बी न्हवतं त्यांला. धापाच मान्सं आलीवती त्यातलं कुटलं म्हून म्हाईत बी पल्डं न्हाई मला.'' ती एकदम लहान मुलीसारखी खिदळली.

आता लग्न झालंय, दोन मुलं आहेत. नवरा बऱ्यापैकी सुस्वभावी आहे, दारू पीत नाही, मारहाण करीत नाही. शिवाय सवतीला सोडून हिच्यापाशी येऊन राहिलाय. कामधंदा करून चांगलं मिळवून आणतोय. थोडं त्याच्याशी जमवून घेऊन दोघांनी सुखासमाधानात राहावं असं तिला मुळीच वाटत नव्हतं का? नवऱ्याला आणि कदाचित आईबापांनाही शिक्षा करण्याच्या भरात ती स्वत:ला सुद्धा शिक्षा करून घेत होती. पण मी तिला असं समजावून सांगण्याचा प्रयत्न केला तेव्हा तिनं ओठ घट्ट मिटून घेऊन चेहरा निर्विकार केला आणि काही प्रतिसादच दिला नाही.

❖❖❖


स्त्री-मुक्ती
एक चिंतन

ह्या पुस्तकातल्या बायका कधी ना कधी माझ्या ओळखीच्या झाल्या. काही माझ्या आयुष्याचा भाग बनून राहिल्या होत्या किंवा आहेत, काही बराच काळ माझ्या जाणिवेच्या परिघावर राहिल्या, तर काही थोडाच काळ माझ्या जीवनाला नुसता स्पर्श करून मग लांब गेल्या. त्यांच्या हकिगती लिहिताना काही संदर्भ मी बदलले आहेत, काही ठिकाणी मोकळ्या जागा ऐकीव माहितीवरून, क्वचित कल्पनेनं सुद्धा भरल्या आहेत. ह्या स्त्रियांची चरित्रं लिहिण्याचा माझा हेतू नाही. त्या सगळ्या खऱ्याच आहेत, पण त्यांच्या गोष्टी शंभर टक्के वास्तवाला धरून लिहिलेल्या नाहीत. इथे बारीक सारीक तपशील ही महत्त्वाची बाब नाही. महत्त्वाचं आहे आणि पूर्णपणे वास्तवाला धरून आहे ते म्हणजे केवळ त्या स्त्रिया आहेत म्हणून त्यांच्यापुढे उभ्या राहिलेल्या समस्या, संकटे आणि त्यांतून आपापल्या परिस्थिती आणि स्वभावानुसार त्यांनी काढलेले मार्ग.

त्यांच्या समस्या ह्या मुख्यत्वाने पितृसत्ताक, पुरुषप्रधान कुटुंब आणि समाजव्यवस्थेतून, आणि त्यातील त्यांच्या दुय्यम स्थानामुळे उद्‌भवलेल्या आहेत. लग्न हे प्रत्येक स्त्रीच्या आयुष्याचे अटळ ध्येय असते आणि त्याचा परिणाम म्हणजे तिने आपल्या पूर्वायुष्याशी संपूर्ण फारकत घेऊन एका परक्या कुटुंबाचा घटक बनायचं. बाईची गौण भूमिका, तिला दिली जाणारी वागणूक आणि तिच्याबद्दलचा कुटुंबाचा आणि समाजाचा एकूणच दृष्टिकोन ह्या गृहीताशी निगडित आहे. मुलगी जन्मल्यापासून तिचं लग्न करून देणं हे आपलं परम कर्तव्य समजून आईबाप तिला दुसऱ्याची ठेव म्हणून वाढवतात. इथपासूनच तिचं त्या कुटुंबातलं गौण स्थान अधोरेखित होतं. तिला त्या कुटुंबात कोणतेही हक्क नसतात. एकदा सासरी गेली की ती माहेरच्या कुटुंबाचा घटक राहत नाही. सासरी पटलं नाही आणि ती माहेरी परत आली तर शक्यतो काहीतरी तडजोड करून तिची परत पाठवणी होते. मुलीला सासरी न नांदायला पुरेसं सबळ कारण आहे असं पटलं तर मध्यमवर्गीयांपेक्षा कष्टकरी वर्गातल्या आईबापांची तिला ठेवून घ्यायची जास्त तयारी असते असं मी पाहिलं आहे. कदाचित ह्याचं एक कारण असं असू शकेल की ती शेतमजुरी करून पोटाला मिळवू शकते तेव्हा तिचा कुटुंबाला भार होत नाही. आणखी एक कारण असं असू शकेल की अशा न नांदणाऱ्या आणि नांदवल्या न जाणाऱ्या मुलींची संख्या इतकी असते की

तो कुटुंबाला कलंक वगैरे आहे असं समजलं जात नाही. तरी सुद्धा आईबापांच्या मागे भाऊ अशा बहिणीची जबाबदारी घेईल ह्याची काही शाश्वती नसते तेव्हा शेवटी ती एकटीच पडण्याची शक्यता असते. ह्यामुळे सासरी मिळणारी वागणूक असह्यच झाली तर बाई सासरचं घर सोडायला तयार होते, कारण तिथे तिला इतर कसला नसला तरी जीव जगवण्यापुरतं अन्न, लाज राखण्यापुरतं वस्त्र आणि डोक्यावर छप्पर एवढं मिळण्याचा तरी हक्क असतो. पण ह्याचा अर्थ ती तिथे फार सुखात जगते असा नाही.

लहानपणापासून कितीही संस्कार झालेले असले तरी स्वतःची पार्श्वभूमी, रहाणी, सवयी सगळं विसरून एका संपूर्ण नवीन वातावरणाचा स्वीकार करायचा, स्वतःचं मन आणि व्यक्तिमत्व मारून अनेकदा शारीरिक व मानसिक छळ सहन करीत जगायचं हे कुठल्याच बाईला फारसं सुखावह असणं शक्य नाही. तिनं सहनशील असणं हे ह्या कुटुंबव्यवस्थेचं गृहीत आहे. माझी बायको फार समजूतदार आणि सहनशील होती म्हणून माझा संसार निभावला असं म्हणणारे किंवा मनोमन समजलेले पुष्कळ पुरुष असतात. पण ही सहनशीलता तिनं आणि तिनंच का दाखवायची, कोणत्या मर्यादेपर्यंत दाखवायची असे प्रश्न कुणी विचारीत नाही. एका मर्यादेपलिकडे तिनं सहन करायला नकार दिला तर ती आदर्श स्त्रीत्वाच्या कल्पनेला तडा देणारी, कुटुंबाचं स्वास्थ्य धुळीला मिळवणारी, कुटुंबसंस्थाच मोडकळीला आणणारी ठरते. हा मानसिक ढाचा जोवर कायम आहे तोवर स्त्रीला पुरुषप्रधान एकत्र कुटुंबव्यवस्थेत न्याय मिळण्याची शक्यता नाही.

एकत्र राहण्याचा, त्यातूनही 'कायमचं' नातं जोडून एकत्र राहण्याचा निर्णय घेणाऱ्या सर्वांनाच तडजोडी कराव्या लागतात. बाईची कुचंबणा जी होते ती केवळ तडजोडी कराव्या लागल्यामुळे, काही बाबतीत स्वतःच्या इच्छेविरुद्ध वागावे लागल्यामुळे होते असं नाही. एका अत्यंत असमान नात्यात अन्याय्य पद्धतीने तडजोडी लादल्या गेल्यामुळे होते. एकत्र कुटुंबात ती हतबल असते कारण ही एक विरुद्ध अनेक अशी लढाई असते.

विभक्त कुटुंबात नवरा-बायकोचं नातं जास्त समान असू शकतं. ती कौटुंबिक निर्णयप्रक्रियेत भाग घेऊ शकते आणि त्याला त्याच्या कुटुंबाच्या दबावक्षेत्राबाहेर असल्यामुळे काही तडजोडी स्वीकारायला कमीपणा वाटत नाही. तडजोडी दोन्ही बाजूंनी झाल्या म्हणजे दोघांनाही जास्त सह्य होतात,

शिवाय त्या लादल्या न जाता दोन माणसांतलं नातं टिकवण्यासाठी स्वेच्छेनं केल्या जातात. पण नवरा-बायकोच्या संसारात सुद्धा त्यांचा दृष्टिकोन पारंपरिक भूमिका स्वीकारण्याचा असला तर बाईच्या परिस्थितीत काही फरक पडत नाही. शारीरिक, मानसिक क्षमता पुरुषाइतकीच असूनही जर बाई कुचंबणा, मार सहन करीत राहिली तर ती आपल्या हक्कांपासून वंचितच राहणार.

बाईच्या गौण भूमिकेचा मुख्य पाया म्हणजे तिचे आर्थिक परावलंबित्व. प्रचलित व्यवस्थेमधे कमाई करून कुटुंब पोसणे हे पुरुषाचे काम असते. बाई जरी मिळवती असली तरी ती प्रामुख्याने तिची जबाबदारी समजली जात नाही. ती मिळवती नसली तर ती घरी करते त्या कामाचं पैशात मोजमाप होत नाहीच, पण घरची जमीन असली आणि त्यावर ती उजाडल्यापासून मावळतीपर्यंत राबत असली तरी जमिनीची मालकी घरातल्या पुरुषांची असल्यामुळे त्यातून मिळणारे उत्पन्न त्यांचेच असते. बाईला ना तिच्या कामाची मजुरी मिळते ना शेतमालाच्या विक्रीतून मिळालेल्या पैशात वाटा. नोकरी करून पगार मिळवणारी बाई सुद्धा सर्व पगार बेहिशेबीपणाने कुटुंबावर खर्च करते. त्यातला काही स्वत:च्या भविष्याची तरतूद म्हणून बाजूला ठेवीत नाही. तेव्हा तिला नवऱ्यापासून फारकत घेण्याची पाळी आली तर ती अक्षरश: निष्कांचन अवस्थेत. बहुसंख्य बायका त्यांच्या मदतीसाठी केलेल्या कायद्यांचा आधार घेत नाहीत. त्यांनी घेऊ पाहिला तरी समाज त्यांना साथ देत नाही.

नवऱ्याचं घर सोडून जाण्यातला आणखी एक अडसर म्हणजे मुलं. सहसा मुलं सोडून जाण्याची बाईची तयारी नसते. त्याला मुलांशी असलेली शारीरिक आणि भावनिक जवळीक हे कारण असतंच, पण पारंपरिक दृष्ट्या मुलं संभाळणं हे बाईचं काम मानलं जातं हेही असतं. पूर्णवेळ नोकरी करून मुलांची जबाबदारी इतरांवर सोपवणाऱ्या बायका सुद्धा समाजमन अजून पचवू शकलेलं नाही. मग मुलांची जबाबदारी झटकून त्यांना सोडून जाणाऱ्या बायका तर खलनायिकांच्या स्वरूपातच समाज पाहतो. सासरचे लोक सहसा मुलांवरचा हक्क सोडीत नाहीत. समजा सोडला आणि सासर सोडणारी बाई मुलांना घेऊन जाऊ शकली तरी अशा तऱ्हेचं पाऊल उचलताना तिला फार विचार करावा लागतो. आधी माहेरचे लोक लग्न करून

दिलेल्या मुलीला कायमचं परत स्वीकारायला तयार नसतात. त्यातून मुलांची आई असलेलीबद्दल तर विचारायलाच नको. अशा परिस्थितीत मुलांना संभाळणं आणि नोकरी करून त्यांना पोसणं अशी दुहेरी जबाबदारी पेलण्याची तिची कुवत नसली तर नवऱ्याचं घर सोडण्याचा विचार तिनं करण्यात अर्थ नसतो. क्वचितच एखादी संगीता मुलांना सोडून पळून जाते. पण बहुतेक बायका आयुष्याला हार जातात कारण लहानपणापासून कधी त्यांना आपल्या हक्कांसाठी लढायचं बळच मिळालेलं नसतं. नकुसासारख्यांना तर हक्कांसाठीच काय, साध्या अस्तित्वासाठी सुद्धा झगडण्याचं बळ परिस्थितीने दिलेलं नसतं.

स्त्रियांच्या प्रश्नांबद्दल बोलताना एक विधान वारंवार केलं जातं आणि ते म्हणजे स्त्रियाच स्त्रियांच्या शत्रू असतात. सासरच्या कुटुंबात प्रवेश केल्यावर वर्षानुवर्षे टक्के टोणपे सहन केलेली सासूच नव्याने त्या घरात येणाऱ्या सुनेचा सर्वात जास्त छळ करते. सासरी छळ होतो म्हणून माहेरी पळून आलेल्या मुलीचं परत जाण्यासाठी मन वळवण्यात आई पुढाकार घेते. असं का ह्याचं उत्तर खरं म्हणजे फार सरळ आहे. अशा वागण्यामागची मानसिकता पुरुषप्रधान समाजाने निर्माण केलेली आहे. पुरुष हा समाजाचा आणि कुटुंबाचा मुख्य घटक असतो आणि स्त्रियांच्या अस्तित्वाला फक्त पुरुषांच्या संदर्भातच अर्थ असतो. नवरा कसाही असला तरी तो आपल्यापेक्षा श्रेष्ठ असतो, आपला स्वामी असतो, आपल्याला आर्थिक, शारीरिक, भावनिक सुरक्षितता आणि समाजमान्यताही तोच मिळवून देतो हे बायकांच्या मनात खोलवर रुजलेलं असतं. नवऱ्याच्या खालोखाल महत्त्व असलेला पुरुष म्हणजे मुलगा. तरुण होईपर्यंत तरी त्याचं लालन-पालन करण्याबरोबरच ती त्याच्यावर अधिकारही गाजवू शकते. ह्या आपल्या अधिकाराला आव्हान देणारी, त्याच्या प्रेमात वाटेकरी बनणारी सून आली म्हणजे तिच्याकडे सासूने शत्रुत्वाच्या नजरेनं पाहणे हे ओघानेच येते. स्त्रियाच स्त्रियांच्या शत्रू असतात ह्याचा अर्थ एवढाच असतो की प्रचलित चौकट त्यांनी मनोमन स्वीकारलेली असते.

ह्या संपूर्णपणे स्त्रीविन्मुख समाजात रूढीविरुद्ध आपल्या मनाप्रमाणे वागणाऱ्या स्त्रिया असतात हीच दखल घेण्याजोगी बाब आहे. परंतु असह्य परिस्थितीविरुद्धचा त्यांचा लढा व्यक्तिविशिष्टच राहतो. त्यापलिकडे

जाऊन परिस्थितीला कारणीभूत असलेल्या रूढ कल्पना, चालीरीती, कुटुंबरचना ह्यांविरुध्द उभा राहत नाही. प्रत्येकजण आपली गोष्ट अपवादात्मक आहे, बाकीच्यांनी तसं वागण्याचं कारण नाही असंही सूचित करते.

माहेरचा किंवा इतर कुणाचा आधार न घेता नवऱ्याला सोडून एकटी राहाणारी, बाईनं एकटं राहण्यातले धोके ओळखून उशाशी कुऱ्हाड आणि तिखटाची पूड घेऊन झोपणारी रुक्मिणी वटसावित्रीची पूजा करते. तिला विचारलं, ''ही पूजा कशासाठी करतात माहिताय का तुला? हाच नवरा सात जन्म मिळावा म्हणून. तुला हवाय का हाच नवरा सात जन्म?'' ''नको बया, ह्याच जल्मी नको झालाया तर सात जल्म कशापाई?'' पण म्हणून पूजा करायची, संक्रांतीचा वसा वसायची थांबणार नाही. एवढंच नव्हे तर तिची बहीण नवऱ्याकडे नांदत नाही आणि माहेरी येऊन राहिलीय तर ही तिच्यावर टीका करते. हिच्या मते बहिणीचा नवरा इतका काही वाईट माणूस नाही. ही म्हणते मी असते तर त्याच्यापाशी आनंदाने नांदले असते.

आईबापांना दुसऱ्या कुणाचा आधार नाही म्हणून नवऱ्याला सोडून त्यांच्याजवळ येऊन राहणारी यमुना तिनं ज्याला नंतर नवरा मानला त्याला मुलगा देण्यासाठी स्वत:चा जीव आणि कुटुंबाचं आर्थिक-मानसिक स्वास्थ्य धोक्यात घालते. विधवा असून मुलांना घेऊन स्वत:च्या हिमतीवर एकटी राहाणारी आणि समाजाच्या टीकेचं लक्ष्य बनलेली सीता नवऱ्याबरोबर न नांदता वारंवार घरी पळून येऊन शेवटी दुसऱ्या एका माणसाबरोबर राहाणाऱ्या धाकट्या सावत्र बहिणीवर कडवट टीका करते. तिचं काय खुपत असेल, नवऱ्याघरचं सुरक्षित समाजमान्य आयुष्य सोडून, सगळ्यांच्या शिव्या खाऊन तिनं नवऱ्याला का सोडलं असेल ह्याचा विचार करण्याची तिला गरज भासत नाही.

मार्गरेट वरवर पाहता दुर्दैवाची बळी ठरते, पण त्या दुर्दैवाला तिची मनोधारणा, तिचे निर्णय कारणीभूत ठरतात. दुसऱ्यांदा लग्नाचा निर्णय घेताना ती वयाने परिपक्व, व्यवसायात चांगली स्थिरस्थावर झालेली होती. तरीही तिनं अगदी थोड्या ओळखीवर लग्न करून नवऱ्याबरोबर जायचं ठरवलं. तिथे गेल्यावर लवकरच त्याचं खरं स्वरूप तिच्यासमोर येऊनही ती त्याला धरून राहिली. तिच्या नवऱ्याच्या लग्नापासून आणि बायकोपासून

ठाम अपेक्षा होत्या. तिच्या अपेक्षा काय आहेत ह्याचा विचार करण्याची त्याला गरज भासली नाही किंवा असं म्हणता येईल की आपल्याला हवंय त्यापेक्षा वेगळं काही तिला हवं असेल ह्याची तो कल्पनाच करू शकत नव्हता. आपल्या उर्मी दाबून ठेवून, मनाचा कोंडमारा सहन करीत ती जोवर हसतमुखाने जगत होती तोवर ती सुखी आहे अशी कल्पना त्याला करून घेता येत होती. तो दुष्ट होता असं नाही, फक्त तिच्या बाबतीत संवेदनशून्य होता. ती त्याच्या मनाप्रमाणे वागली की तो तिच्यावर प्रेमाचा वर्षाव करी. ऐहिक दृष्टीने तिला तो काही उणे पडू देत नव्हता. फक्त तिला बौद्धिक गरजाही आहेत ह्याची तो दखल घेत नव्हता. हे सगळं स्पष्ट झाल्यावर मार्गरिटने ते सहन करून का घेतलं? अगदी परदेशातही तिच्यासारख्या शिकलेल्या, समर्थ बाईला काहीच हालचाल करता आली नाही हे पटत नाही. कुठेतरी ह्या पद्धतीने का होईना, संसारसुख अनुभवण्याची तिला आस होती. बाईपणाची तिची कल्पना शेवटी अगतिकतेचीच होती. माझ्या ओळखीची एक ब्रिटिश बाई आहे. तिनं तरुणपणी एक कार्यक्षेत्र निवडून फार उत्तम काम केलं आणि त्या क्षेत्रात जगभर नाव मिळवलं. जवळ जवळ चाळिशीला पोचल्यावर तिनं लग्न केलं. तिला विचारलं लग्नानंतर काय करणार, तर ती म्हणाली, बघू, काही वर्षं तरी नुसता घरसंसार पाहणार. म्हणजे कुठेतरी खोल मनात बाईनं लग्न केलं की तिला नुसतं गृहिणी होऊन राहण्याचा हक्क प्राप्त होतो अशी कल्पना रुजलेली आहे. ती अगतिक नसेल, पण संस्कारांनी सीमित आहे.

ह्या पुस्तकातल्या स्वतःच्या परिस्थितीविरुद्ध बंड करणाऱ्या बायका ह्याच संस्कारांनी जखडलेल्या आहेत. माझ्यावर, माझ्यासारख्या अनेकजणींवर अशी वेळ का येते? हा आपल्या कुटुंबपद्धतीचा अटळ परिणाम आहे का? असल्यास ती झुगारून देण्याची किंवा तिच्यात काही फेरबदल करण्याची गरज आहे का? असे प्रश्न त्या विचारीत नाहीत. नवरा बऱ्यापैकी सुस्वभावी असेल, सासू फारसा जाच करीत नसेल, तर परंपरेने ठरवलेली भूमिका त्या सुखासमाधानाने बजावतील. अगदी नवऱ्यापेक्षा शिक्षण, बुद्धी, कर्तबगारी ह्यांत तसूभरही कमी नसलेल्या स्त्रिया सुद्धा कुटुंबात दुय्यम भूमिका निभावण्यात काही गैर मानीत नाहीत. ह्याचाच अर्थ असा की बहुसंख्य स्त्रिया आजही प्रचलित कुटुंबव्यवस्था, त्यातली त्यांच्या

वाट्याला येणारी भूमिका आणि ह्या व्यवस्थेचा पाया असणारी समाजमूल्ये स्वीकारतात.

प्रचलित व्यवस्था बदलण्याची पुरुषांना आच नसते ह्यात काही आश्चर्य नाही कारण त्या व्यवस्थेचे बहुतांशाने त्यांना फायदेच होतात. स्त्रियांच्या दृष्टीने त्यात पुष्कळ गैरफायदे असले तरी त्यात लाभणारी सुरक्षितता त्यांना हवी आहे असे दिसते. त्यामुळे ह्या व्यवस्थेतल्या त्यांच्या भूमिकेच्या उदात्तीकरणाने सुखावत त्या ह्याच चौकटीत राहू इच्छितात. समस्या उभ्या राहिल्या तर त्या आपल्या पुरते त्यांचे निराकरण करतात, पण चौकट मोडून अज्ञातात उडी घेणे त्यांना मान्य नाही. ही मानसिकता जोवर कायम आहे तोवर प्रचलित कुटुंबव्यवस्थेमुळे उद्‌भवणाऱ्या स्त्रियांच्या समस्या कायमच राहाणार आहेत. जिद्द आणि अनुकूल परिस्थिती असलेल्या काही स्त्रिया त्यांच्यावर मात करतील, बाकीच्या निमूटपणे सहन करीत जगतील.

– जाई निंबकर

अर्धुकमध्ये आपल्याला
भेटणाऱ्या स्त्रिया
आजच्या स्त्री-मुक्ती चळवळीला
एक वेगळा संदर्भ पुरवीत आहेत.
स्त्रियांच्या आजच्या सामाजिक
स्थितीला प्रामुख्याने आपली पुरूषप्रधान
संस्कृती आणि समाजव्यवस्था
जबाबदार असली तरीही स्त्रीची
मानसिकता सर्वसाधारणपणे
या संस्कृतीशीच मिळती-जुळती आहे
याचा प्रत्यय आपल्याला या कहाण्या
वाचताना येत राहतो.
स्त्रीची ही मानसिकता कशी बदलता
येईल व त्यामुळे आज आपल्या
असलेल्या समस्यांचे निराकरण कसे
करता येईल यावर विचारमंथन होत
आहेच. परंतु या बदलत्या मानसिकतेमुळे
समाजासमोर कोणते नवे प्रश्न उभे राहू
शकतील व त्यांचे स्वरूप काय असेल
याचा विचारही आजच करणे
आवश्यक आहे.

देशमुख आणि कंपनी (पब्लिशर्स) प्रा.लि.